म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

243

म. ग्रं. सं. ठाणे.

तां सद्भिःसंगः कथमपिहि पुण्येन भवति ॥

उत्तररामचरित

ाडी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम — शी.
........................ वि: ..........
ुक्रम .......... नों. दि. ..........
ांक ..........

BUDHAWAR PETH POONA
ग्रं. नं. 345
म. ग्रं. सं. ठाणे
दा. क्र. २५३

# विचारमाला.

वचांसि वाचस्पतिमत्सरेण साराणि लब्धुं ग्रहमण्डलीव ।
मुक्ताक्षसूत्रत्वमुपैति यस्याः सा सप्रसादास्तु सरस्वती वः ॥

कर्त्ता,

## विष्णु यशवंत मोकाशी.

सन [redacted]

किंमत १२ आणे.

पुणें येथें
रावजी श्रीधर गोंधळेकर यांचे जगद्धितेच्छु छापखान्यांत
छापवून प्रसिद्ध केलें.

[ कर्त्यानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

नं. ३५८
ता. ......

श्रीमन्महाराज

## सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादुर-
फरझंद-इ-खास-इ-दौलत-इ-
इंग्लिशिया जी. सी.
एस. आय.

# यांस

त्यांच्या राजगुणांस व विद्याभिरुचीस लुब्ध
होऊन त्यांच्या परवानगीनें हें पुस्तक
सादर अर्पण केलें आहे.

कर्ते
विचारमाला.

# विचारमाला.

## अनुक्रमणिका.

### १ विद्यार्थी.

१ विद्यार्थ्याची व्याख्या, २ विद्यार्थी दशा आमरण कशी आहे, ३ जन्मतः प्रत्येकजण विद्यार्थी आहे, ४ जन्मापासून जिज्ञासुपणाचें बाळकडू आपणास आहे, ५ आपण विद्यार्थी कसे होतो आणि कसे असावयास पाहिजे. ६ एकांतवास, ७ अवलोकन शक्ती, ८ पद्धत-उदाहरणासह विवेचन, ९ विद्यार्थी दशेंत एक गुणाधिक्याची प्रतिमा समोर ठेवणें, १० राष्ट्रीय दृष्टीनें विद्यार्थ्याची महती, ११ उपसंहार.

---

### २ एकांतवास.

१ व्याख्या, २ एकांतवास आणि विचाराची संगत कशी जुळून आली पाहिजे, ३ विचाराचें सामर्थ्य, ४ एकांतवासांतून उदय पावलेल्या विभूती, ५ एकांत पतकरणें, ६ आवडीचा विषय आणि एकांतवास, ७ एकांतवास आणि समाज, ८ एकांतवास आणि शांतिसौख्य, ९ उपसंहार.

---

## ३ शरीर सौंदर्य तर मनःसौंदर्य.

१ देहाची थोरवी, २ देहाचीं दोन चित्रें, ३ देहाचा निष्काळजीपणा पातकांत कसा गणिला आहे, ४ देहाची महती आपणच वाढवावयाची असते, ५ निसर्ग आणि देह, ६ शरीर आणि व्यसन, ७ देहाचा अधिकार, ८ उपसंहार.

---

## ४ मानव.

१ मानवाचें स्वरूप, २ उत्पत्ती, बाल्यावस्था, ३ कौमार्यावस्था, ४ तारुण्य, ५ पुत्रधर्म, ६ पती, ७ पिता, ८ नागरिकत्व, ९ पांचवा धर्म अथवा प्रभूशीं कृतज्ञता, १० उपसंहार.

---

## ५ स्त्री.

१ व्याख्या, पुरुष धर्माकडून स्त्रीधर्माची अथवा स्त्रियांच्या अंतःकरणाची बरोबर मीमांसा होणें नाहीं, ३ बाल्यावस्था—त्यांत दिसून येणाऱ्या गोष्टी, ४ शिक्षण, ५ तारुण्य अथवा प्रीति मीमांसा, ६ सौंदर्य, ७ गृहिणी आणि माता, ८ उपसंहार.

---

## ६ मित्र.

१ व्याख्या, २ मैत्रीचा उगम, ३ साधर्म्यांतील आणि वैधर्म्यांतील मैत्री, ४ मैत्रीची शाश्वती, ५ मित्रावांचून चालेल कीं नाहीं ?, ६ उपसंहार.

---

## ७ व्यवहार.

१ व्याख्या, २ व्यवहाराचें मूळ सूत्र कोठें आहे ?, ३ सृष्टीच्या व्यवहाराशीं आणि मानवाच्या व्यवहाराची तुलना अथवा त्याचें स्वरूप, ४ असत्याचा धिःकार, ५ व्यवहार दर्पण कसा आहे, ६ सरळता, ७ स्पष्टता, ८ सत्यता, ९ संतदृष्टी आणि व्यवहार, १० लोकाचार आणि कुलाचार, ११ उपसंहार.

---

## ८ दारिद्र्य.

१ व्याख्या, २ सामान्य स्वरूप, ३ दारिद्र्याची मूळ पीठिका, ४ कुटुंब आणि दारिद्र्य, ५ विद्वान व दारिद्र्य-सत्याची चाड, ६ उपसंहार.

---

## ९ धन.

१ व्याख्या, २ सामान्य स्वरूप, ३ धनाच्या खाणी, ४ धनसंगोपन आणि उपयुक्तता, ५ धन तारक आहे कीं मारक आहे ?, ६ उपसंहार.

---

## १० काळ.

१ व्याख्या, २सामान्य स्वरूप, ३काळाची ओळख, ४ स्मृतीखेरीज काळ असूं शकेल कीं काय? स्मृतीच्या काळाची महती, ५ काळ विनाशी नाहीं, ६ काळाची शिकवणी, काळ शास्ता वगैरे, ७ उपसंहार.

---

## ११ वृद्धापकाळ अथवा अखेरसाधणें.

१ मानवांचें रवीशीं साम्य, २ मरण ह्मणजे काय ?, ३ साठीची पाहणी, ४ वृद्धावस्था काय शिकवील, ५ तरुणाची आणि वृद्धाची संगती, ६ वृद्धावस्थेचा मान, ७ वृद्धावस्थेचें धोरण आणि शेवटची आत्म्यास प्रार्थना.

१८२५ नि.व.९१ १८२८५०

# धर्मराजा यमसभेंत बसला असतां नारद-मुनी त्यास म्हणतात.

मोह असावा सज्जनासी । मद असावा दुर्जनासी । मत्सर सदा संसारासी । असावा तो असे कीं ? ॥ अहो रात्रीं साठ घडी । लोटितां पापपुण्याची जोडी । किती झाली हे घडी घडी । विचारीत अससी कीं ?॥ काम नसावा परस्त्रियेचा । क्रोध नसावा सत्पुरुषाचा । लोभ नसावा शरिराचा । मोह पुत्राचा बाधक ॥ अंतःकरण आणि शरिर । नियमीं न पावे विकार । शब्द तो सजीव गिरीवर । न चळे न ढळे न खळे कीं ? ॥ पिपीलिका लागे जेथें । तात्काळ हात पावे तेथें । दीनें पावतां दुःखातें । क्लेशांतीत करीसी कीं ? ॥

मुक्तेश्वर (महाभारत सभापर्व)

कर्में दास्यपणें करूनि निपुणें नारायणीं अर्पणें<br>
पापातें क्षपणें, रमापति गुणें प्रेमामृता सेवणें ।<br>
सत्संगीं वसणें स्मृतींत असणें, एकांतिचें बैसणें,<br>
हे सर्वीं करणें भवाब्धि तरणें दुर्वासना मारणें ॥

वामनपंडित (वेदांतप्रकरणें)

# प्रस्तावना.

विचारें चौदेहा वेगळें केलें ॥ मीपण तत्वासरिसें गेलें ॥ अनन्य आत्मनिवेदन झालें परब्रह्म तें ॥ १ ॥ विवेकें चुकला जन्ममृत्य ॥ नरदेहीं साधिलें महत्कृत्य ॥ भक्तियोगें कृतकृत्य सार्थक झालें ॥२॥

दासबोध.

शस्त्रें जशीं वीरास, मौक्तिकें जशीं सुंदरास, तसे विचारालंकार ज्ञानेच्छूस होत. पहिल्यानें सज्ज झालेला पुरुष, दुसऱ्यानें अलंकृत अशा सुंदरा, तिसऱ्याच्या लालसेनें ज्ञानेच्छूच्या चेहेऱ्यावर फांकत असलेली ज्ञानप्रभा हीं त्या त्या दृष्टीनें पाहणारास मनोहारी अशींच दिसतील. पहिला आपल्या आयुधांनीं शत्रूचें दमन करील, दुसऱ्या कोमलांगी आपल्या लेण्यांनीं मोहकतेचें जाळें पसरून सौंदर्याच्या प्रतिमा मनांत उठावितील, पण ज्ञानेच्छु या दोघांचीं कामें मोठ्या कुशलतेनें, तत्परतेनें व सानंदी मुद्रेनें करील. असे जे ज्ञानेच्छू ते सरस्वतीच्या राज्यांतील सुवर्णकार होत. व्यवहारांतील सुवर्णकारांस आपल्या कृतिनैपुण्यानें ग्राहकांस संतुष्ट करावयाचें असतें, तसें ज्ञानेच्छूस आपल्या ज्ञानरूप मुशींतून विचारालंकारासाठीं शुद्ध सुवर्ण काढून करावयाचें असतें. अल्पशा श्रमानें इतर मुशी ओततां येतील. पण विचाराची मूस ओतणें फार कठीण आहे. आणि ती ओतीत असतां तींतील अंतर्गत प्रभेनें मनांतील दुष्ट व्यापारांचें पहिल्या वीराप्रमाणें दमन करणें, व दुसऱ्या मोहिनीप्रमाणें विचारसौंदर्यानें मोहित करून चंचल वृ-

त्तीस स्थैर्य देणें हें त्याहीपेक्षां कठीण आहे. हें वाङ्मयांतील सुवर्णकाराचें अथवा लेखकाचें काम स्वतःस कसें करितां येईल ह्याविषयीं व त्या अंतर्गत विषयाच्या आवडीविषयीं विचार करावा, असें मनांत आणलें आहे.

**कला आणि विषय**—कोणतीही कला घ्या तिचें मूळ सूत्र सृष्टींतून आणि आत्म्यांतून आहे. वाङ्मय असो, वा गायकाचा आलाप असो, पदार्थविज्ञानशास्त्र असो, वा भूगर्भशास्त्र असो, वृक्षावरून पडलेल्या फळांवरून न्यूटननें काढलेला गुरुत्वाकर्षणाचा नियम असो, वा शुष्क पानांवर पडलेल्या मेघांचे तुषारावरून भरत मुनींनें काढलेलें तंतुवाद्यशास्त्र असो, या सर्वांचा धागा पाहूं जातां ह्या वरील दोन दैविक शक्तींतून आहे हें सूक्ष्म विचारांतीं कळून येईल. इंद्रियांचे द्वारें तार्किकशक्तींच्या पाठबळानें व कल्पनेच्या भरारीनें वस्तुमात्रांच्या, विषयमात्रांच्या मानलेल्या व असलेल्या अस्तित्वाची मांडणी रूपांतरानें कुशलतेनें करणें ह्यास कला असें ह्मणतात. आतां कलेचा मूळ उद्देश काय, असा जर कोणीं प्रश्न केला तर त्यास एकच थोडक्यांत उत्तर देतां येण्यासारखें आहे कीं, कलेचा उद्देश जीवांच्या कल्याणासाठीं व अंतीं उन्नत्तीसाठीं आहे. आतां कलेची ओळख झाली. सृष्टींतील विषयास कुशलतेचा हात लागत गेल्यास पूर्वीं कोणताहि क्षुल्लक वाटत असणारा विषय आतां कलेच्या मार्गावर येऊन बसतो; अथवा त्यास कलेचें स्वरूप येत चाललेलें दिसतें. पूर्णत्वाचा प्रश्न फक्त दिनावधीचा असतो. ज्या वस्तुमात्रांस, विषयमात्रांस बुद्धिवैचित्र्यानें कुशलतेचा हात ला-

गेल त्यांस नांवेंहि निरनिराळीं असणार हें उघड आहे. त्या नांवाच्या स्पष्टिकरणाचें हें स्थल नव्हे. फक्त लेखक कसें होतां येईल ह्याविषयींचें आहे. आधीं " विचारमाले " सारख्या छोट्या ग्रंथास प्रस्तावना लिहावयाची नव्हती. फक्त विषयानुक्रमणिका देऊन मोकळें व्हावयाचें होतें. पण मनाच्या जबरदस्तीपुढें सर्व उपाय हरले. तेव्हां त्याचें आज्ञाधारकत्व पतकरणें भाग पडलें. असो, ह्या त्याच्या हट्टामुळें प्रिय वाचकांशीं खुल्या दिलानें दोन अधिक हृद्गताच्या गोष्टी बोलावयास सांपडत आहेत हें एक प्रकारें आह्मी भाग्यच समजतों. मध्यंतरीं हें विषयांतर झालें ह्याची क्षमा असावी.

मनास ठराविक एक शिक्षण मिळाल्यावर असा एक जीवितांत काल येत असतो कीं, मनास, विचारास स्वतंत्रतेनें वागण्याची इच्छा प्रबळ होते. पूर्वीं जे ग्रंथवाचन रात्रंदिवस टिपणें घेण्यांत घालावें असें वाटत होतें, तें त्या ऐवजीं आतां फक्त विचाराकरितां होऊन बसतें. पूर्वीं ज्या वस्तूंचें, पदार्थांचें व विषयांचें ग्रंथांतरीं निरीक्षण होत असे त्याच निरीक्षणांत आतां जिज्ञासुपणाची भर येऊन पडते. पूर्वीं ज्या परिशीलनांत फक्त विद्यार्थ्याचें नातें असतें त्यास व्यवहार आणि अनुभव हीं नातीं अधिक जडून येतात. पूर्वीं क्षुल्लक वाटत असलेली चोई आतां पानांचीं मांडणी करून पंक्तींत शोभिवंत करीत असलेली पत्रावळ पाहून कांहीं तरी सहेतुक निर्माण झालेली आहे असें भासत असतें. एकंदरींत काय कीं, पूर्वींच्या अभ्यासांतील गोष्टीस अवलोकनाचें पाठबळ मिळत चालल्यामुळें सृष्टींतील वस्तूनवस्तूंची

निष्पत्ति कांहीं तरी उपयुक्त कार्यासाठीं आहे, अशी प्रचीति येत जाते. आतां येथें विषयांची ठेव सांपडली. ह्या वेळीं सृष्टि अवलोकन करणारांस सर्व उपयुक्त आहे, सर्वांत सहेतुकतेची मूस ओतप्रोत भरलेली आहे, असें दिसून येतें. इतकेंच नव्हे, तर आपणास जी वस्तूची, पदार्थांची सत्यता भासली, ती जनसमूहांत मांडावी, असा आतुरतेचा अंकूर दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जातो. ह्या अंकुरास जाज्वल्य मनोवृत्तीच्या सिंचनाची फार जरूर असते. गद्यरचना असो, पद्यरचना असो, त्यांची अस्सल प्रजा जाज्वल्य मनोवृत्तीवांचून होणें नाहीं. कोणत्याही विषयावर लिहिण्याची गुरुकिल्ली येथेंच आहे. दुष्कर रचना हिच्या साह्यानेंच सुकर वाटतें. ही जाज्वल्य मनोवृत्ति दैविक देणगी आहे. हिचा अनुग्रह क्वचित् जनावर असतो. ३७ नाटकें लिहिणाऱ्या शेक्सपीअरची मनोवृत्ति, एकोणिसाव्या वर्षांत गीतेवर अनुपमेय भाष्य करणाऱ्या ज्ञानेश्वराची मनोवृत्ति, ज्याच्या प्रत्येक अभंगचरणावर स्वतंत्र ग्रंथ लिहितां येईल अशा नीतिनृप तुकारामासारख्याची मनोवृत्ती लाधणें केवळ त्या चिच्छक्तीचा प्रसाद व पूर्वसुकृताचा ठेवा होय. तथापि आपण सर्व श्रमाचीं लेंकरें आहों. लेंकरूं जसें कालगतीनें वाढत जाऊन मनुष्यत्वाप्रत पोंचतें व स्वतंत्रपणें आपला कारभार पाहूं लागतें, तसेंच श्रम सातित्याचीं पुटें बसवून घेत असलेलें मन आपल्या शिक्षणानें आपल्या अवलोकनानें अचाट कृत्यें करावयास तयार होतें. व दुसऱ्यास दृढतेच्या मार्गावर नेण्यास मार्गदर्शक होऊन बसतें. मानवी देहाची रचना त्या सर्वजाणत्यानें

अशी चतुराईनें करून ठेविली आहे कीं, मनानें जी गोष्ट निदिध्यासीं घेतली ती त्याला मिळवून दिलेली आहे. प्रयत्नवादी देवाच्या प्रीतींतला कां ? तर तो आपला व्यवसाय निदिध्यासीं घेतो ह्मणून. अल्पशा प्रमाणांवर जाज्वल्य मनोवृत्ती साध्य करून घ्यावयाचा असतील तर त्यास प्रयत्नवादी असणें आणि मनाची शुद्धता ठेवणें हें अत्यंत अवश्य आहे. शुद्ध अंतःकरणावांचून मनोवृत्ती उचंबळावयाच्या नाहींत व उदात्त विचारतरंग इतस्ततः भ्रमण करावयाचे नाहींत. मलीन अंतःकरण आणि शुद्ध अंतःकरण ह्यांत जमीन अस्मानचें अंतर आहे. पहिल्यास निराशा, दुर्जन आणि स्वार्थ ह्यांनीं भरलेलें जग दिसतें. दुसऱ्यास सदाशा, सुजन आणि परकल्याण हें दिसतें. पहिल्याच्या मनांत पूर्वगृहात्मक एकद्वेषी छटा असल्यामुळें दृष्टि आकुंचित राहते. दुसऱ्याचें मनक्षितीज निर्मल नीलवर्णी असल्यामुळें त्याच्या दृष्टीची प्रभा विस्तृत करून वस्तुमात्रांस व विषयमात्रांस प्रकाशमान करिते.

वस्तुंमात्रांची, विषयमात्रांची उपयुक्तता व सत्यता भासूं लागली म्हणजे त्या वस्तू व ते विषय वर्णनोचित आहेत, असें मन घेत असतें. त्या त्या वस्तूंची व विषयांची ज्या ज्या दृष्टीनें उपयुक्तता व सत्यता दिसून येत असेल त्या त्या दृष्टींत ते येतात. गुलाबाचें फूल एखाद्या भाविकाच्या दृष्टीस पडतांच तें मी माझ्या रामास केव्हां अर्पण करीन अशी बलवत्तर इच्छा त्यास व्हावयाची नाहीं काय ? तोच गुलाब एखाद्या कामुकाच्या नजरेंत येतांच माझ्या प्रियेस अथवा प्रियास दे-

ऊन स्मित हास्य वदनानें आनंदाची लूट केव्हां लुटीन असें वाटणार नाहीं काय ? एकच गुलाबाचें फूल, पण तें भिन्न दृष्टींत येऊन बसल्यामुळें भक्तिरसाचें व प्रीतिरसाचें कसें पोषक होतें तें पहा ? एकाला त्या च्या अस्तित्वाची सत्यता ईशसेवेकरितां दिसली. दुसऱ्यास तेंच प्रेम उतराईस्तव अवतरलें आहे असें भासलें. एवंच समजावयाचें ह्मणून इतकेंच कीं, ज्यास मन आपल्या आवडरूपी चुंबकानें ओढील व ज्यावर दृष्टी सत्यतेचें वस्त्र झांकील असें वाटत असेल, तेच विषय व त्याच वस्तू खऱ्या वर्णनाच्या होत, असें समजलें पाहिजे. ओढून ताणून चंद्रबळ आणून विषयाची निवड करणें ह्मणजे लेखणीस व्यर्थ शीण होय. हें केव्हांही इष्ट नाहीं.

**विषयाची वाण.**—महाराज, ह्या जगतीतलावरची कोणती वस्तू निरर्थक आहे ? ज्या प्रत्येकीं वस्तूमध्यें व विषयामध्यें त्या परब्रह्मस्वरूपाचा अंश येऊन बसला आहे, त्या कोणत्याहि विषयास अथवा वस्तूस निरर्थक ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? प्रथम दर्शनीं वाटा मारणारा वाल्या कोळी खायाला काळ व भुईला भार असाच वाटला असेल. देवा, अशा दुरात्म्यास काय ह्मणून निर्माण केलेंस, असें दोष ठेवून लोकांनीं किती शिव्याशाप दिले असतील ? पण देवाची करणी एवढी अगाध कीं तिनें त्याच व्यक्तीस शतकोटी रामायणाची कीर्ति, व 'वाचमर्थानुधावति' अशी असमान व्यक्ति निर्माण केली व अखिल जनसमूहास जगांच्या कोशां निरर्थक शब्द नाहीं, अशी प्रचीति दाखवून दिली. फार तर काय यःकश्चित् अशी भासमान झालेची तृणाच

काडी बाशिंगाच्या अंतर्गत होऊन मंडप शोभिवंत करिते, मग बाकीच्या स्थूल सचेतन व अचेतन गोष्टीं विषयीं बोलावयास कशास पाहिजे. सार काढूं लागलों तर सर्व दिसणाऱ्या गोष्टी शिक्षण देणाऱ्या आहेत, हें विचारांतीं कळून येईल. आहे हें सर्व शिक्षणार्थी आहे. विषयाची आवडनिवड जनहित साधण्यासाठीं करून घ्यावयाची आहे. जनहित साधण्यासाठीं व्यक्तीस आपल्या कर्तव्यासह तो सर्व जाणता एथें पाठवीत असतो. ह्या कर्तव्याची ओळख वाचन, शिक्षण, मनन हीं पटवित असतात. तीं पटवून घेणाराची मात्र वाण आहे! ही दूर करण्यासाठीं कवी अवतरले आहेत व अवतरत असतात. ह्यांच्याकडे लेखकानें डोळसपणानें पहावयाचें असतें. लेखक राष्ट्राचें नव्हे, अखिल मानवी जातीचें मुख असल्यामुळें त्यांना नीतीची गीत गावी लागते, तत्वाचा आलाप काढावा लागतो व अवलोकनांत आलेल्या विषयांचा व वस्तूंचा जन्म हेत्वर्थ आहे ह्याची काहणी सांगावी लागते; व शेवटीं यथामति बनविलेल्या विचारमंदिरांत कांहीं आवडीचें. असेल तर एथें पहा, ह्यांतील वस्ता आपणासाठीं आहेत, येथील विचारदल जर आपणास सुवासिक आणि प्रेक्षणीय वाटलें तर मी स्वतःस धन्य मानून घेईन, अशी इच्छा प्रकट करून त्यांत शिरण्याविषयीं आपल्या प्रिय भगिनीस व प्रिय बंधूस विनयानें विज्ञप्ति करावी लागते. अशी विज्ञप्ति करावयाचा सुयोग यावा ह्मणून ही एकादश फुलांची माला रचिली आहे. ( छीः छीः असें ह्मणणें कदाचित् गर्वोक्तीचें होईल; तेव्हां त्या प्रभूच्याकृपाप्रसादानेंच

केवळ रचतां आली आहे हें ह्मणणें योग्य वाटतें ) ह्या व्यतिरिक्त दुसरें कोणतेंही कारण नाहीं.

ह्या ग्रंथासंबंधानें बोलावयाच्या गोष्टी ह्मणजे तीन. पहिली ही विचारमाला कोणत्याहि ग्रंथाचें रूपांतर नाहीं. अगदीं स्वतंत्र आहे. दुसरी ही कीं, विचार केलेले विषय अकरा आज बरेच महिने झाले मनास सारखें प्रोत्साहन देत होते ह्मणून हातांत ही रचना घेतली. प्रकृत विषयांवर इंग्रजी भाषेंत व महाराष्ट्र वाङ्मयांत बरेच ग्रंथ झाले आहेत. तथापि ही रचना चालविली. तर मग आतां ह्यांत नवीन तें काय आहे, असा जर कोणीं प्रश्न केला तर यास एकच उत्तर आह्मी देतों कीं, स्वभाववैचित्र्यामुळें आपणही ह्या विषयांवर यथामति विचार करावासें वाटलें ह्मणून. तिसरी ही कीं, सरस्वतीच्या मंदिरांत टीकाकार हे ग्रंथकर्त्यांचे वडील बंधु होत. तेव्हां त्यांनीं ह्या अल्पकृतीसंबंधीं हिताहिताचा निर्णय केला तर मला समाधान वाटणार आहे. तो निर्णय त्यांनीं कोणत्याहि शब्दांत केला तरी तो मला प्रिय आणि शिरसा वंद्य आहे. कारण तो बंधु ह्मणजे प्रेमाचा सागर. त्यांतून अहित कसें बाहेर येईल. येईल तर हितरत्नच येईल. ही इच्छा प्रगट करून ही माला स्वीकारण्याची विनंति आपणा सर्व आर्य बंधूंना करितों.

तुमच्या आशीर्वादें जन्मोजन्मीं घडो अशी सेवा ।
हे वाङ्मनशशरीरें करितों विज्ञापना सदा देवा ॥

मोरोपंत ( कृष्णविजय )

हेंच इच्छावयाचें दुसरें काय ?

१५।९।०३ बाभुळगांव
पो० पंढरपूर.

आपला सर्वांचा नम्र सेवक,
**विष्णु यशवंत मोकाशी.**

# विद्यार्थी.

Come forth, thou curious child! hither, thou loving, all hoping poet! hither thou tender, doubting heart, which has not yet found any place in the world's market fit for thee; any wares which thou could'st buy or sell,—So large is thy love and ambition, thine and not theirs is the hour. Smooth thy brow, and hope and love on, for the kind Heaven justifies thee and the whole world feels that thou art in the right.

R. W. Emerson.

९८२७

# विद्यार्थी.

मोलाची ते घडी जाते वायाविण ।
न मिळे मोल धन देतां कोटी ।
जागा होई करी हिताचा उपाय ।
तुका ह्मणे हाय करिसी मग ॥ १ ॥

ज्या दीपानें सरस्वतीच्या मंदिरांतील एकून एक वस्तु प्रकाशांत येते; ज्या जिज्ञासु वारूची धांव जीवित शोधार्थी असते, जो हरिण सदा ज्ञानतृषीत व शिक्षणक्षुधित असतो, तो हरिण, तो जिज्ञासुवारू, तो दीप म्हणजे सर्वांस प्रिय असा विद्यार्थी होय. अजातशत्रु ही ज्याची परिस्थिति, प्रोत्साहन आणि मदत हे ज्याचे पाठिंबे ' शब्दसृष्टीचे ईश्वर ' हे ज्याचे शिक्षक, त्या विद्यार्थ्याचें अथवा त्या विद्यार्थी स्थितीचें चित्र एकादा नाटकी लेखनपटुच रेखाटो; तथापि, विचार करणें हा जीवितधर्म ठरत असल्यामुळें प्रस्तुत विषयासंबंधीं तो यथामती करावा असें मनांत आणिलें आहे.

विद्यार्थी हा शब्द फार व्यापक आहे. विद्यार्थी दशा आमरण आहे म्हटलें तरी चालेल. इतर स्थिति कांहीं एक काळपर्यंत असते, पण पुढें तीस गत्यनुसार दुसरी संज्ञा प्राप्त होते. तशी स्थिति विद्यार्थी दशेची नाहीं. तिला आदि आहे, मध्य अथवा परिपक्व दशा आहे; पण अंत नाहीं. शास्त्रें अपार आहेत. कला अनंत आहेत. जीवितजाळ्याच्या ग्रंथी सोडविणें बिकट आहे. आणि त्या सोडविणें आणि शिकणें हें जर जीवितक-

तव्य आहे तर तें पाळण्यास आयुष्य पुरणार नाहीं हें उघड आहे. आतां विद्यार्थी दशेंत आयुष्य वेंचणें अथवा न वेंचणें हे प्रश्न निराळे आहेत. तसें करणें अथवा न करणें ह्या मनाच्या बाजू आहेत. तथापि मनांत आणिलें तर विद्यार्थीदशा आमरण ठेवतां येणार आहे हें निःसंशय होय. प्रत्येकजण विद्यार्थी आहे. प्रत्येकजणानें विद्यार्थी असावयास पाहिजे आहे. आतां प्रत्येकजण विद्यार्थी कसा आहे, आणि तो कसा असावयास पाहिजे हें पाहूं.

नैसर्गिकतः घर्षण आणि उष्णता ह्यांचा जसा संबंध जुळून आलेला आहे तसा विद्यार्थीदशा आणि जिज्ञासुपणा ह्यांचा जुळून आलेला आहे. घर्षण झालें कीं, उष्णता धांवून येते. तसेंच जिज्ञासुपणा अंगीकारला कीं, विद्यार्थीदशा प्राप्त झाली म्हणून समजावें. विद्यार्थ्यास जिज्ञासुपणा हा शोभविणारा एक अमोलिक दागिना आहे. नखशिखांत दागिन्यांनीं भरलेली रूपसंपन्न स्त्री आहे पण भाळीं कुंकुमतिलक नाहीं. हा जसा केविलवाणा देखावा होय, तसा विषयानें फुलून गेलेल्या सृष्टीकडे जिज्ञासुदृष्टीनें न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं तोच होय. असो; चांदव्याकडे पाहून पाळण्यांतील मूल कसें हर्षभरित होतें बरें! विचारें पडलें वाचाहीन नाहींतर हे गोळे कशाचे आहेत म्हणून आईस त्यानें चटदिशीं प्रश्न केला असता. त्याच्या त्या वेळेच्या जिज्ञासुपणाचें पर्यवसान फक्त टक लावण्यापर्यंत जातें दिव्याजवळ उभें राहून त्याभोंवतीं बोटाचे गरके दे ऊन आई 'तान्ह्या बाळा तीट लावूं' म्हण

मुलास लडिवाळपणें खेळवीत असतां मूल कडेवरून निसटण्यास पाहून दिवा धरण्यास धांव घेत असतें. आई त्याची ती धांव बंद करिते. मूल मीं कां जाऊं नये म्हणून प्रश्नावर प्रश्न विचारतें. न जाण्याचें कारण सांगून त्यास ती गप्प बसविते. गप्प बसविलें म्हणून काय झालें? त्याच्या प्रश्नाच्या अंतर्गत असलेल्या जिज्ञासुपणाचें अस्तित्व तीस नाहींसें करतां येत नाहींना? आपला भाऊ मेजांतून शुभ्र उत्तम सफईदार कागद काढित असलेला पाहून कनिष्ठ बंधु म्हणतो; दादा, कागद कशाचा करतात? वडील बंधु रांध्याच्या जिन्नसांची माहिती देऊन त्याचें समाधान करतात. एक काव्यप्रिय आपल्या स्नेह्यास विचारितात कायहो, मुक्तेश्वर आणि मोरोपंत ह्यांची तुलना करण्याचें योग्य स्थान तुम्हास माहित आहे काय? स्नेही उत्तरादाखल ह्मणतात पहा वोवा, अ ॓िपर्वातील ( २३ अ. ) द्रुपदोक्ती असेल कदाचित्, म्हणून शंकेचें निरसन करितात. इतकीं हीं उदाहरणें पुरीं आहेत.

ह्या चारी उदाहरणांवरून लक्षांत येईल कीं, जिज्ञासुपणा हा मनुष्याच्या अंगीं जन्मतः खिळलेला आहे. वाढीनुसार त्यांत अंतर पडो, तो परिपक्वदशेस पोंचो. हे अंतर आणि ती वाढ हीं मनाच्या वाढीवर अवलंबून आहेत. ह्याबद्दल पुढें विचार करूं. पण ह्यांत ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, जिज्ञासुपणा आपला एकमित्र आहे. तो आपणास सोडणार नाहीं. आपण मात्र त्यास सोडूं. जिज्ञासुपणा ही ईश्वरी देणगी आहे. ईश्वराच्या घरीं वांटणी होत असतां ती सर्वांच्या वांट्यास

सारखीच आलेली आहे. बुद्धीच्या साह्यानें एक जीव तिचा उपयोग करून घेतो व कीर्तिमंदिरांत बसतो. दुसरा तिचा उपयोग करून घेत नसल्यामुळें अपात्रतेच्या पात्रांत मात्र जाऊन बसतो. जिज्ञासुपणा वाढवावा तितका हितकर आहे. त्याच्या वाढीबरोबर विचारास गति मिळते. विचारास गति मिळल्यावर कृति बापडी स्थिर राहील काय? मनुष्य हा विचारी जीव आहे. त्यास जिज्ञासुपणाचें जितकें बळ असेल तितकें पाहिजे. ह्याचें बाळकडू लहानपणापासून मिळत गेल्यामुळें आपण त्या स्थितीपासून विद्यार्थी आहों ह्याबद्दल आतां शंका उरली नाहीं. आतां प्रश्न हा उद्भवतो कीं, विद्यार्थी आहों तर शिक्षक कोठें आहे? प्रश्न बरोबर आहे. पण तो प्रथम जितका कठिण भासतो तितका तो नाहीं. आस्थेनें प्रश्न विचारिला तेथें ज्ञानलालसा आली. जेथें ज्ञानलालसा आली तेथें विद्यार्थीपणा येईल हें उघड आहे. प्रश्नाचें, शंकेचें समाधान अथवा निरसन ज्या व्यक्तीकडून झालें त्या व्यक्तीस अल्पकाळ कां होईना गुरूची संज्ञा देण्यास फारशी हरकत येईल असें वाटत नाहीं. काळ अल्प कीं दीर्घ हा प्रश्न वेगळा आहे. आपण बोलत आहों ते फक्त गुरूसंबंधीं बोलत आहों. जिज्ञासुपणाचें समाधान करणारी आई असो, समाधान करणारा बंधू असो, वा स्नेही असो, कोणीहि असला म्हणून काय झालें? नातीं हीं गुरुपणास स्थापित नाहींत असें कोणास म्हणतां येणार आहे. असें जर कोणास ह्मणतां यावयाचें नाहीं तर तें समाधान करणाऱ्या व्यक्तीस शिक्षकाच्या ठिकाणीं मानणें उक्त दिसतें. जिज्ञासुपणा हा

गुप्तपणें शिक्षणाची बाजू संभाळिते. हिच्या धोरणावर प्राथमिक आणि उच्च शिक्षणाचे पाये रचले आहेत. तेथें जाऊन धडे घेत बसणें ही विद्यार्थी दशेची दुसरी आवृत्ति होय. आतां आपण कसे विद्यार्थी होतो, कसे आहों आणि कसें असावयास पाहिजे, ह्याचा विचार करूं.

सृष्टींतील व्यापारांचा काल हा ज्याप्रमाणें सूत्रधार आहे, त्याप्रमाणें तो विद्यार्थी दशेचाही आहे. तेव्हां कालाचा त्याबरोबर विचार करणें प्रासंगिक दिसतें. गतीबरोबर स्थित्यंतर झालें पाहिजे हा स्वाभाविक नियम दिसतो. आणि त्याची प्रचीति इतर स्थितीप्रमाणें विद्यार्थी स्थितींत झालेली आढळून येते. मानवी ज्ञातीचा इतिहास सुरू झाल्यापासून सर्वेषाम् विद्यार्थी नात्यानें विद्यार्थी दृष्टीनें पाहूं जातां आपण विषयमात्राचें, वस्तुमात्राचें निरीक्षण करण्यास अपात्र आहों अशांतली गोष्ट नाहीं. इतिहासाकडे पाहूं जातां आर्यांनीं ' अजरामरवत् प्राज्ञो विद्यामर्थंच साधयेत्,' हें उदात्त तत्त्व हृतपटिकेवर कायमचें कोरून ठेविलेलें दिसतें. प्राचीन काळीं तर विद्यार्थी वृक्ष पूर्णावस्थेस येऊन पोहोंचला होता. दैवयोगदुर्विपाकानें राहणी पालटली! वृक्षाची हवी तशी जोपासना करण्यास प्रतिबंध झाला व भावी काळीं तो होऊं पहात आहे, तरी पण त्या वृक्षाच्या भूम्यंतर्गत सखोल झालेल्या पारंब्या कोणास छेदतां येतील काय? जोपासना झाली नाहीं ह्मणून काय झालें? त्याची थोरवी कमी झाली? सद्गुण जेथें रोपा, भक्ति जेथें जल, पिढिनुजात परिशीलन जेथें आळें, तेथील वटवृक्ष काल जोपासनेच्या पारंब्यानें आधारभूत होऊन

रहावा व परकीयांस मनोहर दिसावा ह्यांत नवल तें कसचें? गुरु, कांठी, शिष्य, पताका ही जेथें दैविक इच्छेनें सांगड झाली ती आम्ही पौर्वात्य विस्कळूं देऊं काय? ती विस्कळूं देण्या इतका अपंडित व कृतघ्न आमच्यांत कोणी नाहीं. आणि असलाच तर अपवादादाखल ह्मणून त्याचा विचार कर्तव्यहि नाहीं.

पाश्चात्यांकडे पाहूं जातां एकोणिसाव्या शतकानें त्यांचें बुद्धिवैभव सुव्यक्त केलें आहे, असें दिसून येतें. राजसगुण पडला विलासी आणि विलास तर पाश्चात्यांचा प्रधान गुण, तेव्हां त्याचे पोषणार्थ त्यांना आधिभौतिक शास्त्राचें जनकत्व पतकरणें भाग पडलें. सुख आणि सोय ह्यांची जेथें गरज भासली तेथें कल्पकतेचें जनन होणें साहजिक आहे. राजस गुणाचें नामनिर्देशन एवढ्याच करतां केलें कीं, त्यांच्या अर्वाचीन शोधांच्या मुळाशीं पाहूं जातां तो प्राधान्येंकरून दिसतो ह्मणून. गौणार्थी अथवा व्यंगार्थी हें आमचें ह्मणणें नाहीं. विद्यार्थी दृष्टीनें पाहूं जातां पश्चिमेपेक्षां पूर्व अधिक सरस दिसते. तथापि, पश्चिम निरस असें कोणासही ह्मणतां यावयाचें नाहीं. अध्यात्मज्ञान परिपक्वतेस नेत असणारा पूर्वकक्षेवरील एक शान्त मुनी तारा, आणि मानवी स्वभाव महोदधींतील खडानूखडा शोधून काढित असणारा पश्चिमकक्षेवरील नाटकी तारा कोणत्या विद्यार्थी दृष्टीस आल्हादजनक वाटणार नाहीं? व्यक्तिमहात्म्याचे पोवाडे स्वकीय म्हणून किंवा परकीय म्हणून स्वजातीय म्हणून किंवा विजातीय म्हणून गाइले जात नसतात. ते फक्त गुणावरून गाइले जात असतात.

कीर्ति बाजारीं मिळती तर काय पाहिजे होतें ? पण ती पडली गुणावर आसक्त आणि गुण पडला श्रमाचा मुलगा; तेव्हां त्या श्रमाची आराधना केल्याखेरीज कोणास गत्यंतर असणार आहे. अभ्यासांत श्रम जेथें साधक म्हणून वाटतो तेथें विद्यार्थीपण जयश्री गळ्यांत घालून निघेल हें उघड आहे. जेथें श्रम बाधक वाटतो तेथें विजय तरी कशास धांवून येईल आणि श्री तरी काय म्हणून ढुंकून पाहील? पूर्वींच्या विद्यार्थीपणांत आणि आतांच्या विद्यार्थीपणांत हें असें अंतर आहे. इतर जसे पण जिंकावयाचे असतात तसा विद्यार्थी हा एक कठिण पण जिंकावयाचा असतो. तो प्राचीन विद्यार्थ्यांनीं जिंकला, अर्वाचीन विद्यार्थ्यांस जिंकावयास कठिण जात आहे, तो सुखाच्या इच्छेनें व श्रमाच्या अभावामुळें. श्रम, प्रयत्न किती हे त्रासदायक शब्द आहेत? हा जिवांना कोण त्रास आहे. क्षणक्षर कबूल कीं, ही उपाधी त्रासदायक आहे. पण असें पहा कीं, ह्या उपाधींतून, ह्या कर्माच्या चक्रांतून कोण सुटला आहे ? विधाता स्वतः कर्ममार्गी आहे. सृष्टि माता स्वतःस प्रवृत्तींत ठेवून दिवसेंदिवस पूर्णत्वाचें स्वरूप घेत आहे. आपण तर ह्या दोघांचीं लेकरें आहों. त्यांचा मार्ग अनुसरणें त्यांना सत्कारार्थी व आपणास हितार्थी आहे. असें जर हें आहे, तर कर्ममार्गाचा तिटकारा आणून उपयोग काय? असें जर हें आहे तर श्रम, प्रयत्न ह्या शब्दांचा निषेध काय म्हणतां? जगणें सर्व प्राणिमात्रांस लागून आलेलें आहे. पण करुणार्थी जगणें व जगविणें हा मानवाचा श्रेष्ठ धर्म समजला आहे. हा जो धर्म, ही जी जीवित इतिकर्तव्यता

तीं शिकण्यासाठीं व पाळण्यासाठीं विद्यार्थ्याचें पूर्व वय आहे; व तीं शिकविण्यासाठीं व पाळविण्यासाठीं त्याचें उत्तर वय आहे.

**एकान्तवास:**—शिकणें आणि शिकविणें हीं कामें दुःसाध्य आहेत. कर्त्याच्या ग्रंथकर्त्याच्या वृत्तीशीं आपली वृत्ति रून घेणें हें कठिण आहे. व ग्रंथ पुढें ठेवून त्यांतील आपल्याशीं संमत असंमत अशा मतावर शांतपणें विचार करून त्याचीं टिपणें घेणें हें त्याहिपेक्षां कठिण आहे. सोपें आहे कोणास ? तर वरवर पाहणारास. अशा वरवर पाहण्यानें विद्यार्जन होतें तर काय पाहिजे होतें ? पण उत्तम अभ्यासाचें मूळ निराळ्याच ठिकाणीं पडलें. त्यास कोणीं काय करावें ? खऱ्या विद्यार्थ्याचा अभ्यास त्याच स्थितींत होय. चंचल मनास एकाग्र करून अलौकिक कार्यें त्याच मंदिरांतून घडून आलेलीं असतात हें निःसंशय होय. ती स्थिति, तें मंदिर ह्मण. जे एकांतवास होय. अशा ठिकाणीं मन स्वच्छ निर्मळ आरशासारखें असावें. प्रपंचांतलि 'दे घे' चे—व्यग्र कर णारे विचार अल्प काळ दूर ठेवावे. आवडीच्या विषयाचे ज्ञानाचे ठेवे पुढें असावे, आणि मग त्या ज्ञानेच्छकडे पहावें. अशा वेळीं त्या विद्यार्थ्याची दिसत असलेली प्रसन्न मुद्रा, विषयांतरीं झालेली त्याची ती तादात्म्य वृत्ति, आणि ह्यामुळें त्याच्या ब्रह्मांडीं मावेना आनंद कोण वर्णन करील ? धन्य आहे त्या विद्यार्थ्याची कीं, पूर्व वयांत असें हें एकांतवासाचें कडक पाळून उत्तरवयांतील सुखोत्पत्तीच्या साधनाची ख आतांच तयार करून ठेवीत आहे व न कळत दुसऱ्या

स जीविताचे धडे घालून देत आहे ! गिरीं पाहाडीं रा-हिलें ह्मणजे एकांतवास होतो आणि घरांत राहून तो होत नाहीं असें नाहीं. तो कार्यापुरता पतकरूं म्हटलें तर कोठेंही पतकरतां येतो. इच्छा असल्यावर उपाय सुचलेच पाहिजेत. आतां एकांतवासापासून तोटेही हो-ण्याचा संभव आहे. त्याच्या अतिसेवनापासून मनास विक्षिप्तपणाचें वारें व व्यवहारशून्यतेचा टिळा लागणें केव्हां केव्हां शक्य आहे. पण आह्मी म्हणतों कोणत्या काळीं आणि कोणत्या स्थळीं अतिरेक विनाशास कार-णीभूत झाला नाहीं ? शस्त्रें तारक आहेत. पण तीं को-णी आपल्या दुर्गुणांनीं मारक करूं लागला तर तेथें को-णीं काय करावें ? अशा ठिकाणीं तारतम्यता पाहिजे. शिक्षणाबरोबर तारतम्यता नसावी ही दुःखाची गोष्ट होय ! हा केविलवाणा देखावा होय ! शिक्षणहिन्यास तारतम्यतेचें कोंदण शोभतें हें आह्मी विद्यार्थीदर्शांत ध्यानांत ठेवूं लागलों तर काय मजा होणार आहे.

आतां **अवलोकनशक्ति** आणि पद्धत हीं जीं विद्या-र्थीदर्शांतील प्रधान अंगें समजलीं आहेत त्याविषयीं थोडा विचार करूं. ज्ञान शिकणें, ज्ञान शिकून घेणें अ-[illegible] काढून घेणें हे शिक्षणांत दोन भेद समजले आहेत. [illegible] वाचून आपण ज्ञान शिकतों. व्यवहार पाहून सृष्टि-[illegible]र्य पाहून आपण ज्ञान काढून घेतों. हें आतां स्पष्टच [illegible]े कीं, ग्रंथिकज्ञान शिकावयास ग्रंथ आहेत. निसर्गा-[illegible] आणि व्यवहाराचें अध्ययन करावयास अवलोकन [illegible]ंथ आहे. सृष्टचवलोकनासारखा दुसरा सुंदर ग्रंथ [illegible]ीं. सृष्टिसौंदर्यापुढें कृत्रिमसौंदर्य तुच्छ आहे. सृष्टच

वलोकनापरती मनास रिझविणारी दुसरी गोष्ट नाहीं. शिक्षणांत तादात्म्य ह्मणून जी उच्च मनोवृत्ति समजतात तिचा आद्य तंतु ह्याच शक्तींतून आहे. कलेचा जन्म अवलोकनांतून आहे. व्यवहारनैपुण्य ह्याच मातेच्या उदरीं जन्म पावतें. ज्ञान शिकण्यापेक्षां ज्ञान शिकून घेणें, ज्ञान काढून घेणें मोठ्या प्रयासाचें आहे, पण स्वतःच्या फायद्याचें व दुसऱ्याच्या हिताचें असल्यामुळें तें कर्तव्य आहे. अवलोकनाचे धडे स्वतः शिकले पाहिजेत अवलोकनशक्ति स्वतः वाढविली आहे. दुसरा फक्त मार्गदर्शक होईल. दुसऱ्यास ते धडे शिकवितां यावयाचे नाहींत. दुसऱ्यास ती शक्ति वाढवितां यावयाची नाहीं. प्रत्येकाचें अवलोकन निराळें असणार. प्रत्येकास वस्तूंतील सत्यता निराळी भासणार. तेव्हां एकाचें अवलोकन दुसऱ्यास काय होय ? नाटकें हीं काय आहेत ? कवित्व हें काय आहे ? हीं त्या अवलोकनप्रभेचीं किरणें आहेत. भिन्न अवलोकन आहे ह्मणून भिन्न कृति आहे म्हणून हा संसारपट विविध रंगांनीं भरला जात आहे; हा भरविण्याचें काम एका विद्यार्थ्यावांचून दुसऱ्या कोणासही करतां येत नाहीं. अवलोकनरूपी रंगानें ग्रंथपट जर अलबत्यागलबत्यांनीं भरून निघते तर काय पाहिजे होतें ? पण तसें नाहीं. ह्या पवित्र कृत्याकरितां ईश्वरानें विद्यार्थीवर्ग निर्माण केला आहे. तेव्हां त्या वर्गानें आपल्या कर्तव्यास विसंबू नये. ते विसंबतील तर जगाची मोठी हानि होणार आहे.

आतां पद्धतीकडे वळूं. सृष्टींतील कोणत्या पदार्थास पद्धत नाहीं ? कोणती निर्जीव आणि सजीव वस्तु श्रा-

द्धतीविना आहे! जमिनीच्या एकाद्या दुसऱ्या थराखालीं किरकोळ उपयोगाची खडी सांपडते. त्याच्या खालीं त्यापेक्षां अधिक कठिण असा दगड सांपडतो. असे बरेच जमिनीचे दगडाचे थर झाल्यावर सर्वांत उत्तम असा काळा पाषाण दिसतो. आणि त्यानंतर जीवाचें आद्य जीवन जें पाणी त्याचा स्वच्छ निर्मळ झरा दृष्टीस पडतो. काय मजा आहे पहा! ज्या वस्तूची जशी उपयुक्तता त्या वस्तूची तशी मांडणी पद्धतवार खोल सखोल मांडणी झालेली दिसते. दिवस रात्र व्हावी ह्मणून पृथ्वी दैनंदिन गति घेते. ऋतु अयनें व्हावींत ह्मणून तिचें वार्षिक गतीचें भ्रमण आहे. पिकाचे वाढीस रात्रीची हवा इष्ट आहे तेव्हां थंडींत रात्रमान मोठें ठेविलें आहे. किती हे सृष्टिधर्म सुयंत्रित चालले आहेत ते पहा. इतका हा अंतःस्थितीचा बाह्यस्थितीचा झपाट्यानें व्यापार चालला आहे पण कोठें नाद, कीं )डबड, कीं नियमाची विसंगतता, कीं अंदाधुंदी आहे काय? अंदाधुंदीचा ह्मणून गंध नाहीं. प्रथमच्या बियापासून तों फळ परिपक्व होऊन पुनः बियाची निष्पत्ति थईपर्यंत वृक्ष आपल्या पद्धतींत आहे. बाळपण अज्ञानावस्थेंत आहे तर त्यास ममतेची जोपासना आहे. तरुणपण हुड दशेंत जाईल तर त्यास शिक्षणाची आंच ठेली आहे. मध्यमावस्थेंत चांगलें कर्तृत्व येतें तर तेथें ...ीचा ओघ पुढें राहून नवीन पिढीची जोपासना क... आहे व इतरांना आपल्या सुखदुःखाचा विभागी ...न घेत आहे. किती ही सुरेख पद्धत! कशी ही सुखोत्पत्तीची खाण! किती हा आल्हादजनक देखावा!

कोण हा त्या जगन्नियंत्याचा अतर्क्य दूरदर्शीपणा ! मानवांचें कर्तव्य इतकेंच आहे कीं, त्यांनीं हा दूरदर्शीपणा जाणला पाहिजे. हे अल्हादजनक देखावे पुढें आणवून घेतले पाहिजेत. ह्या सुखाच्या खाणीचा शोध लाविला पाहिजे. असें हें करण्यासाठीं सृष्टिपदार्थापासून सृष्टिधर्मापासून पद्धतीचे धडे शिकले पाहिजेत. पद्धत ही कलेची पोषक आहे. पद्धत कलेचें गोजिरवाणें अंग आहे. पद्धतीची मांडणी दीर्घकाळ झाली ह्मणजे तीस कलेचें स्वरूप येतें. गोंदणीचीं टिंबें विसंगत पडलीं तर तीं दृष्टीस काय होत ! पण तींच पद्धतवार मांडून एकादी सुगरण त्यांचें सुबक तुळशीवृंदावन करत्ये. प्रथम हातावर तीं वेडीं वांकडीं पडलीं होतीं त्यावेळीं त्यांना कसें ओंगळ स्वरूप आलें होतें बरें ! पण तींच आतां तुळशीवृंदावन ह्या नांवानें मोडतात व सुशोभित दिसतात. हें जें चित्र रेखाटलें गेलें तें पद्धतीमुळेंच ना ? मग उत्तम चित्र विषयाचें असो वा वस्तूचें असो, तें रेखाटणें ह्मणजे कला नव्हे का ? असें जर आहे तर पद्धत ही कलेची माता आहे असें ठरत नाहीं काय ? असो; ह्या सर्वांवरून हें ध्यानांत येईल कीं, पद्धतीचा अंगीकार सर्वांनीं त्यांत विशेषतः विद्यार्थ्यांनीं केला पाहिजे. कोंवळी फांदी आणि निब्बर फांदी ह्यां जें अंतर आहे तेंच विद्यार्थ्यांमध्यें आणि इतरांमध्यें आहे. तेव्हां कोंवळ्या फांदीनें कारणीं लवकर लागणें बरें नव्हे का ?

एकांतवास, अवलोकन, पद्धत ह्यांचा उपयोग करणी घेत असतां तरुणांना एक गोष्ट ध्यानांत ठेवावी लागे-

ती ह्मणजे एक गुणाधिक्याची प्रतिमा दृष्टीसमोर ठेवणें ही होय. ग्रह स्वतः गति घेत असतां सूर्याभोंवतीं आपणास गति घ्यावयाची आहे ह्याकडे जसा रोंख देतात, तसा शिक्षणक्रम चालला असतां आपल्या आवडत्या विषयपटूच्या एक काल्पनिक प्रतिमेच्या ठिकाणीं तो ठेवावा लागतो. नुसत्या गुणाधिक्याची किंवा विषयनैपुण्याची कल्पना करणें निराळें आणि प्रत्यक्ष गुणाधिक्याची मूर्ति अथवा निपुणतेची मूस पाहणें हें निराळें. गुणापेक्षां गुणी मनावर आपली कृति जलद बिंबवितो; तेव्हां तोच स्मृतींत ठेवणें हितकर होय. इतर मार्गक्रमण करित असतां अमुक स्थळीं जावयाचें आहे हें जसें आपण ध्यानांत ठेवतों, तसेंच, शिक्षणमार्ग क्रमित असतां अमुक एक कलेंतील निपुणता संपादावयाची आहे अथवा त्या निपुणतेच्या स्थळीं जावयाचें आहे, हें ध्यानांत ठेवावयास पाहिजे. पहिल्याविषयीं स्मृति नेहमीं असते. पण दुसऱ्याविषयीं बहुधा विस्मृति आढळून येते. पहिल्या मार्गाचें स्थळ चुकल्यास अथवा विसरल्यास फारशी चूक होणार नाहीं, पण शिक्षणमार्गावरील स्थळाचा रोंख चुकल्यास अथवा विसरल्यास जीवितहेतु विसरेल ह्याची वाट काय ? ह्याबद्दल जबाबदार कोणास धरावयाचें ? बाण सुटावयाच्या आधीं वाटाघाट. तो सुटल्यावर बोल केवळ फोल होय. तोच प्रकार जीविताचा आहे. शिक्षणसंस्कार होत असतां तेथें विषय आवड आहे आणि जेथें विषय आवड आहे तेथें डोळसपणा खर्चिल्यास उत्तमतेची प्रतिमा दिसणार आहे. मग ती प्रतिमा विषय

आवडीनुरूप कवीची, चितार्‍याची, गायकाची, तत्त्ववेत्त्याची अथवा ह्या व्यतिरिक्त दुसर्‍या कोणाचीहि दिसो, ती दिसणार आहे हें खास. त्या तशा प्रतिमा दिसत असतां एकादा हेकटमती डोळे मिटून ह्मणूं लागला कीं, मला तशा दिसत नाहींत. तो असें मत प्रतिपादन करूं लागला तर त्याचें समाधान करण्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेव देखील थकेल. तेथें तुह्मा आम्हा सामान्य जनाची कथा काय? असो; हेतु धरल्याखेरीज कार्यें होत नाहींत हा जसा नियम आहे तसाच शिक्षणांत विद्यार्जनाचा हेतु, कोण अथवा काय व्हावयाचें आहे ह्यावर रोंख ठेविल्याखेरीज शिक्षणसाफल्य नाहीं, हा नियम आहे.

**राष्ट्रीय दृष्टीनें विद्यार्थ्याची महती** फार आहे. विद्यार्थी केव्हां केव्हां राष्ट्राचें भूषण होऊन राहतो. प्रेरणा ही एक दैविक देणगी आहे. तिचा अनुग्रह विद्यार्थ्यावर झाला म्हणजे ती त्यास कोणत्या उच्च पदावर नेऊन बसवील हें सांगणें कठीण आहे. तिच्या सहायीं त्याची कर्तृत्वशक्ति केवढी भरारी मारील हें नुसत्या कल्पनेनेंच जाणावें हें बरें. आजचा उद्यमशील, विनयशील विद्यार्थी कालगतीनें नीतिवेत्ता होऊन जननीति कशावरून नाहीं सुधारणार? आजचा वैद्यकाचा विद्यार्थी कालगतीनें अश्विनीकुमार होऊन निरपेक्षतेनें पीडिताच्या व्यथा आणि जखमा कशावरून नाहीं बर्‍या करणार? जनापदा पाहून आजच्या बहुश्रुत होत असणार्‍या विद्यार्थ्याचा जीव त्यांच्या हितासाठीं तिळ तिळ कशावरून नाहीं तुटणार? कालगतीनें आजचा विद्यार्थी सत्याची दीपिका घेऊन राष्ट्ररंगभूमीवर तिची गीत गात नाचेल

देखील. आतां येथें समाजाचें कर्तव्य एवढेंच आहे कीं त्यानें निदान प्रेक्षक तरी व्हावयास पाहिजे. आपल्या बंधूची कृती आपण चाहूं नये तर कोणीं चाहावी. पुष्पास भोक्ता नसावा ह्याबद्दल जनदृष्टि दोषी ठरवावी कीं विधाता दोषी ठरवावा ? ह्याचा निर्णय ज्याचा त्यानेंच करावा हें बरें. असो.

**उपसंहार** उद्यमता हें विद्यार्थ्याचें शील आहे. निरपेक्षता हें त्याचें आदितत्त्व आहे; आणि विनय हें त्याचें एक भूषण आहे. विद्यालयें, वाचनालयें हीं त्यास फक्त मार्गदर्शक होत. सृष्ट्यवलोकनापरता दुसरा सुंदर ग्रंथ नाहीं. त्यांत त्यानें पाहिलें पाहिजे व सृष्टिनियंत्यानें सजीवाचा निर्जीवाशीं काय म्हणून संबंध जुळवून आणिला आहे, त्या निर्माण कर्त्याशीं मानव कृतज्ञतेनें कसा बद्ध झाला आहे, हें त्यानें दाखविलें पाहिजे. ईश्वर व्यक्तीस विशिष्ट कार्यासाठीं येथें पाठवित असतो, ह्याची साक्ष मोठ्या विनयानें त्यानें जनसमूहास पटवून दिली पाहिजे, तरच विद्यार्थीदशेंत आल्याचें त्याचें सार्थक्य होणार आहे.

# एकान्तवास.

अखंड एकान्त सेवावा ॥ अभ्यासचि करित जावा ॥ काळ सार्थकचि करावा ॥ जनासहित ॥ १ ॥ विवेक एकांतीं करावा ॥ जगदीश धारणेनें धरावा ॥ लोक आपला आणि परावा ॥ मानोचि नये ॥ २ ॥ एकांतीं विवेक ठायीं पडे ॥ एकांतीं यत्न सांपडे ॥ एकांतीं तर्क वावडे ॥ ब्रह्मांडगोळीं ॥ ३ ॥ एकांतीं स्मरण करावें ॥ चुकलें निधान पडे ठावें ॥ अंतरात्म्यासरिसें फिरावें ॥ कांहीं तरी ॥ ४ ॥

दासबोध.

# एकांतवास.

Oh solitude ! Conduct my feet.
To contemplation's calm retreat.

Scot's Mag.

महात्म्यांच्या महतीपटाचें मूळ सूत्र जेथून निघतें, कल्पकाच्या कल्पकतेस जें आदिकिरण असतें, कलेचें बीं ज्या रोप्यांतून निघतें, समाजरचनेचें मांडणीचित्र प्रथम ज्या पटावर तयार होतें, तो पट, तो रोपा, तें आदिकरण तें मूळसूत्र ह्मणजे एकांतवास होय. जीविताचें नातें वाढविणें हा जीवितहेतु दिसतो. हा जीवितहेतु ज्यास साध्य करून घ्यावयाचा आहे, त्यानें आपली विचारशक्ति वाढविली पाहिजे. विचारशक्तीची वृद्धिंगतता मनाचें आत्म्याशीं हितगुज झाल्याखेरीज होणार नाहीं. हें हितगुज होण्यास जीवास एकांतवासच पाहिजे. एकांतवासांतील झालेल्या मननांत पूर्वापार स्थिति व कार्यकारणसंबंध आलेला असतो. तेव्हां त्या मननांत जें ठरतें तें निर्णयार्थीं ठरत असतें. निर्णय मतभेदी असूं शकेल, पण निर्णय विचारणीय व आदरणीय असतो, हें विसरतां कामा नये. एक एकास विचारण्यासाठीं जातो व ह्मणतो, "काय हो ह्या गोष्टीसंबंधानें तुमचें मत काय

आहे ?" त्यास उत्तरादाखल दुसरा म्हणतो, "थोडा वेळ विचार करून सांगेन." पहिले गृहस्थ उतावीळ असले ह्मणजे पुनः ह्मणतात, "काय चेंगट बोवा, तुह्मास जें काय मत द्यावयाचें तें आपलें लागलींच सांगून टाकावें. दुसरे ह्मणतात, "अहो, उगीच तोंडास येईल तें उत्तर देणें ह्मणजे आपणास तर पसंत नाहीं. मतें ह्मणजे काय वाटेवर पडलीं आहेत ? सर्व बाबतींत शोध लावून थोडा वेळ शांत रीतीनें विचार केला पाहिजे. कां आणि कारण, जर आणि तर, हीं त्या प्रश्नास लाविलीं पाहिजेत तर मला मत देतां येईल. उगीच आपलें होस हो हा मार्ग आपणास तर पसंत नाहीं. चेंगट ह्मणा पाहिजे तें म्हणा." ह्या मित्रद्वयाच्या संवादावरून एवढें निष्पन्न होतें कीं, उत्तर द्यावयाच्या गोष्टीस अल्पकाळ कां होइना पण शांत स्थिति पाहिजे. आह्मी जें ह्मणतों तें हेंच कीं, विचार आणि एकांत हीं स्वर आणि व्यंजनाप्रमाणें एके ठिकाणीं धांवून आलीं पाहिजेत तर त्या विचारांत कांहीं घेण्यासारखें आहे. नाहींतर विचारही आहे, कृतीही आहे, बाजारही आहे आणि बुणगेही आहेतच. रावसाहेब ह्मणतात, "हो मत ना ? अहो, आमचें केव्हांच तयार आहे." स्तुतिपाठक म्हणतात, "छेः बोवा ! रावसाहेबांच्या बुद्धितीव्रतेची कमाल आहे ! पहा, आतांच प्रश्न आणि उत्तर आपलें पाठोपाठ. स्तुतिपाठक आणि रावसाहेब दोघेही अरण्यपंडित ! तेव्हां 'अहो रूपं अहो ध्वनिः' प्रकार झाल्यास आश्चर्य तें कसचें ? पण वादविवादाचें हें लक्षण पाहून समंजसास दोघांच्या अज्ञानाची कींव येते. शांत रीतीनें विचार क-

रून उत्तर देईन,' हें ह्मणणाऱ्या गृहस्थाकडे पहा, आणि 'आमचें उत्तर ना? तयार,' ह्मणणाऱ्या रावसाहेबा-कडे पहा आणि अंतर शोधा. ज्या विहिरीची जास्त खोली तिचें पाणी लवकर निघणें नाहीं. जी उथळ तिचें लवकर निघून खडखडाट होणें साहजिक आहे. म्हणून विहिरी खणतांनाच खोल अशा खणाव्या म्हणजे कसल्याही उन्हाळ्यास तोंड द्यावयास त्या तयार असतात. इतकें हें प्रस्तावनेदाखल लिहून शिरोभागच्या विषयाकडे वळतों.

जीवितांत विविध रीतीनें विविध कर्तव्यें लागून येतात. पण त्या सर्वांची व्याप्ति तीन परिघांत आहे. एक स्वार्थाचें परीघ, दुसरें व्यवहाराचें अथवा अन्योन्यसंबट्टणाचें, व तिसरें परमार्थाचें. हीं परिघें अकुंचित किंवा सकुंचित करणें हें ज्याचे त्याचे बुद्धिबलावर व कृतीवर अवलंबून आहे. ज्या अनंत पालकाच्या कृपाप्रसादानें ही विविधरंगी सृष्टि दिसली त्या अमोघ जन्मदेणगीबद्दल त्याच्या चिंतनानें अणुरेणु हळू भारी होण्याचें पहिलें कर्तव्य परिघ. ज्यांच्या अप्रतिम प्रेमानें आपली जाणतेपणापर्यंत जोपासना झाली तें मातापितरांविषयींचें दुसरें कृतज्ञतेचें परिघ. ज्या श्रेष्ठ पुरुषांनीं आपणास बहुव्याप्ति 'आपले' ह्या शब्दाची ओळख पटविली त्यांच्या उपकृतीचें स्मृतिकरण हें तिसरें. ह्या कर्तव्य परिघांतून कसरतीनें बाहेर निघण्यांत खरी कुशलता आहे. आणि ह्या कुशलतेंतच जीवितसाफल्य आहे. ह्यावरून असें ह्मणतां येईल कीं, जीवित साफल्याची परिसमाप्ति दोन शब्दांत आहे. ते शब्द ह्मणजे विचार

आणि कृति हे होत. विचाराचा ओघ लेखणींतून वाहतो, कृतीचा पराक्रमशस्त्रांतून वाहतो. आतां हें उघडच आहे कीं, पहिला ओघ सरळ मार्गानें आला तर सरळच जीवितसिंधूस मिळेल, नाहीं तर विमार्गी झाल्यास दुसऱ्या एका ओहळास भेटेल. दुसऱ्याच्या पराक्रमाची शक्ति जशी स्थानीं अथवा अस्थानीं आणावी तशी ती नेत्ररंजनी अथवा नेत्रभंजनी होईल हें सांगणें नकोच. पण ह्याहीपेक्षां खोल विचार करतां जीवितकर्तव्य एका विचार ह्या शब्दांत आहे, हें कळून येईल. सृष्टींतील पदार्थांचे व देहाचे धर्म कांहींहि असोत, पण त्या सर्वांचा रोख जसा एका गति ह्या शब्दांत आहे, तसें जीविताकलन एका विचार शब्दांत आहे. नुसतें बोलावयाचें ह्मणजे विचार आला. नुसतें पहावयाचें ह्मणजे विचार आला. मग तो कितीहि अल्प प्रमाणानें येवो पण तो येतो हें खरें आणि जीवितधर्म चालवितो हें खरें. विचार हा जीविताचा सर्वतोपरी घटक आहे. विचार हा कर्तव्यफांदीचा मूळ रोपा आहे. वाङ्मयाचा जनिता, राष्ट्राचा पोषक, अज्ञानाचा दीप असा हा विचार सरस्वतीच्या राज्यांत अचाट कृतीनें थक्क करून सोडणारा मयासुर होय. विचार ह्मणजे कृतीचा जनक आहे. तो जें करील ती पूर्वदिशा आहे. अशी विचाराची महती आहे. ह्या असमान शक्तीचा उगम कोठून होतो हें पाहूं. ज्या विचारानें मनास आणि हातास इतकें दासानुदास केलें आहे त्याचा जन्म पवित्र स्थानांतून धीर प्रकृतींतून असला पाहिजे हें उघड आहे. अमृतराय आठ प्रहरांपैकीं एक प्रहर योगसाधनांत घालवीत होते

ह्मणजे कशांत घालवीत होते ? त्यांच्या रसाळ कवित्वाचा जन्म कशांतून झाला ? श्री समर्थांनीं बारा वर्षें कोणच्या स्थितींत काटिली ? श्री एकनाथासारख्या अधिकारी पुरुषाच्या प्रासादिक वाणीचा जन्म कोठून झाला ? महाभारतकर्ते व्यास, शतकोटी रामायणाचे जनक वाल्मीकि, जर्मनींतील जगमहशूर तत्त्ववेत्ते कँट, ग्रीसमधील प्रख्यात तत्त्ववेत्ते प्रेथॉगरस व झेनाफन ह्या सर्वांचे कृतीतारे अथवा रवी कोणत्या कक्षेंतून उदय पावले होते ? एकांतवास हें ह्या सर्वांचें एकच उत्तर होय. हें आतां सांगावयास पाहिजे काय ? विधात्या ! ह्या अमोलिक रत्नाचा तूं आह्मा विद्यार्थी जनांस लाभ दिलास हा धन्यवाद मी कोणत्या शब्दानें गाऊं हें माझें मलाच सुचत नाहीं. ! तुझ्या स्तवार्थ जें विशेषण काढावें तें कमीच ठरतें. ह्याबद्दल भाषेस मी कधींहि दोष देणार नाहीं. हा माझा काय अनाधिकारी असल्यामुळें असें कशापासून होत नसेल ? असो, जे अधिकारी आहेत त्यांकडे जाऊन तो धन्यवाद गाण्याविषयीं विनंती करीन. मग तरी कर्तव्यांतून सुटलों कीं नाहीं ? सृष्टींतील प्रत्येक गोष्टीस अपवाद आहे. पण अभ्यासास एकांतवास अपवादक असतो ही गोष्ट कधीं ऐकिलीहि नाहीं आणि वाचिलीही नाहीं. अभ्यास हा शब्द जन्मतांच, एकांतवास त्याचा पाठिंबा म्हणून अवतरला आहे. अभ्यासाचा ज्या दिवशीं लय होईल त्या दिवशीं एकांतवास जाईल. एकांतवासाची री

ओढिली नाहीं, एकांतवास आवडला नाहीं, असा एकहि तत्ववेत्ता नाहीं. जगांतील महात्मे जर कोठें एकमती झाले असतील तर एका एकांतवासाच्या ठिकाणींच झालेले आहेत. गुणावरून गुणीस आपण मान देतों मग तो गुणी ज्या गुणनिधींतून उत्पन्न झाला असेल त्यास किती मान द्यावयास पाहिजे बरें? एकांतवासांतील मनन हें खरें. एकांतवासांतील आज्ञा ह्या आह्मास शिरसावंद्य, हेंच आह्मी जिज्ञासु म्हणविणारांनीं ध्यानांत ठेविलें पाहिजे.

---

१ एकांतवासाच्या संबंधी खालील उतारा वाचकांस मननीय वाटेल म्हणून घेतला आहे.

:—Do not go into solitude only that you may presently come into public. Such solitude denies itself: is public and stale. The public can get public experience, but they wish the scholar to replace to them those private, sincere divine experiences of which they have been defrauded by dwelling in the street. It is the noble, manlike, just thought which is the superiority demanded of you, and not crowds but solitude confers this elevation. See, distinctly, that it is not insulation of place, but independence of spirit that is essential, and it is only as the garden, the cottage, the pasture, and

**एकान्त पतकरणें.**—ज्ञानप्राप्ति व धारणाशक्ति हीं कांहीं बाजारीं मिळत नाहींत. ह्या दोहोंची प्राप्ति फार दुर्लभ आहे. वाचतांना दृष्टि, कान, मन ह्यांची एकात्मता झाली पाहिजे. विचारांत शिरण्यापूर्वीं मन आणि आत्मा ह्यांचें संमेलन झालें पाहिजे. तर कांहीं थोड्या बहुत प्रमाणानें मेंदूवर परिणाम होणार आहे; व ज्ञान आणि धारणाशक्ति लाधणार आहेत. मनाची वाढ एका दिवसानें एका आठवड्यानें कळून येत नाहीं. पण ती एका वर्षानें कळून येते. ज्या पात्रतेनें उत्तरवयांत मोठीं कार्यें घडून यावयाची असतात, त्या पात्रतेस पूर्व वयांत दिनावधीहि मोठा लागतो. बाजारांतून चार दिडक्यांचे वटाटे निवडून आणणाराची योग्यता व ग्रंथांतून निवडक वेंचे काढणाऱ्याची योग्यता सारखी असते काय ? पहिल्यास व्यवहारशिक्षणाचा धडा फार थोड्या वेळेंत शिकतां येण्यासारखा आहे. पण दुसऱ्यास वेंचे, काढावयास बरेच

---

the rock are a sort of mechanical aids to this that they are of value. Think alone and all places are friendly and sacred. The poets who have lived in cities have been hermits still. Inspiration makes solitude every where...... Recollect the spirits. Have solitary prayer and praise. Digest and correct the past experience. Blend it with the new and divine life, and grow with God.

Ralph Waldo Emerson.

दिवसाचें शिक्षण पाहिजे असून स्वतःच्या विचाराची त्यास पुष्कळ भर घालावयास पाहिजे. पात्रता, विचारावांचून, श्रमसातित्यावांचून येणें नाहीं. रात्रंदिवस एकांतवास पतकरावा लागतो. डोक्याचें हातास सतत आज्ञाधारकत्व पतकरावें लागतें तेव्हां कुठें एक चांगलीशी कृति, बरा विचार, निघतो. पण त्याहि कृतीस व विचारास व्यवहाराच्या सहाणेवर लावून पहावें लागतें.

पूर्ववयांत एकांतात घातलेल्या कालाचें मुद्दल उत्तर वयांत दामदुपटीनें नव्हे कधीं कधीं शतपटीनें चक्रवाढ व्याजासुद्धां वसूल होतें. मात्र मुद्दल घालणारानें तो व्यवसाय आपल्या आवडीचा आहे कीं नाहीं हें मात्र पूर्णपणें ठरविलें पाहिजे. नाहींतर बाजारांत गव्हांकरितां पैसे नेऊन स्वस्त असें समजून एरंड्याची खरेदी होण्याची भीति आहे. प्रत्येक मनुष्यास आवडीनिवडीची बुद्धिदेणगी त्या सर्वजाणत्यानें दिली आहे. ठराविक एक शिक्षण मिळाल्यावर पालकांनीं विषय आवड त्या विद्यार्थी मुलावर ठेविली पाहिजे. नाहीं तर मुलाचा भावी उर्जितवृक्ष मध्येंच छाटला जाणार आहे. महत्कार्याचा उगम क्षुल्लक गोष्टींतून असतो तेव्हां क्षुल्लक गोष्टींविषयीं फार सावधपणा ठेवावा लागतो. खिळ्यावांचून स्वार गेला ही गोष्ट सर्वांस महशूर आहेच. त्याचें निरर्थक चर्वितचर्वण कशास पाहिजे ! पण खिळ्याकडे अलक्ष केलें ह्मणून ही संकटपरंपरा भोंवली ही गोष्ट मात्र पालकांनीं लक्षांत ठेवून मुलाच्या आज क्षुल्लक आहे असें वाटत असणाऱ्या विषयाकडे पूर्ण लक्ष दिलें पाहिजे. असो, सांगावयाचें ह्मणून इतकेंच कीं, विषयावर

आवडीचें पांघरूण असल्याखेरीज तो विषय विचार कर-ण्यासारखा नसतो. आवडीचा विषय विचारार्ह झाला म्हणजे विचारमीनास एकांताच्या सरोवरांत जावयास सूक्ष्म द्वार सांपडेल. आतां येथून विचाराची क्रीडा. हें एकांत-वासाचें सरोवर जितकें मोकळें, परपीडेपासून दूर असें ठेवतां येईल तितकें बरें. विचारमीनानें शांत अशा ह्या स्थलीं क्रीडा केली म्हणजे तो भावी विस्तृत–व्यवहार–जलशयास जावयास मुळींच कचरत नाहीं. उलट ह्याची क्रीडा पाहून ह्याचें आद्य स्थान शोधून तेथें आपणही कांहीं वेळ जावें असें इतरांस वाटतें. ज्या विहिरींत एकानें डोकावून पाहिलें तेथें दुसरा पाहतो, दुसऱ्यानें पाहिलें तेथें तिसरा जिज्ञासू धडकतो, व अशा रीतीनें जनाचा कार्यभाग आटपला जातो. उत्तम निवांत स्थळाखेरीज विचार सुचणें नाहीं. पण एकदां सुचल्यावर तो प्रवाह आटोपत नाहीं. असाच वास्तविक प्रकार आहे.

**एकान्तवास आणि समाज.**—एकांतवास मननासाठीं आहे. मनन विचाराकारितां आहे व विचार जनप्रेरकतेस्तव आहे. ह्या गोष्टी एकांतांतील व्यक्ती पूर्णपणें जाणत असतात. साधारण जनसमूहास आपण कशाकरितां आहों, आपणांस काय करावयाचें आहे, ह्याची ओळख असते. तर जे जवळ जवळ एक तप नव्हे कधीं कधीं दोन दोन तपें मननांत घालवितात ते आपल्या कर्तव्याची स्मृती सदैव जागृतींत ठेवीत असतील, हें काय सांगावयास पाहिजे ? अशा महात्म्यांसंबंधानें नुसती शंका घेणें म्हणजे एक त्यांचा अपराध करण्यासारखें आहे. एकांतवास पतकरलेल्या

व्यक्तीनें सत्याचें प्रकाशन केलें नाहीं, किंवा जनहित साधलें नाहीं, असें कोणत्या काळच्या अथवा कोणत्या स्थळाच्या इतिहासानें कथन केलें आहे सांगा पाहूं ? आह्मी तर ह्मणतों कीं, अशा पुरुषांच्या कृतीनेंच तो पुष्ट झाला आहे. पूर्ण विचाराशिवाय बोलावयाचें नाहीं, पूर्ण मननाखेरीज मत प्रकाशांत आणावयाचें नाहीं, अशीं ह्या मंडळीचीं ठाम मतें असल्यामुळें जनसमूहांत त्या सामग्रीविना येत नसतात. पण एकदां ती आली ह्मणजे कायमचीं येत असतात. शाश्वतीचीं कार्यें दिनावधीनें बाहेर येतात. परिपक्वता दीर्घकाळांत असते. दूरदर्शीपणा कालगतीनें येतो. हें समाजानें ध्यानांत ठेवून व्यक्तीच्या विलंबाबद्दल गय खावयास पाहिजे आहे. समाजाचें हित तो आपला जीवितहेतु. समाजाची प्रगती ती आपली धांव, असें चिंतित असलेल्या पुरुषास समाजानें वंद्य ह्मणूनच घ्यावें. बाकी ते ह्मणजे स्तुतीस भाळलेले असतात किंवा निंदेनें खचले जातात असें थोडेंच आहे ? त्यांचीं कर्तव्यें केवळ कर्तव्यादाखल ह्मणून पुढें येत असतात.

**एकान्तवास आणि शांतिसौख्य.**—जगांत प्रत्येक मनुष्य सुख इच्छितो. पण तें प्रत्येकास मिळतेंच असें नाहीं. आणि तें ज्या रीतीनें साधून घ्यावयाचें असतें त्या रीतीची बहुधा विस्मृति झालेली दिसून येते बहुतेक मंडळी संसारानें जिगजिगलेली, अज्ञानानें गुरफटलेली व कार्यसाधूंच्या डावपेंचांत सांपडलेलीच असतात. व्यवहारांत मायेचें माणूस कमी. मायावीचीच संख्या अधिक. सात्विकतेचें तेज एथें तथें. दांभि-

कतेच्या ज्वाळाच सर्वत पसरलेल्या. हित सांगणारे एक दोन. हित साधून घेणारेच पांचपन्नास. सुवासिक ज्ञानमंजिरी एक. तोऱ्याचे तणवडच माजलेले फार. अतएव, स्थिर करणाऱ्यापेक्षां भांबावून टाकणारेच अधिक. तेव्हां येथें व्यक्तीनें काय करावें? एक वृत्ती कशी साधून घ्यावी? सुखाचें साधन कोणतें ह्मणून पहावें? आपलीं दुःखें, आपलीं संकटें, आपलें अज्ञान, पूर्णपणें आपणासच माहित असतें इतरांनीं आपलें अंतर्याम काय जाणावें? आणि निवारणार्थ बरोबर साधनें तीं काय शोधून काढावी? विचारांतीं पाहूं जातां ह्या सर्वांची गुरुकिल्ली आपणांतच आहे हें कळून येईल. आतां ते आपण कोण? आणि ती गुरुकिल्ली ती कोणती? ह्यांचीं उत्तरें फार सोपीं आहेत. ते आपण ह्मणजे आपला आत्मा होय. ती गुरुकिल्ली ह्मणजे स्वतःचें आत्म्याशीं हितगुज होय. ह्या त्याच्या हितगुजाचें अथवा भाषणाचें स्थान म्हणजे एकांतवास होय. वाचन हा एक उत्तम संस्कार आहे. त्या योगानें आत्म्यास एकांतांतील खरीं सुखें कशीं भोगावीं हें समजतें. हा एक आत्म्याचा वांटाड्या आहे. त्याच्या मदतीनें तो एकांताच्या साम्राज्यांतील एकून एक सुखें शोधून काढील. त्यायोगें अज्ञान जाईल, दुसऱ्याचे हेतु समजतील. ह्याकरितां वाचनसमयीं एकांत पतकरावा लागतो. पुढें त्याचीहि अवश्यकता रहात नाहीं. नंतर कालगतीनें निजानन्द, ब्रह्मानन्द ह्यांच्या लाटा मनावर येऊन धडकत असतात. आतां शांतिसौख्य तें ह्या परतें कोणतें असणार आहे? इष्टसौख्य तें हेंच. मनाची उन्नती ती हीच. येथें एक

ध्यानांत ठेवायास पाहिजे आहे कीं, खऱ्या शांतिसौख्याची उत्पत्ति एकान्तांतून आहे.

उपसंहार, ज्या एकांतवासानें अज्ञानपटल दूर होऊन ज्ञानाचा चष्मा लागेल, ज्यानें दुष्ट मनोविकारांची खळखळ बंद होऊन मनांत शांतिसुखाचा स्वच्छ निर्मळ झरा वाहील, ज्यानें विकारी देह निर्विकारी होईल, एवंच नर नारायणस्वरूपीं मिळेल, त्या एकांतवासाची आज आह्मीं इच्छा करीत आहों. हेच आमचे शेवटचे शब्द. हाच आमचा जीवितमनोरथ. हा पुरविणारा तो एक करुणानाथच समर्थ आहे.

# शरीरसौंदर्य तर मनःसौंदर्य.

* His tongue was framed of music
And his hand was armed with skill
His face was the mould of beauty
And his heart the throne of will

R. W. Emerson.

* स्वारीची वाणी कशी गोड होती. बाहु कसे कुशलतेनें सज्ज दिसत होते. चेहरा जणूं काय सौंदर्यरेषेनें रेखाटलेलाच आहे असा भास होत होता. विशाल छाती तर दृढ निश्चयाचें बळकट सिंहासन आहे अशी साक्ष पटवीत होती.

# शरीरसौंदर्य तर मनःसौंदर्य.

देही आरोग्य चालतें । भाग्य नाहीं यापरतें ॥
रामदास

मनमुराद पैसा, पद्मिनीसारखी स्त्री, बृहस्पतीसारखी विद्वत्ता, पण एक शरीर व्याधिग्रस्त आहे तर हीं सुखें व्यर्थ होत. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनं' हें आर्यकवी श्रेष्ठानें ह्मटलें आहे तें किती प्रचीतीचें आहे बरें? अर्थ दुर्ग ज्यानें सर करावयाचा असतो, काममंदिरांत ज्याचे योगानें प्रवेश होतो, मोक्षस्वर्ग ज्या योगानें दिसतो, त्या स्वशक्तिदीपाची थोरवी काय वर्णावी?

गाल गुळगुळित, चेहरा प्रफुल्लित, डोळे पाणिदार, छाती ठसठसीत असा पुरुष अथवा अशी स्त्री मनांत भरेल कीं, गाल खोल, चेहरा म्लान, डोळे मिचमिचीत, छाती पोकळ, हातपाय काड्या असा पुरुष अथवा स्त्री मनांत भरेल हें ज्याचें त्यानें स्वतःस विचारून पहावें. ह्या दोन चित्रांच्या निवडाआवडीचा निकाल एकदृष्टि क्षणार्धांत कसा चोख रीतीनें करील. हीं अशीं चित्रें बनविणें सर्वतोपरि मानवाच्या हातांत आहे. सौंदर्यमांडणी हा सृष्टीचा मूळ उद्देश दिसतो. पण विद्रुपता आणणें किंवा न आणणें हें जीवाच्या आधीन दिसतें. सृष्टिमाता स्वतः तेज-

दार आहे; व त्या तेजाचा अंश मानवांत उतरलेला दिसतो. पण तें मूळचें तेज जें मलीन कळाहीन दिसतें तें जीवाच्या अज्ञानामुळें व चुकीमुळें आहे. चूक होणें हा जीवाचा धर्म आहे, हें सर्वमान्य आहे; पण चूक ही जाणून बुजून करणें हें अमान्य आहे इतकेंच नव्हें, तर हें पातकांत गणलें आहे. धर्मशास्त्रकारांनीं पुण्य पापाची व्याख्या "परेषाम् हिताय परेषाम् अहिताय" अशी केलेली आहे. ही व्याख्या किती अनुभवानें केलेली दिसते बरें! जी गोष्ट दुसऱ्याच्या हिताकरितां झाली ती पुण्याची झाली. व जी गोष्ट दुसऱ्याच्या अहिताकरितां झाली ती पापार्थी झाली, अशी ह्या वरील वचनांतून अर्थनिष्पत्ति निघते. आतां ह्या दोहोंचा संबंध स्वतःकडे कसा येतो तें पाहूं. जें शरीर स्वतःच्या हितासाठीं व दुसऱ्याच्या सेवेसाठीं आणि कल्याणासाठीं असावयाचें तेंच शरीर स्वतःस निरर्थक, व दुसऱ्यास भार होऊन त्रासदायक व्हावें ह्मणजे पहिल्यानें पुण्याची जोड करणें व दुसऱ्यानें पापाचा संचय करणें असें नव्हें काय? असो, शरीराची योग्य ती जोपासना करणें हें एक जिवास नैसर्गिकतः कर्तव्य होऊन बसलें आहे. पण त्याच्या जोपासनेस विसंवणें व त्यास महत्त्व न देणें ह्मणजे मात्र पाप आहे.

इष्ट हेतूस महत्त्व दिल्याखेरीज त्या हेतूसाठीं विशेष रीतीनें झटावें असें वाटत नाहीं. तोच शरीराचा धर्म आहे. आपला देह आपल्या उपयोगीं पडण्यासाठीं आहे; आपल्या देहानें दुसऱ्याचें हलूभारी होतां येण्यासारखें आहे; आपल्या देहानें परमार्थ साधतां येणार आहे. असें वारंवार मनांत आणल्याखेरीज त्या देहास महती चढत नाहीं व

त्याचें महत्त्व भासत नाहीं. जितकी देहाची थोरवी* ज्यास्त वाटेल, तितक्या देहाच्या जबाबदाऱ्या डोळ्यापुढें उभ्या राहतील. ह्यामुळें त्याच्या जोपासनेविषयीं मनुष्य काळजी वाहतो व तदनुसार तो प्रयत्न करतो. चांगलें आणि वाईट हें मानण्यावर आहे. सुख आणि दुःख ह्या समजुतीच्या गोष्टी आहेत. वाइटाचा आणि दुः-

---

* देहाची महती आपण स्वतः वाढवावी लागते; त्याच्या जबाबदाऱ्या, तदंगभूत असणारे फायदे आपण वरचेवर मनांत आणावे लागतात; देह आनंदाचा कंद आहे. सुख आणि असुख हीं दोन्ही तो प्रसवतो आशा व्यापक आशयाचा डाक्टर मेनवेरिंज यांच्या ग्रंथांतून पुढील उतारा घेतला आहे.

Dr. Maynwaring, in his work on the "Method and means of Health" says—

"you that have health, and know not how to prize it, I'll tell you what it is, that you may love it better, put a higher value upon it and endeavour to preserve it with a more serious, stricter observance and tuition. Health is that which makes your meat and drink both savoury and pleasant, else Nature's injunction of eating and drinking were a hard task and a slavish custom. Health is that which makes your bed easy and your sleep refreshing; that revives your

त्याचा कोळसा उगाळण्यांत काय जीवित अर्थ निष्पन्न होणार आहे? मात्र सुखोत्पत्तीच्या साधनपटावर हा निष्कारण आपला रंग पसरून प्रत्येक कोनास मलीनता आणणारा आहे. तरतरीत जीवास निराशेची कातरी लावूं नये, हें आह्मीं आज ध्यानांत धरावयास पाहिजे. निराशेनें घर घेतलें कीं, काळजी उत्पन्न झालीच म्हणून समजावें काळजी उत्पन्न झाली कीं हिंमत खचते. एक हिंमत खचल्यावर देहांत काय राहिलें? सतेज देह निस्तेज बनतो; व त्यांत पुरुषाचें सामर्थ्य राहत नाहीं. त्या व्यक्तीवर व त्या कुटुंबावर संकट परंपरा ओढवतें, त्यामुळें समाजमालिकेंतील एक पुष्प हरपलें जातें. प्रथमच्या कोळसा उगाळल्यामुळें हें जें संकट

---

strength, with the rising sun, and makes you cheerful at the light of another day; 'tis that which fills up the hollow and uneven places of your carcase, and makes your body plump and comely; 'tis that which dresseth you up in nature's richest attire and adorns your face with her choicest colours. 'Tis that which makes your exercise a sport, and walking abroad the enjoyment of your liberty. 'Tis that which makes fertile and increaseth the natural endowments of your mind and preserves them long from decay, and makes your wit acute, and your memory retentive. 'Tis that which supports the

ओढवलें, तोंच कोळसा उगाळण्याची संवय लावूं दिली नाहीं तर किती बरें होणार आहे बरें? मी, माझा देह, माझी शक्ति, एथून कोणता जीवितहेतू साध्य करणार नाहीं? मी मजकरितां आहें. माझा देह जगाकरितां आहे. दुःखाची आणि वाइटाची उत्पत्ति अज्ञानांत आणि चुकींत कशावरून नसेल. त्या दोहोंच्या शोधांत मी असल्यावर जग हें मला सुखोत्पत्तीनें भरलेलें दिसणार आहे. अशी विचारसरणी जर आह्मीं स्वतःस लावून घेतली व हिचें बाळकडू आह्मीं आमचे पिढीस पाजिलें तर जीवितवन आशांकुरानें कसें फुललेलें दिसेल व देहरोप्याची वाढ कशी झपाट्यानें होत असलेली दृष्टीस पडेल. तेव्हां ह्यावरून असें ह्मणतां येईल कीं, देहाची किंमत आपली आपण वाढविली पाहिजे; व जीवितांत जर कांहीं कर्तव्य असेल तर तें देहजोपासनेचें पहिलें कर्तव्य आहे असें समजून त्याच्या संगोपनीं प्रीतिविषयांत रमतों त्याप्रमाणें रमलें पाहिजे.

**निसर्ग आणि देह.**—देहसंरक्षणास विलासाची राह-

---

fragility of a corruptible body, and preserves the verdure, vigour and beauty of youth. 'tis that which makes the soul take delight in her mansion, sporting herself at the casements of your eyes. 'tis that which makes pleasure to be pleasures and delights delightful, without which you can solace yourself in nothing of terrene felicities or enjoyments.

णी, ऐषआरामाचे भोग ह्या कोणाचीच आवश्यकता नाहीं. सृष्टीचीं शुद्धतत्त्वें हीं त्याच्या वाढीस व सुखास सर्वस्वीं कारणीभूत आहेत. मुंगीपासून गजापर्यंत; चिमुकल्या अंकुरापासून विस्तीर्ण वृक्षापर्यंत वाढीची पाहणी करा म्हणजे त्यांत एका शुद्ध राहणीचें प्राधान्य आहे. तीच त्याच्या वाढीस व तरतरीस कारण आहे हें तेव्हांच कळून येईल. पशुपक्षी सृष्टीनियमाचें उल्लंघन करीत नाहींत म्हणून त्यांच्यांत मानवासारखी रोगाची वाढ नाहीं, हें वैद्यशास्त्र कानींकपाळीं उगीच कां आक्रोश करित आहे? रोगाचें बीज भोगातिरेकांत आहे. व्याधी नाजुक राहणींत आहे. एवंच, शुद्धतत्त्वाचें उल्लंघन व्याधीच्या जन्मास कारण आहे. ईश्वर जीवाच्या सौंदर्याची रचना एकाच साध्या नियमानें करून घेत आहे. निसर्गाच्या तत्त्वांत पंक्तिप्रपंच असा मुळींच नाहीं. जो ह्यांच्या आज्ञा पाळतो तो देहसुख आणि मनःसुख भोगतो. तेथें श्रीमंतीस मान नाहीं कीं गरीबीची अवहेलना नाहीं. तेथें रावाची चहा नाहीं कीं रंकाची निंदा नाहीं. उलट पहिल्या वर्गांतील मंडळी त्याचा निसर्गाचा आज्ञाभंग मात्र करितात. नंतर निसर्ग त्यांना पुरें शासन देतो. इतरांचें शासन तात्पुरतें. पण निसर्गाचें शासन अति कडक आणि कायमचें. शरीर राकट असावें व त्यामुळें मनांतील जोम कृतींत उतरावा, जीवांच्या हातून ऐहिक व पारमार्थिक कृत्यें सुलभतेनें पार पडावींत, अशी त्या जगनियंत्याची मुळची इच्छा दिसते. एका शुद्धतेच्या तत्त्वानें चाललें म्हणजे औषधें नकोत, पथ्य नको, कांहीं नको. मोकळी हवा, साधें अन्न, साधें पाणी, साधें वस्त्र हीं असलीं म्हणजे

झालें.' श्रीमंती देहपोषक आहे, श्रीमंती आवश्यक आहे, ह्या केवळ भ्रामक समजुती आहेत. हें केवळ अज्ञान आहे. भूमातेच्या अंकावर उशाशीं धोंडा घेऊन घोरत असलेला निसर्गदेवतेचा प्रिय शेतकरी बाळ ह्या आणि पराच्या गादीवर लोळत असणारा गर्भश्रीमंतीचा लाडका जीव ह्या आणि प्रकृतीचें अंतर शोधा. पहिल्याच्या तोंडावरची ती तेजी हातापायांचा तो सडसडीतपणा व छातीचा ठसठशीतपणा हें खरें पुरुषवैभव कोठें आणि दुसऱ्याच्या तोंडावरची निस्तेजता हातापायांची कृशता व छातीचा पोकळपणा कोठें? हें मेषपात्र रूप कोणीकडे आणि तें तेजस्वी बाळ कोणीकडे? नाजुकपणा हा स्त्रियानांहि पुरुषाप्रमाणेंच वाईट आहे. मात्र पुरुषाचे अंगीं तो असणें तर फारच वाईट व अनिष्ट आहे. अबलांना सबल पुरुष पाठिंबे आहेत. पण मूळचें सबल असलेल्यांना पाठिंब्याची जरूर लागावी हें पुरुषधर्माला विसंगत दिसतें. अथवा ह्याहि पेक्षां कडक बोलावयाचें झाल्यास हें लांछन आहे असें ह्मणावें लागतें. तेजानें तेजस्विता स्वीकारावी हेंच उचित आहे. पहा बरें, हिऱ्यानें तेजहि धारण केलें आहे आणि काठिन्यही धारण केलें आहे. निसर्गाची आज्ञा पाळणें व स्वतःचा नियमितपणा ठेवणें ह्या प्रधान गोष्टी शरीरसौंदर्य वाढवितात व कायम ठेवितात, हें सर्वांच्या अनुभवास आलेलें आहे. ह्याप्रमाणें चालणें आवडीनिवडीवर ठेवतां कामा नये. ह्या गोष्टी मतभेदाच्या नाहींत. त्या पाळणें हें प्रत्येक जिवाचें कर्तव्य आहे.

**शरीर आणि व्यसन**—शरीर जर पिढीनुजात

व्याधीनें खचत असेल तर तेथें व्यक्ति निर्दोषी आहे. तिच्या व्याधीचें बीजारोपण जर वंशिक असेल तर तिनें काय करावें बरें? ही चूक अथवा हें अज्ञान मूळ पुरुषाच्या वर्तनाचें आहे. भूतकाळची कृती सुधरावयास नेहमीं वर्तमानकाळ समर्थ असतो असं नाहीं. तथापि, उपायसातित्यानें कांहीं गोष्टी साधत असतात. तेव्हां तो करून पहावयाचा एवढेंच येथें कर्तव्य होऊं पहातें. पण प्रकृतीची विकृति होण्यास जो तो व्यसनाधीनतेमुळें कारण असेल तर त्या विपरीत प्रकारास कोणतें दूषण द्यावें? ती कृति किती निंद्य ह्मणून समजावी बरें? सृष्टिधर्मांनीं शरीरास कोठपर्यंत जतन करावें? दर रोज जर व्यक्ति सृष्टीधर्मास सोडूं लागली तर त्यांनीं तरी काय करावें? तारुण्य संपेपर्यंत ते उत्तम सेवाच करित राहतील. शक्ति तोंपर्यंत आपल्या सत्वास जागृत राहील; अपराध सहन करील. पण पुढें काय? तीच अकालीं विलयास जाईल. एवढा श्रमानें मिळविलेला पैसा औषध खोऱ्यानें ओढून घेईल. पचनी होत असलेलें अन्न अपचनी होईल. चाळीशी साठी भासेल! आपली फजीति जनाचें हंसें, आपला दुबळेपणा जगास नाटक, हे देखावे गांवोगांवींच काय पण देशोदेशीं हिंडूं लागतील.

श्रेष्ठ शरीरा, तुझा अधिकार केवढा होता? तुझ्यांत पाणी किती होतें! तुझी दानशूरता काय विचारावी? त्याचें वर्णन माझ्या लेखणीच्या शक्तिबाहेर आहे. नट ह्मणून जेव्हां तुझें कर्तृत्व होतें तेव्हां रंगभुमीवर येतांच खड् खड् खड टाळ्यांचा गजर होत होता. वक्ता होतास तेव्हां श्रोत्यांची तासानुतास तहानभूक हरवित होतास! ' व्या-

पोरांतर टाकुनी तव कथालापासि जे आदरी,' अशी निर्व्यापारी नलचरित्रीं दमयंतीची जी स्थिति होत होती, तीच आह्मा सामान्य जनांची तुझें वक्तृत्व ऐकून होत होती. लेखक होतास तेव्हां तीं विचारमोत्यें पाहून व तें भाषासौंदर्य अवलोकून जीव कसा गारेगार होऊन जात होता व ' गेळे नेत्रीं पाणी न निघति मुखें शब्द सगळे, ' असें सद्गदित अंतःकरण होत्साते आह्मी आनंदसागरांत डुंबत असूं! पण आतां काय! काय गेले भोंकें राहिलीं. सूर्यप्रकाश गेला, संधि प्रकाश राहिला! दुर्दैव आमचें ह्मणून आह्मी ह्या विपत्काळीं तुजकडे पहात आहों. आतां तीं तुझीं व्यसनें कोणतीं हें मीं तोंडांतून काढावें ह्मणजे तुझ्या दुःखावर डागण्या होत. निदान तेवढें तरी अपवित्र काम हातांत घेत नाहीं. समाचाराकरितां आलेल्यांनीं दुःख वाढवूं नये. दुःख वांटून घ्यावें हा शिष्टाचार आहे; आणि तोच मला आवडतो. बंधु नात्यानें ऐवढेंच हितगुज तुजशीं करावयाचें आहे कीं, झाल्या गेल्या गोष्टीचा विसर पाड. आतां तरी सावध हो. सुधारणेस कोणतीही वेळ अवेळीं नाहीं. काळ हातांतून निघून गेला तरी कृतीनें पुढें भरून काढतां येतो. सुकृतीनें दुष्कृतीचा विसर पडावा. सुकाळानें दुष्काळाची विस्मृति व्हावी. वर्षाकाळच्या शीतळाईनें उष्ण काळाचा उष्मा मनांत येऊं नये, हें निसर्गतः लागून आलेलें आहे. तेव्हा तूं तरी खंती का बाळगितोस? तुझी शांतता अवर्णनीय ह्मणून ह्या बंधुप्रेमानें इतकी सलगी केली. दोघांचें रहावयाचें मंदीर एक. दोघांस

१ नलोपाख्यान २ भामाविलास—वामन पंडित.

तरून जावयाची काळनौका एक. तेव्हां पहिल्यास अ-ग्निस्पर्श व दुसरीस छिद्र हीं ह्या बंधूस कशीं पाहवतील तूंच सांग पाहूं? असो, हा व्यसनरूपी भुंगा आमच्या जीवितमंदिरापासून जितका दूर असेल तितका हित-प्रद आहे. ह्मणूनच त्यास जपावयाचें आहे, व ह्मणूनच त्यास दूर ठेवावयाचें.

**देहाचा अधिकार.**—देहाचा अधिकार फार मोठा आहे. इतराची किंमत करतां येईल पण देहाची किंमत कधींही करितां यावयाची नाहीं. परोपकाराचें साधन, कीर्तिमंदिराचा पाया, ज्ञानाची गुरुकिल्ली, मनःसौंदर्याची दीप्ति, अशीं देहासनास किती जरी विशेषणें दिलीं तरी तीं अपुरींशीं वाटतात. ह्या देहाच्या

---

**( १ ) नरदेहाची थोरवी श्री समर्थ अशी गातातः-**

या नरदेहाचेनी आधारें ।। नाना साधनांची द्वारें ।। मुख्य सारासारविचारें ॥ वहुत सुटले ।।१।। या नरदेहाचेनि संबंधें ॥ बहुत पावले उत्तम पदें ॥ अहंता सोडोनि स्वानंदें॥ सुखी जाहले ॥ २ ।। नरदेहीं येऊनि सकळ ।। ऊर्ध्वगति पावले केवळ ॥ येथें संशयाचें मूळ ॥ खंडोनि गेलें ॥ ३ ॥ पशुदेहीं नाहीं गती ।। ऐसें सर्वत्र बोलती ॥ ह्मणोनि नरदेहींच प्राप्ती ॥ परलोकाची ।। ४ ॥ संत महंत ऋषि मुनी ।। सिद्ध साधू समाधानी ।। भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी ।। विरक्त योगी तपस्वी ।।५ ॥ तत्वज्ञानी योगाभ्यासी ।। ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी ॥ पिंडज्ञानी षड्दर्शनी तापसी ॥ नरदेहींच जाहले ॥ ६ ॥ ह्मणोन नरदेहच श्रेष्ठ ।। नाना देहांमध्यें वरिष्ठ ।। जयाचेनि चुके अरिष्ट ॥ यमयातनेचें ।। ७ ।। नरदेह हा स्वाधीन ।। सहसा नव्हे पराधीन ॥ परंतु हा परोपकारीं झिजवून ।। कीर्तिरूपें उरवावा ।। ८ ॥

सामर्थ्यानें एकएकांनीं चिन्मयस्वरूपीं बसवून घेतलें आहे. एकएकांनीं आपल्या ज्ञानानें व परिशीलनानें मानवी ज्ञातीस यावत्‌चंद्रदिवाकरौ उपकारांत ठेविलें आहे. व एक एक पुढेंही ठेवितील ह्यांत किमपिही शंका धरणें नको. ‘ नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ॥ मयानकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ ( भागवत. ११. २०. १७ ) याचा भावार्थ असा; ‘ नरदेह वास्तविक मिळण्यास कठिण, परंतु मिळाल्यावर फार सुलभ अशी सुदृढ नौका आहे. त्या नौकेचा गुरु हा कर्णधार असून मी भगवान् अनुकूल वायु आहें. इतकी सामग्री तयार असतांही जो पुरुष संसारसमुद्र तरून जात नाहीं तो आत्मघाती समजावा. ’ अशी ही परिस्थिति आहे. असा हा देहाचा अधिकार श्रेष्ठ आहे. ह्यास जपून कार्य साधून घेतलें तर धर्माची आज्ञा पाळल्यासारखें आहे. व अंतीं त्या नियंत्याच्या अमोघ देणगीच्या कृतज्ञतेस जागृत राहिल्यासारखें होणार आहे. कर्तव्याची जागृती जिवांस नेहमींच होते असें नाहीं. ती जागृतीची लाट केव्हां उचंबळेल ह्याचा नेम नाहीं. तेव्हां देहधर्म सदैव सुयंत्रित व सुदृढ असलेले बरे. ह्मणजे तिजबरोबर जीवितौघास गति द्यावयास सुलभ जाईल. हें जाणलें ह्मणजे देहाचा अधिकार जाणल्यासारखें झालें.

असो. ह्या विषयाचे **उपसंहारा**दाखल दोन शब्द लिहून प्रिय वाचकांची रजा घेतों. देहाच्या उपसंहाराबद्दल किती लिहूं असें होतें. अंतःकरण स्फुरण पावतें. हृदयांत आनंदाच्या लाटा उसळतात. पण ह्या लेखणींत

तितकी कुशलता नसल्यामुळें विचार तरंग उठावे तसें उठत नाहींत विचाराच्या प्रतिमा बरोबर बनत नाहींत. ह्यास नाइलाज आहे ! जीं शरीरें आत्म्याचीं सुंदर भव्य मंदिरें, सुखाचीं विलासस्थानें, तीं व्यसनदुर्गंधीनें पडकीं मोडकीं अशीं घाणेरडीं खोपटीं करावीं ह्यापेक्षां लज्जास्पदतेची दुसरी गोष्ट कोणती असणार ? ज्या भव्य मंदिरांत बसून 'आयुष्याच्या साधनांनें सच्चिदानंद पदवी घेण्याची' योग्यता त्याच मंदिरावरून व्यसनचा नांगर फिरला जावा व एक हवार रान ह्मणून पाहिजे त्यानें यावें, लत्ताप्रहार करावा, काय हा टिपें आणणारा केविलवाणा देखावा! आत्म्या ! कसलें अमोलीक देहरत्न तुला लाधलें होतें ! पण दैविक इच्छा विपरीत होती ! मानवी कृती अशी भोंवली कीं, तें रत्न तुला धामुक्या जागीं झालें. वेड्या आतां येऊं नको पुनः असल्या कुडींत, तुझे हालहालरे होतील ! असो; हा असला तळतळाट एका देहाच्या निष्काळजीपणामुळें व व्यसनातिरेकामुळें घ्यावा लागला! एवढें ध्यानांत ठेवून मनुष्य व्यसनापासून जर स्वतःस दूर ठेवील तर तो एक लाखांतील गोष्ट शिकला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. शरीरांतील आत्मा ह्मणजे एक दैविक अंश आहे. आणि त्या शरीराला क्लेश ह्मणजे आत्म्याला क्लेश आहेत. हें क्लेश त्याला देणें अनुचित होय, असें जर आम्ही मानूं लागलों तर आज एक जीविततत्त्व शिकलों असें ह्मणावें लागेल.

# मानव.

आ, हा; मनुष्य ही किती अमोलिक चीज आहे! ह्मण आहे 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय' त्याच्या बुद्धीची केवढी प्रौढी! त्याच्या कल्पना कोण आचाट! आकृति काय-चलन! वलनादि व्यापार काय! बोलणें चालणें गंधर्वासारखें! ग्राहकशक्ति साक्षात् ईश्वरासारखी! सारांश, ब्रह्मदेवानें जी अनंतसृष्टि निर्माण केली तिचा हा सर्वोत्कृष्ट मासला होय!

विकार विलसीत नाटक (हॅमलेट)

प्रि. आगरकरकृत भाषांतर.

मानव ह्मणजे ईश्वराच्या लीलापटावरील सुबक चित्र, मानव ह्मणजे निसर्गदेवतेचें चाहतें बालक, मानव ह्मणजे विवेकतेचें व बुद्धिमत्तेचें आगर, मानव ह्मणजे महत्त्वकांक्षेचा अमर्याद सागर, असा हा प्राणीकोटींतील श्रेष्ठ जीव आहे. ह्यांत जें जगन्नियंत्यानें कलानैपुण्य दाखविलें आहे तें थक्क करून सोडतें व असें भासावयास लावितें कीं, ह्यापेक्षां श्रेष्ठ जीव निपजणार नाहीं. पण खात्रीनें कोणी सांगावें त्या कर्तुमकर्तुम् शक्तीचे हातून

एथून अमुक एक होणार, होणार नाहीं, असें आजच कसें मत देतां येईल ! त्याच्या चातुर्याबद्दल, त्याच्या महिम्याबद्दल, 'नेति नेति' ह्मणून वेद जेथें थकले, तेथें तुह्मा आह्मा सामान्यजनाची कथा काय ? असो, अशा कुशल कारागिराचे हातून आपला हा नरदेह निर्माण झाला आहे. यासंबंधीं थोडा विचार करावा असें मनांत आणिलें आहे. आपण फक्त कर्माचे अधिकारी आहों. कर्ता करविता तो जगदीश आहे. तेव्हां 'तूं जरी राखशील पाठी ! तरी ग्रंथ जाईल शेवटीं'[1] ह्या स्वरानें त्यास आळवून कर्तव्यास लागलेलें बरें. साध्य हें त्याचें, चुकी ही आमची; हें कबुल करून येथें टाक लावितो.

**उत्पत्तिः**–पुरुषस्वरूप सर्वांत आहे. **प्रथम पुरुष उत्पन्न** झाला. नंतर प्रकृतीच्या द्वारें सृष्टिविस्तार झाला. कर्त्यावांचून सिद्धता नाहीं हा सृष्ट पदार्थांत जणूं काय नियमच दिसतो. पुल्लिंगवाचक स्वर व्यंजनाच्या साहाय्यास येतो तेव्हां अक्षराची सिद्धता होते. सूर्योदय होतो तेव्हां वस्तूस उज्ज्वलता येते. वास सुटतो तेव्हां पक्वान्नाची सिद्धता लक्षांत येते. प्रथम अंकूर नंतर वृक्ष. प्रथम प्रवाह नंतर सिंधु. प्रथम दगड नंतर इमारत. ही मांडणी निर्जीवांत आहे. सजीवांत पुरुषानें कर्तेपण घेतलें आहे, हें हातच्या कांकणाप्रमाणें दिसतें. तेव्हां त्याची नामावळी वाचावयास नकोच. सृष्टिविस्तारपटाचा आद्यंततु पुल्लिंगवाचक नामांत अथवा पुरुषांत आहे. त्याची शोभारूपी वीण स्त्रीवाचक नामांत अथवा स्त्रींत आहे. असो, आतां **बाल्यावस्थेकडे** वळूं. स्वारीचा

१ श्रीधर.

जन्म मुळीं प्रेमशिंपल्यांतून झालेला; तेव्हां मातापितरांच्या लडिवाळपणाकडे व प्रेमवृष्टीकडे काय पहावयाचें आहे! मातेचा अंक हें ज्याचें बसतिस्थान, पित्याची कृपादृष्टि हें ज्याचें छत्र, अजातशत्रु ही ज्याची परिस्थिति, त्या बाळपणास कशाची उपमा द्यावी हें सुचत नाहीं. फक्त तें एक शुद्धतेची प्रति सुमनोहर प्रतिमा होय, एवढेंच ह्मणून स्वस्थ रहावें लागतें. आतां दुर्दैवानें काचित् प्रसंगीं वक्रदृष्टि फेंकिली असल्यास त्याची थोडी आबळा होते; परंतु प्रभूच्या प्रेरणेनें एखाद्या प्रेमळ सतीकडून किंवा दीनवत्सलाकडून त्याचें संगोपन चाललें असतें. प्राण्यास दैव सोडील पण देव सोडणार नाहीं. पहिल्यानें संहाराचा विडा उचलला आहे; पण दुसऱ्यानें सतीचें वाण घेतलें आहे. तो तें संभाळल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. तिच्या ठिकाणीं अथवा त्याच्या ठिकाणीं प्रेमपाझर फुटवून तो जीवाचें रक्षण करीलच करील. शिवाय स्थितिपरत्वें निसर्ग जिवास संभाळून घेत असल्यामुळें वाढीचें व तरतरीचें काम आपलें अबाधित चाललेलें असतें. वाढीनुसार देखावे उत्पन्न व्हावे आणि तेथें गुणाचा निष्पत्ति व्हावी हा सृष्टिधर्म दिसतो. हीच प्रचीति मानवाच्या ठिकाणीं कशी दिसून येते ती पहा. असाच पांच सहा वर्षांचा मुलगा समोरून येत असावा. त्यानें घर दहावीस पाऊलें सोडलें असावें. तो मध्यंतरीं असा चमत्कार करतो कीं, सरळ टोपी कानावर ठेवतो. हातांत असलेल्या छडीस गरके देत सुटतो. आपल्या वयाचा कोणी भेटल्यास दे त्याच्या श्रीमुखांत, उपट तिचा कान, धर तिसऱ्याची

तंगडी, इतक्यांत कोणी भेडसावल्यास स्वारी मान हालहालवून दांतओंठ खात आहे; आणि तेंहि देखील हंसत हंसतच. सहज चालावयाचें झालें तर निदान दहा बारा पाऊलें तरी नाचत बागडत जाईल. मध्येंच एकादें पोर भेटलें तर राजेश्रींनीं टोपी उडविलीच ह्मणून समजा. ह्यावरून तेज मर्दुमकी विनोदसंमिश्र मायावीपण ह्याचें बाळकडू ह्या वयांत मानवास पाजलेलें दिसतें. अपवादादाखल जर एकादें मेषपात्र दिसत असलें तर तो झांकला वाण आहे असें समजावें. अशांतूनच एकादा हैदरअल्ली निपजत असतो.

**कौमार्यावस्था.**—ही मोठी मजेदार स्थिति आहे. गालावरील ती टवटवी, ओंठांवरचा तो लुसलुशीतपणा, हातापायांची हरणासारखी ती चलाखी व डोळ्यांचें तें तेज हें कुमाराचें स्वरूप पाहून मन कसें आश्चर्यसागरांत डुंबून जातें! असला हा सुंदर निरभिमानी, निर्दोषी व चौकस बुद्धीचा पुतळा पाहून मातापितरांसच काय पण इतरांसही कौतूक वाटतें. जो तो ह्या कुमारास आपल्या कार्यांत प्रवीण करावा, आपल्यास ह्याचा उपयोग व्हावा ह्मणून झटत असतो. तो पहा गुरुजी ह्या शरीरसौंदर्यांत मनःसौंदर्याची मिळवणी करावी ह्मणून सारखा प्रयत्न करित आहे. तो पहा मामा आपला भावी जामात ह्मणून मनाचे लाड व शिक्षणाचें साहित्य पुरवित आहे. कवि आणि तत्ववेत्ते त्याच्या सौंदर्यलकेरिचें व त्या अंतर्गत गुणरत्नाचें प्रकाशन करावयास केव्हांच तयार होऊन बसले आहेत. बरोबरच आहे, गुणाचें चाहतेपण गुणीकडेसच येणार. ह्या रोप्याची वाढ कोणत्या दिशेस

आहे हें ह्याच वेळीं कळून येतें. शृंगाराची पालवी अथवा साधेपणाचें फूल हीं ह्याच वेळीं झळकतात. संगती फांद्या ह्याच वेळीं फुटतात. कुमार वय सुरूच्या झाडासारखें आहे. मातापितरांचे फाजिल लाड नसले, शिक्षण जल वेळोवेळीं मिळत गेलें असलें तर सरळ वाढ होऊन तें सुरम्य दिसतें. येथें कुसंगतीच्या ढुंगण्यास फार जपावें लागतें. कारण, सर्व कांहीं ठीक चाललें आहे पण हे किडे तेथें आहेत तर त्याची वाढ केव्हां बंद होईल हें कळून देखील येणार नाहीं. पाहणी हंगामांत पाहिजे. इतर वेळीं ती अवेळीं होय.

तारुण्यः–तारुण्य ह्मणजे जीवितौघ फिरविणारा वारा, तारुण्य ह्मणजे मनःकांतीची व देहकांतीची रसरशीत मूस, तारुण्य ह्मणजे प्रीतिरसानें माखलेला एक थवथवीत भाला, असें हें अनेक नांवांनीं भूषित झालेलें तारुण्यचित्र सर्वप्रिय होऊन बसलें आहे. विद्यालयास तरुण पाहिजेत. धनी तरुण नोकर इच्छितो. कुमारी तरुणलुब्ध असते. ह्मातारपणीं आपणास खंबीर काठी झाली ह्मणून आईबापांना तरुणास कोठें ठेवूं असें होऊन जातें. असो, आतां पहिल्या तीन वाक्यांकडे पाहूं. पहिल्याच्या गतीनें जीवितौघ कोणत्या ढळ किंवा अढळ स्थानीं जाऊन पडेल ह्याची ह्यासमयीं भीति असते. दुसऱ्या दोन रसांनीं भरलेली मूस सुशील ऐरणीवर येईल कीं नाहीं ह्याची काळजी ह्याचसमयीं लागून राहते. तिसरा प्रीतिभाला कोणतें अपात्र हृदय भेदून टाकील ही शंका ह्याचवेळीं उद्भवते. प्रीतिबाण मानव त्वरेनें सोडतो; हा एक त्याच्या स्वभावांतील दोष आहे.

अथवा असें ह्मणणें भाग पडतें कीं, नैसर्गिक राकटपणा जेथें आहे तेथें मनोवृत्ती शीघ्रगतीनें उच्छृंखळ व्हावयाच्याच. मानव प्रीतीचा भोक्ता आहे, प्रीतीचा पूर्ण चाहता आहे; पण असावा तितका पोषक नाहीं. प्रीतिपात्राकडून आसक्ति–अंकुराची जोपासना होत असतां बहुधा अंतीं पुरुषाकडून ढिलाई होते. ह्यास बलवत्तर कारण ह्मणजे पुरुष विचारानें प्रीति देत नाहीं ह्मणून. आतां प्रीतिमणी आमरण कंठीं बांधणारे अ हेत, पण स्त्रीपेक्षां प्रमाणानें कमी. प्रीतिदेवते, स्त्रीसारखा तुझा निःसीम भक्त जर पुरुष राहील तर खरोखर आह्मी ह्मणतों कीं, संसारवृक्षांतून सदैव अमृतरस वाहील, एकीचीं मनोहर फुलें फुलतील, शांततेचीं फळें लटकतील, व अंतीं आहे ह्यापेक्षां गृहांत सौख्य नांदेल, समाजांत बंधन राहील व राष्ट्रांत एकी वाढेल. तारुण्यास एका असमान शक्तींत गणिलें आहे. अशक्य असें त्यास कांहींच नाहीं. त्याचें मन घेईल तर ते अक्षय स्वर्गसुख भोगील. मनांत विपरीत आणील तर नरकांत खितपत पडेल. तारुण्यांत धैर्य, उत्साह, महत्त्वाकांक्षा ह्यांनीं कसा पेट घेतलेला असतो. मनःप्रसन्नतेच्या लाटांवर लाटा उसळत असतात. मानाची इच्छा, अपमानाचा त्वेष व फसवणुकीचा सूड ह्या विचार व विकार काहुरांनीं डोक्यांत मनांत एकच गर्दी उडवून दिलेली असते. ह्यावेळीं सुसंगती आणि सुशिक्षण मिळेल तर काय बहार होईल बरें! सुशिक्षणानें स्व आणि पर केव्हां साधिलें नाहीं? सुविचारानें प्रेरणा आणि प्रेरकता कोणास उत्पन्न झाली नाहीं? एक तारुण्यवा-

243

रूची स्वैरगती आंवरून धरिली ह्मणजे सर्व साध्य आहे, महाराष्ट्र कविश्रेष्ठानें ह्मटलें आहे "कीं ! काय अशक्य तया, जो नम्र महाविभूति धव चरणीं" अहाहा ! हें किती अनुभविक वाक्य आहे बरें ? ज्या तरुण मनावर नम्रभाव बिंबला, ज्याला लीनतेचीं तत्त्वें समजलीं त्याला शिक्षणाचें पूर्ण रहस्य समजलें, त्याला जीविताचीं धोरणें कळलीं, असें ह्मणण्यास कांहीं हारकत नाहीं ? पुरुषाचा खरा दागिणा ह्मणजे लीनता होय. खरें विद्वत्वरत्न सदैव लीनतेच्या कोंदणास शोधित असतें. एवढे महा ज्ञानी मुक्तेश्वर पण स्वतःविषयीं ह्मणतात 'व्यासें वाढितां जगातें । ग्रास लाधिला जीर्णकवींतें । त्या मुखींचीं उच्छिष्ट शितें । म्यां दुर्बळें वेंचिलीं ॥ एक एक अक्षरांची भीक । जीर्णकवींतें मागुनी देख । मी सर्वज्ञ कविनायक । ऐसें ह्मणविलें लौकिकीं ॥' महाराष्ट्र भाषा सुंदरीवर सुसंस्कृततेचा भरजरी शालू घालणारे मयूरकेवी ह्मणतात 'परंतु बहु मंद मी, ह्मणुनि सत्कृती वीटती. । ' 'संता पायींची वहाण ' हे साधुवर्य तुकोबाराबाचे शब्द रसिक वाचकांच्या कर्णरंध्रीं गुणगुणत असतीलच. थोरांची विद्वत्ता थोर. थोरांची लीनताही थोर. थोरांचे सर्वच थोर. उत्तमोत्तम ह्मणून जरी ह्यांना उपमा काढिली तरी ती कमी दर्जाची ठरते ! लेखणी ! धिक्कार असो तुला कीं तूं ऐन प्रसंगीं मला ठकविलेंस ! माते लीनते ! आमच्या अणु रेणु ज्ञानावर तूं आपलें वस्त्र झांकशील काय तुझ्या अनुग्रहानें आमचें तारुण्य

१ मोरोपंत शल्य पर्व २ सभापर्व ३ केकावली

शोभिवंत होणार आहे ह्मणून तुला ही प्रार्थना. लेंकराची आस मातेनें पुरवूं नये तर कोणीं पुरवावी? तूंच सांग पाहूं?

**उद्धारक दृष्टीनें** मानवाकडे पाहूं. सर्व सृष्ट पदार्थ यथाशक्ति उद्धारकाचें काम करित आहेत. दूषित हवेस गंध वाहून नेतो. पाणी दुर्गंधीविनाशक आहे. प्रकाशाचे हितकर परिणाम आपण पहात आहों. अग्नी प्रभू आहे. अग्नी दास आहे. एवंच माफक वापरल्यास अग्नीच काय सर्व गोष्टी उद्धारक आहेत. फार तर काय सांगावें? लहानशी चीप बलीस उपयोगीं पडून उद्धारकाचें काम करिते. आतां वर डोळे करून पाहणाऱ्यास तिची ठेंच लागून तिजपासून कायमचा देखील दगा होतो, हें आपण बरेंच वेळां ऐकिलें आहे. ह्यांवरून उपयुक्तता सर्व दिसणाऱ्या व भासणाऱ्या गोष्टींत आहे. फक्त दृष्टींत डोळसपणा व समसमानता ह्यांची कायती उणीव असते. सृष्टीनें आपल्या धर्माप्रमाणें स्वरूपाची व पदार्थांची मांडणी केली आहे. मानवानें आपल्या धर्माप्रमाणें तिची उपयुक्तता व सत्यता पहावयाची व जनसमूहांत मांडावयाची आहे. प्रकाश, गंध, जल व अग्नी ह्यांकडे जर उद्धारकाचें काम आलेलें आहे, तर ह्यांची उत्पत्ति ज्याकरितां केली त्या मानवाकडून ह्याकरवीं विशिष्ट पवित्र कार्यें घडवून आणवावीं व यावीं असा ईश्वरी संकेत असलाच पाहिजे. नाटकांतील सूत्रधार जसा नाटकांतील संविधानकाचा सूचक असतो तसा मानव सृष्टिरंगभूमीवरील वस्तूंचा हेतु निवेदक आहे. निवेदन करण्याचें काम चांगलेंच आहे पण निवेदन करून

तदनुसार कृती करणें हें उत्तम आहे. वस्तूचा उद्धार करावयाचा ह्मणजे काय ? तर तिची पाहणी करून तींतील मंगल स्वरूपाचें ह्मणजेच सत्यतेचें प्रकाशन करावयाचें. जीवाचा उद्धार करावयाचा ह्मणजे काय ? तर त्यास संकटांतून मुक्त करून सुरक्षित मार्गावर आणावयाचें. मग तीं संकटें मानसिक असोत व शारीरिक असोत, त्या भेदाभेदाकडे आपणास पहावयाचें नाहीं. फक्त त्यांतून मुक्त करण्याचें व्रत आपणास घ्यावयाचें आहे. हें व्रत पतकरोंन ह्मणून आत्म्यानें ह्या श्रेष्ठ कुडींत जन्म घेतला आहे, कल्पनेनें त्याचें अर्धांगित्व पतकरलें आहे व विचारमित्रानें सहाकारी होईन ह्मणून कबूल केलें. आतां स्वतःची तयारी पाहिजे. जीवित अनेक नात्यांसह जन्मलेलें आहे. त्या नात्यांच्या कर्तव्यांतून सुटणें हा जीवितधर्म समजला आहे. मानव उद्धारक आहे तेव्हां त्यानें हे धर्म पाळले पाहिजेत. पुत्र ह्या नात्यानें मातापितरांचे उपकारांतून सुटणें हा मानवाचा पहिला व श्रेष्ठ धर्म समजला आहे. ' धर्मेच अर्थेच कामेच ' ह्मणून पत्नीची इच्छा पुरवीन, तिचा प्रतिपाळ उत्तमोत्तम करीन, अशी अग्नीसमोर कुलदेवतेसमोर जी शपथ घेतली असते ती पाळण्याचा दुसरा पतिधर्म. तिसरा पितृधर्म. चौथा विद्यासंस्कारानंतर नागरिक धर्म. पांचवा ज्या प्रभूच्या कृपेनें आपणास ऐहिक व्यापार करतां येतो त्याचे धन्यवाद गाण्याचा धर्म. ह्या पांची धर्मांकडे विहंगमदृष्टीनें पाहूं.

**पुत्रधर्मः**—माता ह्मणजे सृष्टीचा विस्तार. माता ह्मणजे जीवाचा आधार. मातेपरतें अन्य दैवत नाहीं. मातेसार-

सें अकृत्रिम प्रेम अखिल त्रिभुवनांत सांपडणें कठिण. जगरूपी बाजारी सहृदय अंतःकरणाचा बाप मिळेल. पण प्रेमाचा पान्हा सोडणारी आई मिळणार नाहीं. । इतरांचें प्रेम दिल्या घेतल्यानें 'पण आईचें निरिच्छ आणि तेंहि अखंड. ' निरासकीं मा ' ही म्हण उगीच कां पडली आहे ? ' मातृदेवो भव ' ह्मणून प्रथम आईस नमस्कार करा, असा आचार्यांचा शिष्यास प्रथम उपदेश असतो. मोरोपंत ह्मणतात 'ह्मणूनि म्हणती भले' न ऋण जन्मदेचें फिटे. ' मातेस विशेषण द्यावें ह्मणून कोशांतून उत्तमोत्तम शब्द काढिला तरी तो योग्यच आहे असें वाटत नाहीं. फक्त ती पूज्यदेवता आहे असें ह्मणून निर्वाह करावा लागतो. इकडे मूल कण्हत असावें तों तिकडे आईच्या डोळ्यांतून टपटप टिपें गळत असावीं. बापानें दुःखाचे सुस्काऱ्यावर सुस्कारे टाकून चिंताक्रांत होत असावें ! पोटचा गोळा नसतांहि दीनवत्सल कण्व ऋषींच्या तोंडून शकुंतला सासरीं जात असतां ' मी वनवासी स्नेही हिचा पण वियोग सहवेना । न कळे कैसें गृहस्थ सोशिती कन्या विरहांना ' ! । हे कै-

---

१ आर्यधर्म ग्रंथांतून मातेची योग्यता फार मोठी मानली आहे. याविषयीं पुढील वचनें पहाः-( १ ) ' न मातुः परदैवतम् । ( २ ) सर्ववंद्येन यतिना प्रसूर्वंद्या प्रयत्नतः । ( ३ ) पितृतोऽपि गुरुर्माता नास्ति मातृसमो गुरुः । पतिता गुरवस्त्याज्या मातानैव कदाचन । गर्भधारणपोषाभ्यां तेन माता गरीयसी ॥ ( ४ ) उपाध्यायान दशाचार्य आचार्याणां शतं पिता । सहस्रं तु पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते. ॥

व्योद्गार निघतात व ढळढळ अश्रुपात होतो! मग प्रत्यक्ष बापाच्या अंतःकरणास किती पीळ पडत असेल ह्याची नुसती कल्पनाच करावी. अशी ही बापाची प्रीति! अशा प्रेमसागराचें मुलांमुलींनीं हलकुभारी होणें हें त्यांचें आद्य आणि पवित्र कर्तव्य नव्हे काय? शक्य तेवढ्या उपायांनीं त्यांचे कष्ट चुकवावें. पितृसेवीं मातृसेवीं शरीर झिजवावें. वृद्धापकाळीं इकडचा तांब्या तिकडे करूं देऊं नये, त्यांचें दुःख तें आपणास विंचवाची नांगी, त्यांचा बोल तो आपणास प्रमाण, असें जर चाललें तर कांहीं पुत्रधर्म संभाळल्यासारखें आहे. पांचही पांडव महाप्रतापी, महा पुण्यशील पण कुंतीच्या कसे अर्ध्या वचनांत होते बरें? आजपर्यंतचे सर्व विख्यात पुरुष पराकाष्ठेचे मातृभक्त होते. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या मातोश्री जिजाबाईच्या पायांवर मस्तक ठेवल्याखेरीज केव्हांहि गृह सोडीत नव्हते. असो; व्यवहारांत देवघेव झाली तर आपण एकमेकांचे आभार मानतों; मग जेथें देहाचें देणें झालें, रजाचा गज केला,

---

१ सुपुत्र कोणास ह्मणावें ह्याविषयीं 'महाभारतांत' असा उल्लेख आहे:--पिता गुरु, पिता देवो, । पितृ सेवे शरीर जावो । ऐसा ज्याचा निश्चय भावो । तो एक धन्य पुत्र ॥ ७८ ॥ अपूर्व तितुकें दे आवडी । वेंचूं नेणे जोडिली जोडी, । बहुकाळ वांचो हे गोडी । धरी तो धन्य सुपुत्र ॥ ८१ ॥

( मुक्तेश्वर-सभापर्व )

प्रजा कशी असावी ह्याची मयूरकवींनीं सहजी लपेटीनें पण किती समर्पक व्याख्या केली आहे ती पहा:-' बापा! प्रजा अशी जी, पितरासि भवार्णवांत सुतरी, ती,

( आदि. अ. २९ )

श्री ग पासोन ॐ जाणण्यापर्यंत शक्ति आली. पूर्वी कांहींच नव्हतें तेथें हें अपूर्व जग दाखवून दिलें. त्या मातापितरांचे आभार सहस्रशः मानणें हें जीवाचें पवित्र कर्तव्य होऊन बसतें. खोडानें चंदन वृक्षाच्या पोटीं जन्म घेतलेला आहे, तर स्वतःस झिजवून घेणें हेंच त्यास उचीत होय. त्या झिजेवरोवर गंध सुटून दाहि दिशा दणाणतील हें काय थोडें बाक्षिस आहे ?

पती—मसलतीच्या[1] कामांत प्रतिप्रधान, सेवेंत जणु काय दास, भोजनसमयीं प्रत्यक्ष माता, शयनाचे वेळीं रंभा पुतळी, धर्मकार्यीं सदा संमत, क्षमाशील पहावी तर पृथ्वीसारखी. असें हें भार्यारत्न सहा गुणालंकारांनीं विभूपित झालेलें आहे." तेव्हां त्याची थोरवी किती वर्णन करावी ! असल्या रत्नाचा अधिपती मानव आहे. अशास पाहिल्यावर 'पहातां प्रियानें प्रियेचे मुखासीं त्रिलोकामध्यें दाटि झाली सुखासी' कां वाटणार नाहीं ? आह्मास वाटतें कीं स्त्री हा पारा आहे. आणि पुरुप ही कांच आहे. दोघांचें एक रूप झालें कीं, जगास सुंदर आरसा दिसणार आहे. 'पाऱ्या तूं काळजी करूं नकोस तुझा स्वार्थ मला समजला. तूं माझ्या बंधूचा पाठिंवा आहेस. त्यास प्रकाशांत आणि स्वतःस अंधेरांत ठेवून घेतलेंस ह्यांत खरोखर तुझी थोरवी आहे. त्याला गृ-

---

१ कार्येषु मन्त्री करणेपुदासी भोज्येषुमाता शयनेषु रम्भा ।
धर्मानुकूला क्षमया धरित्री भार्याच षाड्गुण्यतीह दुर्लभा ॥२७
सुभाषित रत्नभाण्डागारम्—सतीवर्णन

२ राधाभुजंग—वामन पंडित.

हमंदिरांत ठेविलें वा समाजांत लटकविलें वा राष्ट्र राज-
वाड्यांत मांडिलें तरी त्यास सुंदरपणा व मानमा-
न्यता तुझ्याच सहवासानें आली आहे; हें मी जाणून
आहे. माझा बंधुहि रसिक आहे. तो तुला सुखाच्या
चौकटींतच ठेवील. कारण त्यालाहि त्याचेयोगानें भूषण
ला दुखविलें तर त्याला डाग अगर छिद्र पडणार
तो पक्कें समजून आहे. आणि यदाकदाचित्
ागृति द्यावयाची झाली तर तुझ्या कविवंधूंना
ती करीन. ते न कळत पद्यरवानें त्यास कर्तव्यीं
... ..ळ. सध्यां हें रूपक आह्मीं पती म्हणविणारांनीं
ध्यानांत ठेविलें तरी पुष्कळ आहे. आपलें दुसऱ्याच्या
स्वाधीन करावयाचें असलें म्हणजे आपण त्याच्या रक्ष-
णाविषयीं किती आर्जवानें काळजीनें सांगतों बरें? पण
तेंच दुसऱ्यांनीं आपल्या स्वाधीन केलें तर त्याच्यावि-
षयीं आपण प्रसंगीं बेफिकीरपणानें वागतों. हा प्रकार
चांगला काय? हीच गोष्ट स्त्रीरत्नासंबंधीं आहे. मेहु-
ण्याशीं गोड कां वागावयाचें तर त्यानें आपल्या बहि-
णीस बरें पहावें, तिला बरें वागवावें म्हणून. मग बहि-
णीबरोबरची जी मेहुण्याची बहीण असते तिजशीं के-
व्हां केव्हां तरी विषम भाव कां? हा असा मानवी स्व-
भावच आहे, असें जर म्हणावयाचें असेल तर ती बाजू
लंगडी आहे. विचारांत जर शिरावयाचें असेल तर आप-
ल्या इच्छेप्रमाणें दुसऱ्याच्या इच्छेस मान द्यावयास पा-
हिजे आहे. स्त्रीप्रेम समुद्रासारखें आहे. त्यांत वर वर
पाहिलें तर शिंपल्या मिळतील. सलगीच्या घाटीनें आंत
उतरल्यास अमोलिक मोत्यें सांपडतील. इतराचा

तळ लागेल, पण प्रीतीचा तळ लागणार नाहीं. स्त्री विनयानें चालेल तर पुरुपदृष्टी वेधील. ती प्रेमकटाक्ष फेकील तर चित्त आकर्षण करील., स्मित हास्य वदनानें बोलेल तर आनंदाच्या लाटा उसळवील. हात फिरवील तेथें मंगल करील. काटकसर करील तर गृहसमृद्धि करील अशीं मोत्यें ह्या प्रेमसागरांत किती तरी भरून राहिलीं आहेत. हीं वेंचावयास एक सलगीची बुडी, एक प्रेमाचा शब्द, अथवा एक मायेचा हात देखील पुरेसा आहे. पतीपासून हेंच त्या इच्छितात. आणि पतीनें एवढेंच दिलें तर त्या खूप असतात. असो; जाईचा वेल वाढवावा तसा व्यवस्थित वाढून मनाला व दृष्टीला संतुष्ट करणार आहे. माळ्याचें धोरण फक्त तारतम्याचें आहे. असाच पतीचा स्त्रीशीं संबंध नाहीं काय ?

**पिता**—पिता प्रति सृष्टिनियंता आहे. पिता दीनवत्सल आहे. पिता विद्यादानानें पुत्रास सुपुत्र, कन्येस सुपति व सुमाता करणारा हितकर्ता आहे. समाजाचे धुरीण व राष्ट्राचे आधारस्तंभ पित्याच्या जोपासनेमुळें झालेले असतात. पिता हा कुंभकार आहे. त्याचें शिक्षण अथवा त्याची इच्छा हें चक्र आहे. त्याच्या सभोंवार मुली मुलें हे अज्ञान–मृत्तिकेचे गोळे आहेत. ह्यांस जसें तो स्वरूप देईल तसें तें दिसणार आहेत. घडतांना घट चांगले घडावे. कच्चेंपणीं त्यांना चांगला आकार द्यावा. त्यांच्या कष्टांतून मुक्त व्हावें. हेंच पित्याचें कर्तव्य दिसतें. आतां मद्याकरितां ह्मणून केलेले घट मद्यास जाऊं लागले. दुधाऐवजीं कुसुंबा पिऊं लागले. वा-

णाच्या सुगडा ऐवजीं चावडींत देशमुख होऊन व-मृं लागलें तर त्यांत बापाचा अपराध काय आहे? गुण दाखविणारांनीं गुण उधळावे ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे! आपलें नांव बुडले तरी हरकत नाहीं पण मुलानें स्वतःचें नांव केलें ह्मणजे झालें, अशी बापाची पूर्ण इच्छा असते. पण मुलांना हें समजतें कुठें? तीं आपल्या तारुण्याच्या घमेंडींतच असतात. विचार लहानपणींच केला पाहिजे तो थोरपणीं सुचून उपयोग काय? राबतां मळा, गातां गळा, लिहितां अक्षर, वाचतां ज्ञान. ह्या पित्याच्या बोधामृतगुटिका लहानपणींच प्राशन केल्या पाहिजेत. हे ह्याचे गुटके भावीकाळीं अत्यंत महत्वाचे आहेत. असो. जाणतेपणाच्या गोष्टी लहानपणीं कळत नसतात, हें मानवी स्वभावास अनुसरूनच आहे. तथापि टाकीचे घाव मारिले पाहिजेत. देवपण आणून दिलें पाहिजे. नराचा नारायण केला पाहिजे. **मुलानें धनानें श्रीमंत झालें नाहीं तरी हरकत नाहीं पण मनानें श्रीमंत झाले पाहिजे.** हें प्रत्येक बापानें इच्छिलें पाहिजे. ह्या इच्छेनुसार जो वर्तेल तो पिता पितृधर्मांतून सुटेल. पायास पाया असा उभा केला पाहिजे कीं, जनदृष्टीनें त्याकडे पाहून कांहीं वेळ थक्क झालें पाहिजे. आजच्या राष्ट्रउपवनांत निवडुंगाची लागवड नको. तो हवा तेथें वाढतो. आज गुणाच्या लतिका, कीर्तीचे पारिजातक, व सुप्रसन्न गुलाबछत्रु यांची लागवण झाली पाहिजे.

---

१ देशावर चावडीमध्यें जें मातीचें पिकदाणीपात्र असतें त्यास 'देशमुख' ही विशेष संज्ञा आहे.

**नागरिकत्व**:–जीवितांत असा एकदां काल येत असतो कीं, त्या वेळीं मनःप्रसन्नतेस भरतें येत चाललेलें असतें, सुविचाराच्या लाटा उसळत असतात. स्वतःकडे पाहिलें पण जनांकडे पहावयास अगदींच कसा विसरलों? केवढी ही चूक झाली! एवढे उदात्त विचार ऐकिले व वांचले. स्वार्थत्यागाचे असे असे पुतळे पाहिले. पण मी कांहींच केलें नाहीं अं! हे जन्मा, धिक्कार असो तुला!! ही माझ्या बागेंतील जुई बाविस वर्षांची, पण जनाला आज जवळ जवळ दोन युगें झालीं सारखा आपला आल्हाद देत आहे व जनदृष्टी रमवून घेत आहे! आणि मीं तीस वर्षांचा तरुण होऊन जनसंतोषासारखें परोपकाराचें कांहींच कसें केलें नाहीं? ' जगावें परी कीर्तिरूपें उरावें ' हा चरण कितीदां तरी घोकला. पण तें ज्ञान पुस्तकीं राहिलें! कर्मकांडाची परिसमाप्ति उंबरठ्यापासून दिवाणखान्यापर्यंत, दिवाणखान्यापासून चुलीपर्यंत ' अगे ' आणि ' कायरे,' म्हणण्यांत झाली! तसा वेडगळ म्हणावें तर तसाहि नाहीं. असो; होऊं नये ती चूक झाली. पश्चात्तापानें कोण पुनित झाला नाहीं ' अद्याप तिशींत आहे.

---

१ ' अद्याप हा शब्द लिहितांच आह्मांस विद्यालयांत टिपून घेतलेल्या एका उताऱ्याची आठवण झाली. तो आमच्या प्रिय वाचकांना खात्रीनें वाचनीय व सरस वाटेल म्हणून देत आहों.

' Calculation of Life '

Thou art aged, but recount
Since thy early life began,

आपलेपणाची ओळख विसरलों नाहीं. अजून मनांत जोम आहे.

---

What may be the just amount
Thou should'st number of thy span :
How much to thy debts belong.
How much when vain fancy caught thee.
How much to the giddy throng,
How much to the poor who sought thee,
How much to thy lawyer's wiles,
How much to thy menial crew,
How much to thy lady's smiles,
How much to the sick bed due.
How much for thy hours of leisure,
For thy hurryi ng to and fro,
How much for each idle pleasure ;
If the list thy memory know,
Every wasted, mis-spent day,
Which regret can never recal ;—
If all these thou tak'st away,
Thou wilt find thy age but small :
That thy years were falsely told,
And, even now, thou art not old.

Fean Antoine

De Baif

आणि कृतींत तो येईल ह्याची खात्री जरी नसली तरी बरीच आशा आहे. गाजावाजा न करितां आपण आपली देशसेवेची निराळीच दिशा पतकरावी हें बरें दिसतें. आशाहि मनोवृत्ती वाहत असतात. ह्याच कालास आह्मीं नागरिकत्वाचा काल असें समजतों. नागरिकत्वाचा काल लेचापेचा नसतो. तो विद्येनें विभूषित झालेला असतो. ज्या विद्येनें विनय बाणावा, ज्या विद्येनें विचारसामर्थ्य वाढावें, जिनें क्षुद्र बुद्धि नष्ट होऊन उदार बुद्धीचा विकास करावा, जिनें जग हरिरूप दिसावें व त्या दृष्टयनुसार कृतीनें चालावें, त्या विद्यामृताचे गुटके पूर्ववयांत गुरूजींनीं पाजलेले असतात. अशा संस्काराचा वास्तविकतः हा काल आहे. गुरूशीं कृतज्ञता बाळगणें हेंच त्यांना वेतन आहे. जसें घेतलें तसें दिलें पाहिजे. जसें मिळालें तसें खर्चिलें पाहिजे. ही व्यवहारमांडणी आहे. व्यवहाराकारितां आपण जगरूपी बाजारीं आहों. तेव्हां बाणलेल्या विनयाप्रमाणें, आलेल्या विचारसामर्थ्याप्रमाणें व विकास पावलेल्या उदार बुद्धीप्रमाणें कृतीस वळण दिलें पाहिजे. व नागरिकत्वाच्या कालाचें सार्थक केलें पाहिजे. दीनांचा कनवाळू, नगराचा पिता, राष्ट्राचा हितकर्ता व राजाचा सल्लामसलतगार आहे. राजद्वारीं प्रजेच्या गाऱ्हाण्याचें तुणतुणें वाजविणारा गोंधळी म्हटला ह्मणजे नागरिक होय. खऱ्या नागरिकत्वाचा जन्म कळवळ्यांतून आहे; कीर्तीकारितां हपापलेल्या जंतूंतून नाहीं. खरें नागरिकत्व सत्याची चाड म्हणून प्रगट झालेलें असतें. वृथा अकांडतांडवाच्या ज्वालांनीं तें कधींहि पेट घेत

नाहीं. खऱ्या नागरिकाचा जीवितहेतु जगण्यासाठीं नसून जगविण्यासाठीं असतो. " परकीयापेक्षां स्वदेशीय, अविवाहितापेक्षां विवाहित, नास्तिकापेक्षां आस्तिक नागरिकत्वाचें कर्तव्य उत्तम बजावील. " नागरिकत्वाच्या दृष्टीनें मानव-हिरा झळकावा तसा झळकलेला दिसत नाहीं. शंभरांतच काय पण हजारांत देखील पदरास खार लावून घेत असलेला स्वार्थत्यागाचा पुतळा दिसत नाहीं! ह्यास बलवत्तर कारण एक लोभातिरेक आहे. शिक्षण आहे, वाचन आहे, तारुण्य आहे; पण उदात्त हेत्वर्थ जन्म घालवावा ही इच्छा नाहीं. काळा, सध्यां चमकत असणाऱ्या नागरिक ताऱ्यांना दीर्घायु कर, हीच तुला विनंति आहे.

आतां पांचव्या धर्माकडे वळूं. ज्या अनंताच्या कृपाप्रसादानें सृष्टींतील सर्व व्यापार आपणास अबाधित करितां आले. त्याच्या चिंतनीं आत्म्यास रमवूं देणें हें देहाचें खरें सार्थक्य समजलें आहे. संकटांत प्रभूस आळवावा. दुःखांत त्याचें स्मरण करावें. वृद्धापकाळ त्याच्या भजनास ठेवलेला आहे. ह्या किती अज्ञानमूलक समजुती आहेत बरें? कार्यापुरता मामा समजणें ही समजूत मुळीं कोत्या बुद्धीची आहे. त्यांत प्रभूसंबंधीं अशी असणें हें अत्यंत लाजिरवाणें आहे. ज्या प्रभूनें ज्ञानमंडित करून सदसद्विवेकाची ज्योत हृदयमंदिरीं ठेवून अशा दुर्लभ नरदेहांत जन्मास घातलें; गर्भवासांत अनेक संकटांतून मुक्त करून प्रकाशांत आणिलें, त्या प्रभूच्या नामस्मरणास वेळ आणि अवेळ ह्या कोण भ्रामक समजुती

१ बिशप बर्कले यांच्या एका ह्मणण्याचा मतितार्थ.

हेत. " मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥ मामेवैष्यसि युक्त्वैमात्मानं मत्परायणः " (गीता अ.९) हें श्रीभगवानाचें वाक्य विस्मृतींत ठेवल्यावर आमच्या जन्मांत काय राहिलें! इतर जन्म विजोडीचे आहेत. नरजन्म जोड करणारा आहे. इतर जन्मांत ज्ञानसाधन नाहीं, ह्या नरजन्मांत तें साधन सर्वस्वीं साध्य आहे. एथें चुकलें ह्मणजे सर्वस्वीं मुकल्यासारखें आहे. अलभ्य लाभ जो संतसहवास तो ह्या देहांतच आहे. त्याच्या भजनीं अनुदिन जितकें रममाण होईल तितकें इष्ट आहे. त्यांत जसजसें तल्लीन व्हावें तसतसें मनःप्रसन्नतेस भरतें येतें व कर्तव्यास मन उल्हासानें उद्युक्त होतें. काळ हें आपण त्यापासून घेतलेलें मुद्दल आहे. नामस्मरण हें त्याचें व्याज आहे. तथापि धर्मोचित वागलें तर तो प्रभु धनको ' सर्वांची फेड झाली; मला कांहीं देऊं नकोस, ' असेंच सांगणार आहे. ' मुद्दलांत मुक्ति देणें ही कोण्या ावकारिची रीति ? ' हा आर्यार्ध सर्वत्र सुप्रसिद्ध आ- च. असो. त्याच्या क[illegible] आह्मांस दुसरें गायन नाहीं. त्याच्या पदीं लीन [illegible]ापरतें आह्मांस दुसरें भूपण नाहीं; आर्यावर्तातील यच्चयावत् संत तरुणपणीं नामीं रमलेले आहेत. त्यांच्या कृतींचेंच आज आपण परिशीलन करीत आहों. ही त्यांच्या कर्तृत्वतेची एक मोठी साक्ष आहे. तसें भजन तो करवून घेवो, तसें कर्तृत्व तो आपणास देवो, ही आपण सर्वांनीं त्यास प्रार्थना करावयाची आहे.

**उपसंहारः**—आर्य बाळांनो, कुमार असाल तर बंधुनात्यानें सांगतों कीं, मातापितरांशीं सदैव कृतज्ञ-

बुद्धीनें वागा. मातेचा लडिवाळ हात आणि पित्याची कृपादृष्टि नसती तर ह्या सृष्टिरंगभूमीवर. अशा मुसमुशींत तारुण्यानें व मनःप्रसन्नतेनें झळकलां असतां काय? अंगच्या त्वचेचे जोडे करून जरी मातापितरांच्या पायांत घातले तरी तुह्मी त्यांचे पूर्ण उतराई होणार नाहीं. तथापि, यथाशक्ति त्यांना शारीरिक व मानसिक संकटांतून मुक्त करावें हा सुजनसंमत मार्ग आहे. बंधु हो, मित्र ह्या नात्यानें तुह्मांशीं हितगुज करावयास मला कांहीं भीति वाटत नाहीं, ह्मणून सलगीनें एवढेंच सुचवितों कीं, आपण पति आहों, पिते आहों, तेव्हां अर्धांगीस दुखविल्याचें व मुलाची आबाळ केल्याचें पातक सहसा घेतां कामा नये. आर्यावर्तांतील पिते ह्मणजे आपल्या प्रिय बालकांचे विश्वासु चाकर आहेत, तेव्हां त्यांना ही सूचना वृथा होय. पण अर्धांगीची क्वचित् प्रसंगीं हेळसांड होते ह्मणून ही लेखणी प्रार्थना करीत आहे. अनाथास सनाथ केलें पाहिजे. विव्हलांचीं दुःखें पाहून आपला जीव तिळतिळ तुटला पाहिजे. जनाचें जें दुःख त्या आपल्या डागण्या होत, त्यांचा आनंद ह्मणजे आपला सुदिन होय. अशा उच्च मनोवृत्ति वाहूं दिल्या पाहिजेत व पूर्वजांची कृति मननांत व जनपठनांत आणीन अशी शपथ घेतली पाहिजे. तर कांहीं कर्तव्य अणुरेणु उचलला जाणार आहे. वृद्ध सुजनहो, मीं तुम्हांपुढें काय बोलावें? तथापि ओघास आलें ह्मणून विज्ञप्ति करून म्हणतों कीं, तुमच्या अनुभवांत व ज्ञानांत आलेले जगाचें चित्र वाटाड्या ह्मणून आमच्या जीवितमार्गावर ठेवा. मयूरकवि श्रीविष्णूंस म्हणतात

त्याप्रमाणें "सदैव हित नायको बहु अपाय केले करूं ॥ तरि सकृप बाप तूं ह्मणसि नायके लेंकरूं" आहों हा भाव तुम्ही जाणतच आहां. अनुभविक कोष्टी तुम्ही आहां. राष्ट्रहितपटाचे धोटें मारणारे तरुण नवखे आहेत. तें कसें मारावयाचें हें तुम्ही सांगावयास पाहिजे. कर्तव्याची दिशा कालदिशा पाहून असली पाहिजे हें तरुणापेक्षां वृद्धांना अधिक जलद समजतें ह्मणून ही प्रार्थना आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

---

# स्त्री.

तापत्रय निवारणाचें छत्र । भार्येपरता नाहीं मित्र ॥ ८७ ॥ भार्या सकळ श्रमातें हरती । भार्या सकळ सुखातें करती । भार्या पवित्र वंश धर्ती । यश कीर्ति स्त्रीसंगें ॥ ८८ ॥

मुक्तेश्वर—वनपर्व.

सौंदर्याची अप्रतिम खाण, मोहकतेची मूर्तिमंत पुतळी, विनयाचें सुरम्य मंदीर, असें हें स्त्रीरत्न मानवाचें साहाय्यकारी ह्मणून अवतरलें आहे. जात्या चातुर्यभूषणानें अलंकृत, कंठीं सदैव माधुर्यामृत, सहनशीलतेची प्रति दुसरी मूस, असा विचारी जीव ईश्वरानें किती पवित्र हेतूनें निर्माण असेल बरें! जेथें सर्वच आश्चर्यमय तेथें हें एक आश्चर्य कां नसावें? अथवा आश्चर्य तरी कसचें, कर्ता ह्मणून जेथें पाठविला तेथें कर्त्रीस पाठविणें साहजिक प्राप्त झालें. हेंच संभवनीय दिसतें. इतकें हें व्याख्यार्थी व सौंदर्यार्थी झालें. आतां उत्पत्तीकडे वळूं.

उत्पत्तिः—प्रथम पुरुष उत्पन्न झाला. त्यास करमेनासें झालें. तेंव्हां त्यानें प्रकृतीस उत्पन्न केले. मी

तो कर्त्ता, तूं स्त्री ह्मणजे सृष्टीचा सर्व विस्तार-कर्तेपण मजकडे आहे. त्या कर्तेपणास शोभिवंत करणें तुजकडे आहे. माझ्याकडे तेजस्विता तुजकडे विनय; या भावानें जगरहाटी चालली आहे. स्त्री स्वरूप सर्व पदार्थांत आहे. शलभ तें शरभापर्यंत तें आहे. फार तर काय खाण्याच्या पानांत जेथें तीन रेषा जुळलेल्या आहेत तेथें तें पान मादी या अर्थी समजलें आहे. जेथें त्या उभ्या रेषा विलग आहेत तेथें नर ह्या सदरांत तें पान घेतलें जातें. ह्या सर्वांची उपयुक्तता आपआपल्या परी आहे. ह्यांत सत्यताहि आपआपल्या परी भरलेली आहे. ती त्यांतील सत्यता व उपयुक्तता प्राणी शास्त्रवेत्ते आणि उद्भिज शास्त्रवेत्ते दाखवित असतात. आह्मास पुरुषाचें श्रेष्ठ अंग जी स्त्री तिजविषयीं विचार कर्तव्य आहे. आह्मा पुरुषांचे धर्म निराळे. स्त्रियांचे धर्म निराळे. आमचा स्वभाव इतका करडा कीं, वज्रपातासारखा आघात झाला तरी आमची छाती कठिण ती क-

१ स्त्रीस्वरूपासंबंधीं कविमाधव निरंजनाचे विचार मननीय आहेत. ते वाचकांस वाचनीय वाटतील ह्मणून देत आहों.

" गौरीशंकराची वल्लभा । किंवा सूर्याची प्रभा । अग्नि शक्ती शुभा । स्वाहा जैसी ॥१॥ किंवा चंद्राची दीप्ति । किंवा वायूची सदा गती । कुबेराची संपत्ती । तैशी तूं मम प्रिया ॥२॥ किंवा ब्रह्मार्णा ब्रह्मयाची । इंदिरा जैशी विष्णूची ॥ प्राणप्रिया आत्मयाची चित्कळा तेंवि ॥३॥ जैशी शर्करेची मधुरता । कीं उदकाची शीतळता॥सुधेची शुभ्रता । नये निवडितां भिन्नत्वें ॥४॥ तुज मज भिन्नभाव तत्वता । नसोनि दिसे बोलां पुरता ॥ जललहरी हे वार्ता । उपधाकृत ॥ ५ ॥

ठीण रहावयाची. कठोर अंतःकरण आणि अचल वृत्ति हीं जेथें प्राधान्यें करून आहेत तेथें मृदु अंतःकरण व चलवृत्तीची मीमांसा बरोबर वठणें शक्य नाहीं.

पुरुषांनीं स्त्रीस्वभाव महोदधींतील खडान् खडा शोधून काढूं ह्मणून किती जरी गर्वोक्ती केली तरी ती वृथा होय. मुळीं पुरुषधर्म आह्मास पूर्णपणें माहीत नाहींत, तेथें स्त्रीधर्माचा शोध बरोबर लावूं असें खात्रीनें कसें म्हणतां येईल ! एक त्यांच्या रूपास भाळतो तर त्यांचा स्तुतिपाठक होतो. एकास तिच्यांत फसवणूक दिसते तर ' स्त्रीजात ह्मणजे येथून तेथून हरामखोर ' असे कोरडे निघतात. ज्याला तेंही नाहीं हेंही नाहीं त्याला उदासीनवृत्ती आवडते. सारासारविचारी जे आहेत ते मात्र स्वावलोकनानें, स्वानुभवानें व स्वशिक्षणानें त्या विषयाचे हकुभारी झाले आहेत. आतां जगांत पूर्ण विचार झाला आहे असा कोणताच विषय नाहीं, आणि नसणारही. कारण पूर्णत्वाचें स्वरूप पाहावयास चर्मचक्षु अशक्य आहेत. त्यास ज्ञानी दृष्टीच पाहिजे. असो, शक्य तेवढी मनाची समसमानता ठेवून आह्मी देखील शहाण्याची री ओढावी म्हणतों. सरस्वतीच्या मंदिरांत प्रयत्न पणती ठेवण्याचा उद्देश आहे तर खराच; पण ती टिकते कीं काय हें पहावयाचें आहे. आणि इतक्यावर ती न टिकल्यामुळें माथीं दोष येऊं लागला तर तो आनंदानें पतकरूं. कर्तव्य हें कर्तव्यादाखल केलें पाहिजे. तें जनस्तुतीस हपापलेलें नसावें व जननिंदेच्या भीतीस्तव नसावें. स्वानुभवाचें व स्वावलोकनाचें बीं खुशाल शब्दसृष्टींत पेरावें. फळाची इच्छा करणें हा जाणत्यांनीं

गौणमार्ग ह्मणून सांगितला आहे. असो. ह्या लांबलचक विषयांतराबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

**बाल्यावस्था:**—चार पांच वर्षांचीं दोन तीन मुली व मुलें एका ठिकाणीं खेळत असावीं, कांहीं वेळ शांतपणें खेळ चालत असावा तों एक मुलगी मध्येंच उठते आणि ह्मणूं लागते "नको गडे मला खेळ नको नि कांहीं नको. पहा बरें, विनू दादा कसा धिंगाणा घालीत आहे तो. एकदां छडी खाल्ली दोनदां खाल्ली. मार खावा तरी कितीदां ?" तेथें असलेली तिची वडील बहीण विनाकारण मारीत असलेल्या आपल्या खट्याळ भावास समजूत देते. तितक्यावरही हें प्रकरण न आटोपल्यास सर्व खटला न्यायमूर्ति आईसाहेबांकडे जातो. तेथें मुलीची समजूत होते. मुलास मुष्टिमोदक मिळतात. ह्या दररोजच्या उदाहरणावरून हें दिसून येईल कीं दंग्यास आरंभ होतो तो बहुधा मुलाकडून. मुली गरीब असतात. त्या सहसा दुसऱ्याच्या खेळांत हात घालीत नाहींत. आतां पद्धतीकडे वळूं. लहानपणीं मुलें शाळेचा फार्स करीत असतात. दहा बारा मुलें भोंवतीं बसवून घेतलेलीं असतात. एकानें परीक्षक व्हावें असें ठरत असतें. त्याच्या सुनावणीस एक शिक्षक होत असतो. शाळा, वर्ग दाखविण्यास एकास शिपाईगिरीचें काम देत असतात. असें करावें तसें करावें हें तासानुतास घाटत असतें. मध्यंतरीं एक दांडगेश्वर उठतो आणि सर्व गोष्टींचा विरस करतो. शेवटीं तोंडावरचें प्रकरण हातावर येतें. त्यांतलें त्यांत जो एक समजूतदार असतो तो हा हातघाईचा प्रसंग निवारण करतो. नंतर परीक्षेची तारीख

लांवणीवर पडते. तेंच मुलींच्या हळदिंकुंकवाकडे पहा. पंचवीस मुली असेनात, पण सर्व पद्धतीनें सुरळीत चाललेलें असतें. सर्वांना हळदकुंकू सारखें मिळतें. हूं कीं चूं नाहीं. आतां त्यांतले त्यांत जर एकादी गडबड करूं लागली तर सर्व एकदम तिची गडी फूं करतात थोड्या वेळेनीं ती त्यांचें आर्जव करूं लागते. मग त्या शेवटीं तीस आपल्या मेळ्यांत घेतात. ह्या मुलामुलींच्या दोन्ही खेळांवरून ध्यानांत येईल कीं, मुली मुलांपेक्षां अधिक शांत पद्धतशीर असतात, ह्या कांहीं सांगीव ऐकीव गोष्टी नाहींत. हें देखावे आहेत. शाळेंत जाऊन मुलामुलींच्या टिपणाच्या वह्या व नकाशे वगैरेकडे लक्ष द्या, त्यांत स्वच्छता, सुबकपणा, मेहनतीचें काम पहा ह्मणजे कोण सरस आहेत हें तेव्हांच दिसून येईल. असो, येथपर्यंत ह्मणजे दहाव्या अकराव्या वयापर्यंत आईबापाच्या लडिवाळपणानें मुलींची जोपासना चांगली होते. आईबाप सुशील असले ह्मणजे मुलगी तेच धडे गिरविते. तिचा दैवयोग चांगला असला आणि त्यांत वडील माणसांच्या प्रयत्नाची भर पडली ह्मणजे तीस सुस्थळ मिळतें ह्यांत थोर मंडळीची कसूर बिलकूल होत नाहीं आणि होईल तरी कशी? एक पोटचा गोळा दुसऱ्याचे स्वाधीन करावयाचा ह्मणून चिंतातुर असतो. एक सहृदय अंतःकरणाचा काका किंवा मामा जिल्होजिल्हीं स्थळासाठीं सारखा फिरत असतो. बंधुराज कर्ते असले तर त्याच्या जिवापाड श्रमाकडे पहावयास नकोच. इतक्यांच्या सुखास ती बाळा अंचवली असली आणि जरी तिचें पालकत्व एकाद्या दीनवत्सलाकडे आले असले तरी तिचा

भाग्यरवी उदयास येतो. आतां एकादा कसायी ( छी: छी: ! हा शब्द लिहिण्यास लेखणी कशी कां चरते, पण नाइलाजास्तव तिजकडून हें काम करवून घेतो ! ) ह्या गाईस विकितो व जन्मभर त्या बालिकेचे शिव्याशाप घेतो अशीं उदाहरणें आहेत, पण शेंकडा प्रमाणाशीं वसत नाहींत. तेव्हां अशा नराधमांना धिक्कार करून त्याचें नांव दूर ठेवूं व पुढचा आनंदाचा मार्ग क्रमूं.

**शिक्षणः**—विद्येनें विनय येतो. अज्ञान जें जीवाचे सर्वस्वीं दुःखास कारण आहे तें त्यानें दूर होतें. विद्येनें मीपण जाऊन आपलेपणाची ओळख पटते. कार्यसाधूंचे डावपेंच समजतात. मनास दक्षता येते. व शेवटीं ज्ञान होऊन प्रभूनें आपणास कोणत्या पवित्र हेतूनें येथें पाठविलें आहे हें समजूं लागतें. असे ज्या विद्यासंस्कारानें अवर्णनीय फायदे होतात. त्या विद्यासंस्काराच्या मांडवाखालून आपल्या मुलींनीं, भगिनींनीं जावें असें कोण इच्छिणार नाहीं? त्या सुशिक्षित व्हाव्या, त्यांनीं उच्च उदात्त विचार ऐकावें, विचार सौंदर्याबरोबर कृतिसौंदर्य झळकावें, आहे ह्यांत संसार थाटावा; चालचलणूक मर्यादशील असावी. जुन्याच्या व नव्याच्या तोंडून ' काय अमक्याची सून अथवा मुलगी सुशील आहे हो ' हे धन्यवाद ऐकून घ्यावें, असें कोणास आवडणार नाहीं? मूळ धरून असलें ह्मणजे ठीक असतें. पण मूळाधार सुटला ह्मणजे प्रसंग कठिण आहे. राहणी—मूळ हातांत होतें तेव्हां ठीक होतें. पण तें सुटलें तेव्हां अशी द्विधा वृत्ति झाली. विचारी लोक ह्याच विवंचनेंत आहेत कीं, प्रौढ मुलींना विद्यालयीं शिक्षण द्यावें की गृहांत द्यावें?

पण ज्या विचारी मनानें पूर्वींच्या आचाराविचारांचें मनन केलें असेल, ज्याच्या दृष्टींत कुलीनतेची खरी प्रतिमा दिसत असेल, ज्या शोधकबुद्धीनें "पहिली माझी ओंवी। पहिला माझा नेम। तुळशीखालीं राम। पोथी वाची'॥ हीं बोधप्रद गाणीं ऐकिलीं असतील त्या मनास, त्या शोधकबुद्धीस वरील प्रश्नाचें उत्तर द्यावयास फारसा वेळ लागणार नाहीं. आतां तें उत्तर काय हें सांगावयास नको. 'गृहांत शिक्षण द्यावयाचें म्हणजे कांहीं करावयास नको.' असें केव्हां केव्हां तारे तुटतात. अशा लोकांचें समाधान करावयाचें म्हणजे मोठें बिकट आणि विचाराचें काम आहे असें नाहीं. पण असें पहा; कीं, जी मन-कक्षा पूर्वगृहात्मक द्वेषी छटेनें रंगली आहे. जेथें नावडतीचें मीठ अळणी ठरलें आहे तेथें उत्तरार्थी आणखी पांचशें पृष्ठें भरून काढिलीं तरी काय होणार आहे? व्यर्थ लेखणी मात्र श्रमेल.

ही एक मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं, थोर, कुलीन घराण्यांतील पूर्वापार चालत आलेल्या चालीरीति मोडत चालल्या आहेत. खऱ्या जुन्याचा विसर पडत आहे. नवें आगंतुक मध्येंच घुसडलें आहे. ह्या योगानें घरांत बेकी व समाजांत दुही माजून राहिली आहे अशा दांडगाईनें राष्ट्रहितपटाच्या चिंध्या उडतील कीं काय ही भीति सर्वांना पडली आहे. असें होणें सर्वतोपरी अनिष्ट आहे. असो, आतां साधनाचा विचार करूं जातां तीं बरींच आहेत, हें आपणास दिसून येईल. पहिलें साधन आई हें होय. मर्यादेनें कसें बोलावें, मर्यादेनें कसें चालावें हें शिक्षकानें पुस्तकांतून किती जरी घोकवून घे-

तलें तरी त्याचा परिणाम यथातथाच होणार. पण तेंच आईचें वडिलाशीं प्रत्यक्ष मर्यादायुक्त वर्तन पाहिलेलें कसें? गुण ऐकिलेला कसा? आणि गुणाची मूर्तिमंत पुतळी पाहिलेली कशी? आई शिकवील तें इतरांनीं काय शिकवावें? आई वळण देईल तें इतरांनीं काय द्यावें? खरी प्रेमाची मूस, खरा अंतःकरणाचा कळवळा, खरी निरपेक्षतेची ज्योत कोणत्या हृदयमंदिरांतून झळकणार आहे सांगा पाहूं? इतराचे उपकारांतून केव्हां तरी सुटतां येईल, पण मातेच्या उपकारांतून सुटणें ही गोष्ट अशक्य आहे. जगांतील विख्यात पुरुष घ्या ते सर्व पराकाष्ठेचे मातृभक्त होते हें आढळून येईल. नेपोलियन किती निस्सीम मातृभक्त होता बरें? आईच्या विरुद्ध आपल्या दहा सल्लामसलतगारांनीं तक्रार केली असतां दहा हजार वीरांच्या अंगांतून रक्ताचे विंदु पडले तरी हरकत नाहीं. पण मातेच्या डोळ्यांतून एक जर दुःखाश्रु गळेल तर मला पराकाष्ठेचें दुःख होईल, अशा आशयाचें उत्तर पराकाष्ठेचा मातृभक्त अलेक्झांडरनेंच दिलें होतेंना?

गृहांतून बाहेर पडतांना शिवाजी महाराज प्रथम मातेस वंदन करीत होते व नंतर बाहेर पाऊल टाकीत होते! अहाहा! मातृभक्तांनो, तुमचा महिमा किती गावा? तुमच्या त्या पुत्रधर्माचे पोवाडे किती गावे? मातेची खरी योग्यता तुम्हासच कळली. तुमचीं चरित्रें मननीय ह्मणून पुढें ठेवावीं एवढेंच आमचें कर्तव्य दिसतें. असो, सार्वकालिक व सार्वस्थलिक उपास्य देवता ह्या विशेषणानें शोभिवंत होत असणाऱ्या माता आम्हांस काय एक शि-

कविणार नाहींत? त्या सर्व कांहीं शिक्षण देतील. मात्र आम्हीं कन्या म्हणविणारांनीं व पुत्र म्हणविणारांनीं त्यांच्या चरणीं सदैव लीन झालें पाहिजे म्हणजे झालें.

आतां दुसऱ्या साधनाकडे वळूं. ' वाडवडिलां सेवित जावें ' हें नटाच्या तोंडून ऐकिलेलें कसें? आणि नम्र असावें मृदु बोलावें नीतिमती व्हावें । नणदा जावा दीरासंगें प्रेमें वागावें ॥ हे उल्हास वृत्तीनें झोंपाळ्यावर आपली सखी अथवा बहिण गात असतांना त्या मुलीनें पाहिलेलें कसें? येथें पुस्तकावर किंवा नाटकगृहावर आम्हांस जहाल जावयाचें नाहीं आणि त्यांची किंमतही कमी ठरवावयाची नाहीं. नीतिप्रद नाटक अथवा बोधप्रद पुस्तक पाहण्यास किंवा हातीं देण्यास कोणाही समंजस मनुष्याची ना असणार नाहीं. मग आमची ती कशी असेल? प्रश्न फक्त येथें हा आहे कीं, गृहांत कोणकोणतीं साधनें आहेत आणि तींच आम्ही दाखवीत आहों. असो, विनयी सखी कशी आणि ओढून ताणून विनय दाखवित असणारा नट कसा? इष्ट परिणाम पहिली सत्वर घडवून आणील कीं दुसरा आणील? आतां वाचनाविषयीं पाहूं. ह्या महाराष्ट्र उपवनांत नीतिपुष्पें थोडीकां आहेत? विचारदलांनीं हा बाग खुडून कां गेला आहे? पद्यवेल्या वाळून कां गेल्या आहेत? गद्य मोगरा फुललेला व फुलत असलेला दिसत नाहीं काय? सर्व कांहीं आहे. पण डोळस अशी स्वदृष्टि नाहीं. हा पहा येथें रमणीय ' महाभारत ' गुलाब गुच्छ व्यास माळ्यानें कसा जिवापाड वाढवून जतन केला आहे! ही पहा सुंदर ' रामायण ' नौका.

वाल्मीकि कोळ्यानें तींत पतिव्रतेचीं व पत्नीव्रतेचीं कशीं शुभ्र सुंदर पुष्पें भरलीं आहेत! ती ह्या बागेच्या तळ्यांत, किती युगेंची युगें तो वृद्ध घेऊन ठेवून बसला आहे बरें? तो पहा, दरवाज्यांतच तुकोबावाणी अभंग स्फटिकमणी फुकट वांटित आहे. पंतांच्या आर्या मंजरीनें तर बहार करून सोडिली आहे. मग इतका हा आपला बाग जवळ असतांना दुसऱ्याच्या बागेकडे विनाकारण त्यांना कशास न्यावें? परकीयाचा उपवन सर्व देशीं फुलांनीं गजबजून गेलें आहे ही गोष्ट सत्य आहे. पण तिकडे जाण्यास दुर्बोधाच्या गाड्यांत आपल्या सुकुमार मुलींना व भगिनींना बसावें लागेल ह्याची वाट काय? त्या त्या गाड्यांत बसल्यावर खास श्रमतील. ह्याचा आपणा सर्वांना अनुभव आला नाहीं काय? आपल्या बागेकडे न्यावयाचें झाल्यास त्यांना सुलभतेची सुंदर सुबक गाडी आहेच. बिचाऱ्या श्रमणार देखील नाहींत. आनंदानें विचारपुष्पें लुटतील. आतां ह्यांतले ह्यांत एकादी राकट निपजली आणि त्या परकीयांचे बागेंत रमूं लागली तर सर्वांस आनंदच आहे. विनयतिलक मात्र तिनें कायम ठेवावा. मग जुने आणि नवे सारख्याच प्रेमदृष्टीनें तिजकडे पाहतील. सर्वच तीस चाहतील.

**तारुण्य अथवा प्रीतिमीमांसा**--जीवितांत अत्यंत महत्त्वाचा व धोक्याचा भाग म्हटला म्हणजे तारुण्याचा होय. मनोविकार ह्याच वेळीं अनावर होतात. प्रीतीस ह्याच वेळीं पंख फुटतात. आसक्ततेचें तारूं कोणत्या विषयखडकावर थडकेल ह्याची ह्याच वेळीं भी-

ति असते. न्यायासनीं विराजमान झालेला न्यायाधीश असो, एकांतवासांतील नीतिवेत्ता असो कीं, व्यासपीठावरचा उपदेशक असो, प्रीतिकटाक्षापुढें सर्व लुडबुडतात. उग्र स्वरूप तर प्रीतिपाशांत कायमचें जखडलें जातें. हिच्या तीव्र झटक्याखालीं न आलेली स्त्री अथवा पुरुष विरळा. इतरांचे शब्द खालीं पडतील पण प्रीतीचा शब्द कधींहि खालीं पडणार नाहीं. प्रीतिबद्ध जीव प्रीतीविषयाचा विश्वासु चाकर आहे. फार तर काय हिचे श्रम श्रम ह्मणून गणले जात नाहींत. ही बाह्य उपाधीवरून जडत नाहीं; अंतःस्थितीशीं साम्य पाहून जडतें. प्रीति दैविक देणगी समजतात. उदार अंतःकरण तिचें पोषक आहे क्षुद्र अंतःकरण तिचें निंद्यद्योतक आहे. प्रीति अविचारानें सहसा देऊं नये. विचारानें पांघरूण हिजवर जितकें असेल तितकें हितकर आहे. एकवटलेलीं मनें जन्मभर एक रहावीं, नव्हे आशापाशानें गुंतल्यास जन्मोजन्मीं त्यांची संगती जुळून यावी असा जणूं काय दैविक संकेत दिसतो. पहा बरें, निर्जीव असतांही लोहचुंबकानें लोहचुंबन सोडलें नाहीं. शिंपल्यानें मोत्याकरतां आपली प्रेमपुटी सोडली नाहीं. मनानें मनास कसें ओढून घ्यावें, पदार्थांचें ऐक्य कसें साधावें ह्याची प्रीतीला मोठी हातोटी साधून गेली आहे. पत्नीविरहाच्या सुस्कारांत 'तूं जीव तूं हृदय तूं मजला विसावा,' असे उद्गार श्रीरामचंद्रजीच्या मुखांतून निघाले ना ? इकडे पत्नीप्रेमांतून "जळो ही संपत्ति ! पतिविण रती मंदिर जळो ! जळो रत्नःशाळा ! हयगज विशाळा परिजळो ! । जळो रिद्धीसिद्धी ! धन कनक वृद्धी पशु जळो ! जळो जन्मा

येणें ! वधु वसन लेणें तनु जळो ॥ याचें नांव खरें प्रेम ! ही प्रेमाची खरी मूस ! स्त्रियांची प्रीति शांत चोरून असावयाची. आपल्या प्रियकराविषयीं झुरणीस लागतील पण अमर्यादा समजून तोंडांतून ब्र काढणार नाहींत. विधात्या ! धन्य आहे तुझ्या चातुर्याची कीं मर्यादा भूषण स्त्रियांच्या कंठीं घातलेंस ? मर्यादेची स्त्री ह्मणजे पतीस भूषण, गृहास वळण आणि समाजास रत्न आहे. मर्यादारत्नाचा जिनें उपयोग केला नाहीं तिनें प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचा अपमान केल्यासारखें आहे. मर्यादेचें भाषण, मर्यादेचें हसणें, मर्यादेचें पहाणें हीं सर्वच मनोहारी आहेत. मर्यादा धरणें हें खरें कुलस्त्रीचें लक्षण आहे. अमर्यादा मग ती कशांतही असो तिची गणना कुलक्षणांत करतात. ती सर्वथैव घातुक आहे.

---

( २ ) विनय सुजनता ह्यांविषयीं सांगितल्यावर कण्व ऋषींनीं शकुंतलेस सासरीं जातांना ‘ कुलक्षण ’ त्यागाविषयीं उपदेश केला. तो असा आहेः–परवर अटण परघर वस्ती । जार जारणीचि संगती । एकट शय्या एकट वस्ती । हें कुलक्षण कुलवंते ॥ क्षण क्षणीं चंचलपणें । चिरनिरिया सरसावणें । कच्छ फेडणें वालणें । हें कुलक्षण कुलवंते ॥ हृदय दावुनि घाली पदर । पुरुष अवलोकुनि वाढवी हार । परकियासी एकांत विचार । हें कुलक्षण कुलवंते ॥ बहु हांसणें, बहु बोलणें, । सदा हांसत गोष्टी करणें, । परत परतोनि निरखणें, हें कुलक्षण कुलवंते ॥ आणिका वर्णी, निंदी भर्ता, । पति त्यागूनि धांवे तीर्था, । पुरुष अव्हेरुनि देवता । भजतां दूषण कुळवंते ॥

मुक्तेश्वर–आदिपर्व: ९

**सौंदर्यः**—आतां सौंदर्याकडे वळूं. सौंदर्य पशुपक्ष्यांत आहे, उद्भिज्जांत आहे, खनिजांत आहे. खुद्द सृष्टी जर सौंदर्यानें भरलेली आहे तर तिचा अंश तिच्या जीवांत असणें हें साहजिक आहे.

मानवाखेरीज इतर सृष्ट पदार्थांतील भोगी आणि भोग्यांत वैगुण्य असल्यामुळें त्या आसक्तीचा व्हावा तसा हितकर परिणाम होत नाहीं. तोच प्रकार पशुपक्ष्यांत आहे हें सांगणें नकोच. शिवाय ह्यांच्यामध्येंही एक ध्यानांत ठेवण्याजोगीं गोष्ट आहे कीं, सौंदर्याची वांटणी नराचे वांट्यास आली आहे. मोर सुंदर आहे. लांडोर विद्रूप दिसते. पोपटाची लालभडक चोंच, निळा कंठ, ती ऐटदार मान वगैरे सर्व नोकझोंक पाहिला ह्मणजे मादी त्यापुढें फिक्की दिसते. तोच प्रकार व्याघ्रसिंहादि वनचरांत आहे. ही स्थिती मानवांत नाहीं. राकट पुरुष कदाचित् उच्छृंखळ होईल तेव्हां त्यानें तसें होऊं नये, गृहांत, समाजांत, स्त्रीपुरुषांची राहणी गुण्यागोविंदानें चालावी; परस्परांच्या इच्छा, गरजा, सलोख्यानें, आनंदानें भागाव्या व परिपूर्ण व्हाव्या, अंतीं जीवाचें ऐक्य साधावें अशी त्या नियंत्याची इच्छा दिसते. एवढ्याच कारितां स्त्रीच्या सौंदर्याची मांडणी असावी असें वाटतें. सौंदर्य पुरुषांतहि आहे, पण स्त्रीसौंदर्यांत विनयाची लकेर अस-

---

शकुंतला असमंजस होती ह्मणून कण्व महाऋषींनीं उपदेश केला नाहीं. समंजस होती ह्मणून केला. सूचनेचा उपयोग जाणत्याच्या ठिकाणीं होतो असें नेहमीं पाहण्यांत येतें ह्मणूनच आह्मीं हा उतारा घेतला.

ग्रंथकर्ता.

त्यामुळें तें आकर्षणास अधिक कारणीभूत झालें आहे. वसंताच्या बहारीनें आम्रवृक्षाचा मोहर फुलावा, तेथें भ्रमरानें लोलुप व्हावें, ही जशी सृष्टीची मांडणी आहे तशीच दैविक मांडणी अशी दिसते कीं, स्त्रीनें आपल्या सौंदर्यानें व गुणालंकारानें आपल्या प्रियकरास लुब्ध करावें. हे सौंदर्यलतिके, हे प्रिय भगिनि, गुणशालिनि, तुझ्या गालावर जोंपर्यंत गुलाबाची छटा आहे, जोंपर्यंत तारुण्याचें तेज, सानंदी मुद्रा आणि प्रेक्षणीय मार्दव हीं आहेत, तोंपर्यंत तूं अपल्या सौंदर्यानें प्रिय पतीस आपलासा करून घे. तुझा पती सुजन असेल तर देवानें मला असलें अमोलिक रत्न दिलें ह्मणून त्याचे धन्यवाद गाईल. व्यसनी असेल तर तुझ्या ठिकाणीं लुब्ध होईल. तूं विद्रूप असशील तर आपल्या गुणालंकारानें त्यास दीपवून टाक. जांभूळ काळें ह्मणून कोणीं टाकिलें आहे काय? पण पिकण्याचे पूर्वीं शानदार तांबूस दिसलें ह्मणून कोणीं त्यास घेतलें आहे? ह्यावरून गुणाच्या परिपक्वतेंत कायतें आहे हें शिकून घेशीलच. जात्याच चतुर आहेस. पतीची आवड, पतीचीं धोरणें तुला पूर्णपणें माहीत आहेत. हेंच काय, पण तूं इतकी दूरदर्शी आहेस कीं, घरांत पाऊल वाजलें तर तें पतीचें आहे कीं दुसऱ्याचें आहे हें तूं जाणतेस. मग बाकीच्या धोरणांविषयीं बोलावयास नकोच. स्त्री चंचल, स्त्रीच्या दृष्टींत एक, मनांत एक आणि कृतींत एक; हे दोषारोप ऐकिल्यापासून व स्त्रीस* विषाचा पेला समजावें कीं अमृताचा पेला म्हणावें ' हे संशयवृत्तीचे शब्द ऐकून मन कसें खिन्न झालें आहे.

* भर्तृहरि.

तो धुवून टाकण्यास तूंच एक पात्र दिसतेस. तसें करशील तर हें बंधुप्रेम तुझें सौभाग्य चिंतून जन्मोजन्मीं धन्यवाद गात राहील. इतक्या ह्या सलगीबद्दल रागानें पाहणार नाहींस ही आशा बाळगीत आहें.

**आतां गृहिणीदृष्टीनें स्त्रीकडे पाहूं.**—पत्नी शब्दाचा गौरव ' सा नित्यमंगलमयी गृहदेवता मे ' असा श्री रामचंद्राच्या तोंडून झाला ! अहाहा ! प्रभुराया तुह्मीं किती सार्थ नांव दिलें बरें ! अथवा बरोबरच आहे. जिच्याकडून सर्व मंगलकार्यास प्रथम आरंभ व्हावा. जिच्या नामोच्चारणाखेरीज लिखिताला आरंभ होऊं नये. व्यवहारांतील यादी पटांत जिच्या सौभाग्यतिलकाचें प्रथम नांव पडावें, लक्ष्मीची ज्योत जी सांजवात ती प्रथम जिच्या हातानें प्रतिदिनीं लागावी, त्या शुभांगीस गृहदेवता हें नांव किती सार्थ आहे बरें ? गृह हें एक राज्य आहे. गृहिणी ही राणी आहे. आणि गृहस्थ हा राजा आहे. राज्यांत जसे भिन्न मताचे लोक असतात तशी येथें भिन्न स्वभावी स्त्रीपुरुषें असतात. तेथें जसे देशाभिमानी असतात तसे येथें गृहाभिमानी असतात. राज्यांत जसें राजपुरुषाला निरनिराळ्या मतानुयायाकडे लक्ष द्यावें लागतें तसें गृहांत कर्त्यास अथवा कर्त्रीस निरनिराळ्या व्यक्तीच्या धोरणांकडे व गरजेकडे पहावें लागतें. कर्ता बहुधा व्यवसायानिमित्त बाहेर असल्यामुळें ह्या कर्त्या स्त्रीवर प्रपंचाचा भार पडतो. मंडळीच्या गरजा भागविण्यासाठीं स्वार्थत्याग, सहनशीलता, सोसावी लागते. व हेच धडे ममताळूपणानें ती सुनामुलींस गिरवावयास शिकवीत असते. आर्य स्त्रियांचा स्वार्थत्याग तर कादंबरी-

कारांनीं ह्मणींत वर्णन केला आहे. ती गोष्ट सर्वमान्य आहे. गृह सर्व गुणसंपन्न आहे. त्यांत कोणता एक गुण अथवा स्वभाववैचित्र्याची ज्योत झळकत नाहीं? 'शंकर मामंजी' सारखी दांभिक वर्तनाचीं मोडी वळणाचीं माणसें त्यांत आहेत. प्रीतीनें थरथरलेला ओंठ असतांही 'मर्यादा सोडुनि वदणें योग्य न मजला वाटे,' ह्मणणारी विनीत तरुणी येथेंच आहे. पतीनें धन्याशीं निमकहरामपणा केल्यावर 'वाण* घेतलें सतीचें सांभाळावें,' असे वीरश्रीचे उद्गार काढणारी बाणेदार पत्नी ह्या आर्यगृहांतच होती. आणि अद्यापही अशा बाणेदार स्त्रिया आहेत. सारांश हें गृहमंदिर अशा अनेक रत्नांनीं खचित झालेलें असतें! कोणत्या कर्त्रीचें भाग्य कीं, अशीं मोत्यें तिच्या मांडीवर एकएकदां रांगलेली असतात! आतां पहिल्या दिवस्यानें तीस खालीं पहावयास लावलें त्यास तिनें काय करावें! जनानें हंसें केलें म्हणून काय झालें. त्या गृहिणीचें मातृप्रेम लवभरही कमी झालें काय? ख-

---

* पानिपतच्या घोर संग्रामांत मल्हारराव होळकरांनीं कुचराई केली तेव्हां त्यांच्या पत्नी श्री. गोडुबाई त्यांस ह्मणाल्या 'जयाजी शिंद्यासारख्या तोंडावर जार न वाळलेल्या मुलांनीं तरवार गाजवावी! आणि इकडून येणें परत व्हावें! किती ही नामर्दमुकीची गोष्ट! लोंकर विणण्याचें काम करित असतां तरवार कां धरिली? कंस पिकलें असतांहि अशा रीतीनें वांचावयाची आस्था धरलीत. अखंड सौभाग्य असतां वैधव्याची आस्था धरील अशी चांडाळीण कोण आहे? परंतु वाण घेतलें सतीचें सांभाळावें हीच विनंती आहे.

(आशय) भाऊसाहेबांची कैफियत.

ट्याळ मुलाकडे पाहून आई नाक मुरडते काय? जीवांतजीव असेतों मुलावर आईची प्रेमवृष्टि सारखीच पडणार. मूल कण्हतें तों मातेनें सुस्कारा टाकावा! पति दुःखी आहे तों पत्नीस घास गिळूं नये! अहाहा! विधात्या! स्त्रियांचीं अंतःकरणें फुलासारखीं कोमल आहेस ह्याची प्रचीति आली? प्रीतिदेवते, तुझा खरा भाविक एक स्त्रीजन आहे असें वाटतें! तेव्हां तुम्हांस नम्रपणें हेंच सुचवावयाचें आहे कीं, ह्या प्रीति साह्यानें जनकार्य साधा " केवळ बुद्धीच्या जोरानें प्रिय माणसाचेंही हित साधतां येतें असें नाहीं. तें संपादावयास प्रीति हा एक सूक्ष्म मार्ग कमी आहे असें नाहीं. "

आर्य स्त्रियांनो, तुह्मी भगिनी असाल तर बंधुप्रेमानें म्हणतों, माता असाल तर चरणीं विज्ञाप्ति करून सुचवितों कीं, दैविक इच्छेनें भारतीयांचें अर्धांगित्व तुम्हांकडे आलें आहे. हा अधिकार लहानसान नाहीं. तुम्हांवांचून आमचे घरांत पान हालत नाहीं. तुम्हांवांचून आम्हांस समाजांत मान नाहीं. राष्ट्रांत भूषण नाहीं. तुमचा मान आम्ही कमी ठेवितों असें तुम्हांस वाटतें काय? तुम्हा स्त्रियांचीं नांवें प्रथम उच्चारल्याखेरीज आम्ही नारायणाचें, रामाचें कीं पांडुरंगाचें नामोच्चारण तरी करतों कां? तशी सात्त्विकता, तशी स-

(१) मालविकाग्निमित्रम् अंक ४

हनशीलता, तसा स्वार्थत्याग, तसें निस्सीम पाति-
व्रत्य तुम्हांत आहे ह्मणून तुमचीं नांवें अद्याप
स्मृतींत जागृत ठेवित आहों. कसलाहि कठिण
काळ आला तरी सत्वास सोडूं नका. तुसत्या अ-
नंत काळाची गणना कोण करणार आहे? स्मृती-
चा काळ मात्र मानवज्ञात असे तों इतिहासपटा-
वर कोरला जातो. तर स्मृतीचा काळ करा. स्त्री-
जन्म उदास ह्मणून समजूं नका. पुरुषधर्मांत ज-
न्मसार्थक्य आहे. आणि स्त्रीधर्मांत तें नाहीं असें
नाहीं. सृष्टिधर्मानुसारें पुरुषाचें कृतिपटांगण वि-
स्तृत आहे. स्त्रियाचें थोडें लहान आहे. कसरतीस
मैदान पाहिजे असें नाहीं. मेजावरच्या कसरतीस
टाळ्यांचा गजर होतोना? झालें तर, ह्यांत सारें
समजून घ्याः

# मित्र.

स्नेह करी, हृष्ट करी, तर्पी, रक्षी, सदैव संमानी ।
पावे सुखें सुख हितें मित्र असें म्हणती सर्वहि ज्ञानी ॥

मोरोपंत–कर्णपर्व.

मित्र ह्मणजे सुखदुःखाचा विभागी, मित्र ह्मणजे हिताहिताचा परीक्षक, मित्र ह्मणजे जीवितपट प्रकाशमान करणारा भास्कर, मित्र ह्मणजे सुखसागर उचंबळविणारा सुखदनेत्री इंदु. आशांकुरावर जो जलसिंचन करतो, भीति आणि संकट ह्यांचें क्षणोक्षणीं निर्मूलन करतो, त्यास दुसरा जीवाचा कलिजा कां ह्मणूं नये ? असो, इतकें व्याख्यार्थी लिहून प्रस्तुत विषयाकडे वळूं. विषयाविषयीं बोलावयाचें असलें ह्मणजे प्रथम त्याच्या आदिकारणाकडे अथवा उगमाकडे पाहत असतात. तेव्हां प्रथम मैत्रीच्या उगमाकडे वळावें हें बरें दिसतें.

**मैत्रीचा उगम**—समदुःखीपणा, एक हेतु, जिज्ञासुपणा हे मैत्रीपटाचे आद्यतंतु आहेत. सुग्रीव आणि श्रीराम दोघेहि पत्नीविरही असल्यामुळें समदुःखीपणाच्या भावानें एके ठिकाणीं बांधले गेले. तेव्हां साहजिकपणें त्यांच्या कार्यांत प्रोत्साहनतेचा संबंध जुळून आला व मैत्रीनें तेथें कायमचें वास्तव्य केलें. ही

गोष्ट भाविक वाचकांच्या स्मृतींत असेलच. गोब्राह्मण प्रतिपालन करण्याचा छत्रपति शिवाजी महाराजांचा आणि श्रीसमर्थांचा एक हेतु असल्यामुळें परस्परांचे मनोधर्म, परस्परांची एकवाक्यता किती जुळून येत होती हें इतिहासज्ञांसच काय पण आर्यावर्तांतील सर्व आबालवृद्धांस महशूर आहे. जिज्ञासुपणा हा अर्जुनाच्या अंगचा प्रधान गुण होता. श्रीकृष्ण परमात्म्यास असाच सच्छिष्य पाहिजे होता. तेव्हां ह्या पुण्यात्म्यांत जल आणि जलप्रवाह, पुष्प आणि पराग, दीप आणि उष्णता ह्यांसारखा स्नेहभाव दिसून आला. ही गोष्ट दिसावयास दिसते साहजिक, हें मैत्रीसूत्र प्रथम वाटतें साधें, पण मैत्रीचें बीजारोपण इतक्या उदात्त तत्त्वांतून, इतक्या उच्च हेतूमधून झालेलें पाहून ( आणि होत असलेलें पाहून असें ह्मणावयास कोणता बाध येतो? ) डोळ्यांतून आनंदाश्रु कसे टपटप येतात! आश्चर्यानें मन कसें थक्क होऊन जातें! मैत्री, तूं साधर्म्याच्या ठिकाणीं लुब्ध खरी! साधर्म्या, तूं मैत्रीचा पोषक खरा! आतां याहीपेक्षां आश्चर्यजनक मार्ग क्रमूं. मैत्री विधर्मांत देखील जुळून येते. ह्याचीं उदाहरणें बरींच आहेत; पण त्यांतील एकदोनच घेऊं. वैधर्म्यांतील मैत्रीचें एक उदाहरण तर इतकें निकट आहे कीं, त्यापासून आपणा स्वतःस विलग असें ठेवतांच येत नाहीं. तें ह्मणजे स्त्रीपुरुषांचें होय हें उघडच आहे. गुलाबगुच्छाचें स्वरूप किती नाजूक, पण त्यानें कांट्याचा आश्रय धरिला. ही सलगी केवढ्या विधर्म स्थितींतील बरें? स्त्री प्रेमळ, मृदु अंतःकरणाची आहे, पण तीस पराक्रमी पुरुष आवडतो. नाजूक स्त्री

नाजूक पुरुषावर अनुरक्त नसते. तिला राकट, विशाळ छातीचा, दृढनिश्चयाचा शूरवीरच आवडतो. अथेल्लो आणि डेस्डिमोना, बाजीराव आणि मस्तानी हीं उदाहरणें त्याचीं पुरीं व्यंजक आहेत. कोठें चंद्र आणि कोठें सागर ही राहणी किती वैधर्म्यांतील आहे बरें? पण पहिल्याचा उदय होतांच सागराचें प्रेम कधीं उचंबळलें नाहीं असें झालें आहे काय? विधात्या! विधर्मांत देखील मैत्रीचें बीज ठेविलें आं? धन्य आहे तुझ्या चातुर्याची! महाभागा! मनाच्या एकीची हातोटी तुला कशी उत्तमोत्तम साधली आहे हें व्यक्त करावयास मज पामराजवळ पुरे शब्द देखील नाहींत! इतकेंच नव्हे, तर कित्येक प्रसंगीं तूं जी प्रेमग्रंथि बांधितोस तीस सोडवावयास माझ्या मतीची गती कुंठित होते. अथवा बरोबरच आहे. जेथें भवभूतीसारखा " व्यतिषजति पदार्थान् नान्तरः कोऽपि हेतुः " ह्मणून प्रेमाची खरी मीमांसा करण्यास अशक्य झाला, संशयसागरांत बुडून गेला, तेथें मी अज्ञमती कितीसा धांव घेणार? असो, मैत्री कशी आणि केव्हां जडेल ह्याचा कायमचा निर्णय करण्यास आह्मी असमर्थ आहों. मैत्रीचीं जीं कारणें आह्मीं वर दाखविलीं आहेत त्यांव्यतिरिक्त देखील मैत्री जडूं शकेल. नाहीं असें कोणीं म्हणावें? मित्रत्व जुळून येण्यास समदुःखीपणा अथवा सहानुभूति, एकहेतु, जिज्ञासुपणा, प्रोत्साहन हीं प्राधान्येंकरून आहेत. ह्या सर्वांची गती एकाच केंद्राचे बिंदूकडे आहे. प्राणीमात्रास व वस्तुमात्रास एक नियुक्त स्थळ आहे. त्यास लागणारा धागा त्या चिच्छक्तीमधून आहे. तो कां आहे हा एक मोठा बिकट प्रश्न

कधीं कधीं उद्भवतो. तथापि, कवींनीं तत्त्ववेत्त्यांनीं त्याचें निराकरण असें केलें आहे कीं, सर्व वस्तूंस, सर्व प्राण्यांस एका पूर्णत्वाचे जागीं जावयाचें आहे ह्मणून दैविक संकेतानें हें प्राणिमात्राचें व वस्तूमात्राचें भ्रमण आहे. तो पूर्णत्वाचा काल अति दूर आहे, पण तोंपर्यंत तशी स्थिति यावी ह्मणून निर्जीवांचा सजीवांशीं व सजीवांचा निर्जीवांशीं अन्योन्यसंघट्टनानें मदतीचा, प्रोत्साहनतेचा व सहानुभूतीचा प्रसंग आणला आहे. निर्जीव आहेत ते परस्परांचे मदतीस असमर्थ आहेत. ह्मणून त्यांच्या मदतीची काहणी मानवाकडे येते. मैत्रीचा संबंध ह्या वरील कारणांत कसा येतो व त्याचें पर्यवसान एकींत कसें दिसून येतें हें सुग्रीव आणि श्रीराम, शिवाजी महाराज आणि रामदास, अर्जुन आणि श्रीकृष्ण परमात्मा ह्यांच्या उदाहरणावरून सुव्यक्त होतच आहे. जेथें म्हणून असे संबंध जुळून आलेले आहेत, तेथें मदतीची, सहानुभूतीची व प्रोत्साहनतेची ठेव असलीच पाहिजे. त्यावांचून मन मनास कधींहि ओढून घ्यावयाचें नाहीं, आसक्ति अंकुराची वाढ कधींहि व्हावयाची नाहीं. कालगतीनें अन्योन्यसंघट्टनानें जेव्हां प्रीतितरुवर वाढून येतो तेव्हां तो मित्रत्वाच्या संज्ञेस प्राप्त होतो. आतां येथें मैत्रीचें सूत्र मिळालें. ह्याच्या आधारें थोडा शोध लावूं.

**मैत्रीची शाश्वती:**—जन्मलेल्या गोष्टीस बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वृद्धावस्था हीं असतात, पण मित्रत्वास दोनच अवस्था दिसतात. तिसरी आहे कीं नाहीं ह्याची बरीच शंका आहे. मैत्री वाढते. मैत्री तारुण्याव-

स्थेस पोंचते. पण मैत्री परिपक्कदशेस गेलेली दिसून येत नाहीं. कचित् स्थलीं ती परपक्कतेस पोंचलेली असेल पण ती नियमास अपवादक होय. मित्रत्व चिरकाळ होण्यास सारखेपणा अवश्य पाहिजे. एक धनिक दुसरा दरिद्री, एक विद्वान दुसरा अविद्वान, अशा विजोडांत मित्रत्व कधींच उबवावयाचें नाहीं.

विद्वान विनयाचा पुतळा असणार, मूर्ख निर्लज्जतेचें हुबेहुब चित्र असणार; विद्वान सदा विद्यानंदांत रमलेला असणार, हे दुसरे बृहस्पती नेहमीं विषयसुखांत गुंगलेले असणार; तेव्हां अशा विगुण स्थितींतील मैत्री केली ती पानावरील बिंदूप्रमाणें ढळदिशीं ढळेल हें उघडच आ... यावर ...नारा- रुदत्तासारखें आणि मैत्रेयासारखे, हॅम्लेट आणि ह... ओसारखें व शिवाजी आणि तानाजीसारखें विजोड[1] ... आहे ... गळ्यांतील ताईत होऊन राहिलेले सुमित्र निराळे. अ... सहज ... त्रिमैत्रीचे धडे प्रत्येकांनीं उरास बाळगून ठेवाव... ठेवितां ... जेत. मानापमान आणि अट हीं मैत्रीस पुरीं घा... न त्या- ...ाम-

---

१ विजोड स्थितींत मैत्री जडत नाहीं ह्याविषयीं महाभारतांत असा उल्लेख आहे. “ क्लीबा आणि झुंजार शुरा, । अधैर्यवंता परमधीरा । अश्रोत्रिया आणि श्रोत्रिया नरा । मैत्री नाहीं परिसिली ॥ मागतया आणि न देतया, । मान इच्छका आणि उपेक्षीतया, । सभ्या आणि निलाजरिया, । मैत्री नाहीं परिसिली ॥ रत्न रत्नाचिये पंक्ती । मित्र भूपाचा भूपती । योग्य शर्करा समरस घृती । लवणतकें, नेमिलें ॥ कुळशीळ ज्ञान वैभव । समान योग्यता मित्रभाव सखा पार्थिवा पार्थिव । भणगा भणग सोयरा ॥

मुक्तेश्वर—आदिपर्व, अ. ३०

हेत. त्यांस मैत्रीमंदिरांत लवभर देखील स्थळ देऊं नये. स्थितीची समानता, मनाचें उदारपण, अंतःकरणाचा खुलेपणा व वागणुकीची सरळता हे अखंड मैत्रीघटाचे पहिलें व कायमचे कण आहेत. मैत्री जडल्यावर तींत सागरचंद्राचा भाव दिसून आला पाहिजे. सागरांत जशा खाचा नसतात तशा मनांत कुत्सित बुद्धीच्या त्या नसाव्या. चंद्राचें तेज जसें शुद्ध आहे, तसा वर्तनक्रम शुद्ध असला पाहिजे. इकडे चंद्रोदय होतांच समुद्रास भरती व्हावी तों इकडे मित्रचंद्र दिसतांच मनप्रसन्नतेचें भरतें णून असावें. इकडे प्रकाशानंतर चांदणें आणि जल ह्यांचें संबंध हे स्थापणें जसें अशक्य व्हावें तसें ह्या मित्रद्वयासान एकत्व दृष्टीस भासतां कामा नये. सागर एवढा गुशिवाजी कीं त्यांत पाहिल्यास त्याच्या मित्राचें प्रतिबिंब ण्ण परमाचेंच. वाऱ्याच्या संकटानें लाटा उसळोत, माआहे. जेथींनें त्यांत ढवळाढवळ होवो म्हणून समुद्रानें तेथें मन सोडिलें आहे काय ? तोच प्रकार आमचा आसन्न्या मित्रचंद्राशीं होईल तर काय मजा होईल बरें ? त्याच्या गुणाचें प्रतिबिंब, त्याच्या शीलाची लकेर जर आमच्या मनावर बिंबेल आणि पडेल तर मैत्रींत एक मोठें साधनच झालें. मना, तुला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, जडशील तेथें विचारानें जड. पण एकदां जडलास ह्मणजे आमरण जड. आधीं जगांत अन्योन्य संबंध विरळा. त्यांत मनाच्या एकिकतेचा संबंध तर फारच विरळा. मानवी स्वभावाकडे पहावें तों अनास्था, अप्रीति, फसवणूक, स्वार्थ ह्यांचें प्राबल्य मुख्यत्वें दिसतें. विस्तीर्ण वनांत जसा एखादा चंदनवृक्ष चमकत असतो

तसा जीवितमंडळीं एखादाच खरा मित्रतारा झळकत असतो. पूर्व पुण्याईनें हा तुला लाभला आहे. त्याच्याशीं कृत्रिमपणा करशील तर मना, जन्मोजन्मीं तुला गती मिळणार नाहीं. अरे, खरें अंतःकरण दिल्यावर खरें अंतःकरण मिळत नाहीं, प्रीति दिल्यावर प्रीति लाभत नाहीं, दुःखाचे वांटेकरी झाल्यावर दुःखांत पहाणार नाहींत. अशा गोष्टी होतील तरी कशा? सरळास सरळ न वागण्यापुरता मानवी स्वभाव नीचावस्थेस पोंचला असेल असें तुला वाटतें तरी कसें? आणि यदाकदाचित् तसा पोंचला असला तरीहि तूं आपलीं प्रसादकिरणें त्यावर फेंकीतच रहा. पहा बरें दुर्गंधी स्थळ ह्मणून सूर्यनारायणानें आपला तेथील प्रकाश आंवरून धरिला आहे काय? मानवी स्वभाव आहे. भडभड्या मनुष्य सहज अपशब्द बोलेल, असभ्य वागेल, आंचपेंच न ठेवितां तुझ्या मागणीस एकदम नकारघंटा देईल, ह्मणून त्याचा मित्रसंबंध[1] तूं सोडावास? समज, तुझा मित्र एकांतवास-

---

१ मित्रसंबंध कसा तुटतो ह्याविषयीं 'भारतांत' असा उल्लेख आहे. देवयानी आपल्या पित्यास ह्मणतेः—बहू काळिचा मित्र संबंधु। तोडि एक बोखटा शब्दु। जैसा कांजीचा स्वल्प बिंदु। घटचि नाशी दुग्धाचा॥ १॥ नाना तपाचिया जोडी। स्वल्प कामना नासती कोडी। परगृहीं षड्रसांचि गोडी। दवडी एक हेळणा॥ २॥ ज्वर वन्ही ग्रीष्मातप। यांचा उष्मा अत्यंत स्वल्प। त्याहुनि बोलाचा संताप। आगळा ऐसा मज वाटे॥ ३॥ हृदय तप्त लोहाचे सळ। साहो येईल चिरकाळ। परि दुष्ट शब्दाची जळजळ। मरणांतींहि शमेना॥४॥ सोनें अथवा हस्तचरण। मोडिल्या सांधिती विचक्षण; । फुटलें मोतीं तुटलें मन,। सांधु न शके विधाता॥ ५॥

मुक्तेश्वर आदि.

प्रिय आहे. त्याला तुझें हंसणें नको. तुझे खेळ नकोत. ह्मणून त्याच्याशीं निष्ठुर होऊन त्याची मैत्री सोडावीस? छि: छि:, असें करूं नकोस. पूर्वींचे उपकार कांहीं तरी लक्षांत आण. उतावीळ होऊं नकोस. शांत हो. अरे 'फुटलें मोतीं, तुटलें मन, सांधु न शके विधाता' असें होईल बरें? मग बोलून उपयोग काय? जुने मित्र खात्रीचे असतात. नवे नवसागराच्या अर्कासारखे असतात.

---

* महाकवी शेक्सपियरच्या एका काव्याचें हें खालील स्पष्ट साधें, जोरदार रूपांतर आहे. रा. पांगारकर ह्यांचे सहवास परिमलांतून हा गंध आह्मास लाधला. मित्राशीं वर्तन कसें ठेवावें ह्याविषयीं ह्या फटक्यांत बऱ्याच ठिकाणीं ध्वनित झालें आहे ह्मणून हा उतारा घेतला आहे.

## फटका.

ऐक सख्या ! संसारी प्राण्या ! उपदेशा या विसरुं नको ।
नित्य सुखाचा लाभ होय बा ! व्यवहारीं कधिं फसूं नको ॥ ध्रु०
गुप्त आपुले विचार नाना भलत्यासलत्या सांगूं नको ।
पूर्ण कसाला लाविल्याविना मित्र कुणाला ह्मणूं नको ।
खरा मित्र तो प्राणबहिश्चर तुझा खूण ही सोडुं नको ।
मित्ररत्न ही दुर्लभ संज्ञा वाजाऱ्याला देउं नको ।
शितांभोंवतीं भुतें तशास्तव उगा द्रव्य तूं उधळुं नको ।
कष्टप्रद त्या कलहाचा संसर्ग आपणा लावुं नको ।
कलही वैऱ्या नरम होइ तों जरब लावितां विरमुं नको ।

संकटकाळीं डगूं नको ।
सवदा करितां चकूं नको ।
पराधीनता धरूं नको ।

असो. कांहीं झालें तरी मैत्री आपणाकडून सोडली जाऊं नये. दुसऱ्यानें सोडली तर त्याचा धर्म त्यानें केला ही साधुरीत खरी.

**मित्रावांचून चालेल कीं नाहीं?**—मित्रावांचून चालेल कीं नाहीं असा कधीं कधीं प्रश्न उपस्थित होत असतो. तेव्हां याविषयीं थोडा विचार करणें प्रासंगिक दिसतें. जीवितांत अमक्यावांचून चालेल कीं नाहीं, तमक्यावांचून अडेल कीं काय? हे प्रश्नच मुळीं निराळ्या अर्थाचे आहेत. हे अनास्था ध्वनित करतात. निर्जीवाकडे पहा कीं सजीवाकडे पहा त्यांत प्रभूनें सहवासाचें आदितत्त्व जणूं काय पेरलेलेंच आहे हें दिसून येतें. ज्या भागांत अमुक एक वनस्पतीची अथवा झाडाची लागवड

---

वेड्यापरि तूं वकूं नको ।
संथपणानें भल्याबुऱ्याचें ऐकिल्याविना राहुं नको ॥ऐक०॥
वटवट निंदा ऐक मुकाट्या उणें झटपणा बोलुं नको ।
हमरी तुमरी सदा नको परि तेज आपुलें दवडुं नको ।
घाम येई तो काम करूनी दाम जोडण्या लाजुं नको ।
काटकसरिनें न्यायोपार्जित वित्त वेंचितां विरूं नको ।
लांडिलबाडी त्याग सर्वथा नष्ट कृपणता धरूं नको ।
ऐपत पाहुनि वेष करावा नटापट्टा मुळीं नको ।
सर्वस्वाचा नाश करी त्या ब्रह्मस्वाला शिवूं नको ।
मूळ कुळाचें खंडुनी पाडी विपट निपट हो नको नको ।
आत्महत्यारा बनूं नको । पांखाडांमधिं शिरूं नको ।
देह झिजवितां खिजूं नको ।
सत्यापासूनी चळूं नको ।
रामचंद्र सुत लक्ष्मण बोले रामप्रभूतें सोडुं नको ॥ऐक०॥२

होत नाहीं तेथें त्या वनस्पतीचें बीं रुजत नाहीं. व-ळेंच होऊन लावूं लागल्यास त्याच्या मशागतीची फार काळजी घ्यावी लागते. इतक्यावरही तें जगत नाहीं अ-शीं उदाहरणें बरींच पहाण्यांत येतात. बियांनीं त्रियांची संगती सोडूं नये ही जणूं काय सृष्टीची आज्ञाच दिसते. प्राण्याकडे वळले तर हेंच संगतीचें तत्त्व दिसून येतें. एकटी हरिणी, एकटा क्रौंच पक्षी, एकटा मासा असे कोणतेंही वनचरांतील, जलचरांतील अथवा खेचरांतील प्राणी कधीं असे पाहिले आहेत काय? ह्या जीवांत स-मदुःखीपणाचें तत्त्वही आहे. मांजर, सर्प यांना पाहतांच पक्ष्यांनीं कलकलाट केला नाहीं असें कधीं तरी झालें आहे काय? यावरून सलगीची इच्छा उपजतबुद्धींत पूर्ण-पणें आहे हें सुव्यक्त होतें. बरोबरच आहे. प्रत्यक्ष पर-ब्रह्मस्वरूपाला एकटी राहणी आवडली नाहीं. परमा-त्म्याला करमेनासें* झालें तेव्हां त्यानें मायेस उत्पन्न के-लें. त्या मायेची प्रसूति ह्मणजेच सृष्टिविस्तार होय, हें सुज्ञ वाचक जाणत असतीलच. सूर्य आणि किरणें, पाणी आणि पाण्यांतील लाटा ह्यांचा जसा संबंध आहे, तसा जीवाचा आणि परमात्म्याचा संबंध आहे. सूर्यांत असेल तेंच किरणांत येईल. पाण्यांत असेल तेंच लाटेंत वाहील. तद्वत् परमात्म्याचा जो हेतु, जी सहवासाची इच्छा, तीच आपणा सर्व कोटींत उतरावी हें साहजिक आहे. दैविक इच्छाच जर समाजरचनेची आहे तर स्वतःस अन्योन्य-

* सोऽकामयत । बहुस्याम् प्रजायेयेति, अशी श्रुती आहे. आहे. तिचा अर्थ नामदेवाच्या 'खेळियांतून' असा निघतोः—
आपली आवडी धरोनि पोटीं आपआपणांत व्यालेरे । इ० ३.

संबंधापासून दूर ठेवून 'मित्रावांचून चालेल कीं नाहीं' 'तमक्यावांचून अडेल कीं काय' 'विलग राहिल्यास कसें होईल,' असे अनास्थेचे प्रश्न उपस्थित करावयास आम्हांस अधिकार कसा पोंचतो हें समजत नाहीं. एकास दुष्कर झालेलें कार्य दुसऱ्याच्या मदतीनें सहजीं सुलभतेनें पार पडावें. ह्यांत मनाची एकी साधून त्यांनीं अशीं प्रीतिकार्यें पार पाडावीं व धाग्यास धागा ह्या नात्यानें दुसऱ्याकडून पार पाडवून न्यावींत, असा मुळींच ईश्वरीसंकेत दिसतो. नात्यासाठीं जीवित आहे. प्रीतीसाठीं मनें आहेत. संबंधावांचून कार्यें घडत नाहींत, हें स्पष्ट आरशासारखें आहे तर ह्या सर्वांसाठीं असलेला मानव अन्योन्यसंबंधीं आहे अथवा असला पाहिजे; हें सुव्यक्तच होतें. दूध हें एकटें पोषक आहे. पण रुचिवैचित्र्य असलेलें भोजनहि वैद्यशास्त्रसंमत आहे. एकटें पुरवठ्यास पडणार नाहीं. रुचिवैचित्र्यानें भोजनाचें कार्य भागेल. हीच गोष्ट एकट्या जिवाची आहे. जीवित मार्गावर एकटा प्राणी थकेल; संकटांनीं, व्याधींनीं नैसर्गिक पिडांनीं गांगरून जाईल. जाणता असताहि मायेची भूल पडेल व ह्या योगानें बुडत्याचा पाय खोलांत अशी स्थिती होईल निराशेनें होरपळून जाईल. म्हणून त्याचा हितवादि कोणी तरी पाहिजे, व्याधीव्याघ्राचे पाठीमागें उपायी पारधी सोडला पाहिजे अशी दैविक इच्छाच दिसते. तेव्हां ह्या सर्वांवरून कोणाचा कोणाशी तरि स्नेहसंबंध असावा अशी जीवित मांडणीच दिसतें. प्रसंग आला ह्मणजे स्नेह जुळून येतो, विचारानें एकदां अंतःस्थिति ताडून पाहिली ह्मणजे सलगी अथवा प्रेम साहजिकपणें

त्याची जोपासना करतात; व मैत्रीतरुवर फोपावतो. आतां उपसंहारादाखल दोन शब्द लिहून हा विषय आह्मी आटोपता घेतों.

उपसंहारः—मदतीनें परस्परकार्यभाग साधावा, व्यवहार मांडणी थाटावी हाच केवळ मैत्रीचा उद्देश दिसत नाहीं. तिचें बीजारोपण उच्च हेतुनें झालेले असावेंसें वाटते. सलगीनें ऐहिक कार्यें पार पडली आतां आत्म्याच्या उन्नतीचें साधन करूं हा मैत्रीचा पहिला उद्देश दिसतो. एकांतात मित्रद्वयांनीं परस्पराच्या चुका दाखवून व क्षमा शालिन्यधरून जीवित मार्ग सुधरावें, हा मैत्रीचा दुसरा उद्देश दिसतो. नुसत्या दृष्टीनें जग प्रथम कसें निर्थक भासलें मैत्रीनें अंतःकरण मोकळें झालें. परस्परांनी अनुभवाचें वाण दिलें ज्ञानाचें वाण घेतलें आतां विचारदृष्टीनें जग कसें दिसतें हें पाहूं व त्याचें प्रकाशन करूं हा मैत्रीचा तिसरा मतितार्थ अथवा तिसरा उद्देश दिसतो.

# व्यवहार.

The wise of all times have always said the same and the fools, that is to say, the immense majority of all times have always done the same and that is why Voltare tells us that we shall leave this world just as stupid and bad as we found it when we came here.

Schopenhaur.

# व्यवहार.

जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ॥

रामदास

" वेव्हार न साधे साक्षी वीण ' । ऐसे बोलती जन अज्ञान । साक्षि परमात्मा आपण । सत्याकडे निर्धारें ॥

मुक्तेश्वर-आदीपर्व.

व्यक्ति व्यक्तीमध्यें हिताहिताचें रणकंदन चाललेलें असतें, ज्या प्राप्तिसमुद्राचें मंथन चाललें असतां सुख आणि विशेषेंकरून दुःखाच्या लाटा उसळलेल्या दिसतात, ज्या नभोमंडळीं धन तारा प्राधान्येंकरून चमकत असतो, व स्वार्थ उपग्रह त्याभोंवतीं भ्रमण करीत असतो, ज्या राज्यांत नीतिदेवतेचा ढवळ्या दिवसां खून झालेला दिसतो व अनीति देवतेचा गौरव आणि व्याजस्तुति हे केविलवाणे देखावे जेथें सज्जनास पाहण्याचा प्रसंग येतो, तें राज्य, तें नभोमंडळ, तो प्राप्तिसमुद्र व तें रणकंदन ह्मणजे व्यवहार होय.

व्यवहाराचें मूळ सूत्र सृष्टींतून आहे. सृष्टि ही व्यवहाराची खाण आहे. मनुष्यानें व्यवहाराचा धडा प्रथम

सृष्टिमातेपासून घेतला असावा असें दिसतें. गरिबाच्या विळ्यापासोन राजकुमाराच्या भरजरी दुपेट्यापर्यंत येणाऱ्या वस्तूकडे पहा, सर्वांची उत्पत्ति सृष्टीपासून आहे. भूकंपानें अरण्यें दडून जावीं तों कालांतरानें तेथें दगडी कोळसा व्हावा; स्वाति नक्षत्राच्या धारा शिंपल्यांत पडाव्या तों रत्नाकरांत विलासी जनांकरतां मोत्यें तयार व्हावीं; एखाद्या सिंधुप्रवाहाचे ठिकाणीं किंवा विस्तृत दऱ्या खोऱ्यांत निसर्गानें सौंदर्य थाटावें तों कवीनें कादंबरीकारानें तें वर्णन विषय ह्मणून घ्यावें, चित्रकारानें तेथें कल्पना सृष्टि रचावी, असा हा उघड उघड प्रकार आहे. तर सृष्टि व्यवहाराची खाण ठरूं पहात नाहीं काय? वरील मांडणी सहेतुक आहे, आणि हेतुखेरीज व्यवहार होत नाहीं तर ती मांडणी व्यवहाराकरतां असली पाहिजे हें स्पष्टच दिसतें.

सृष्टि आपल्या व्यवहारास उज्वल स्वरूप देते. कपटी मनुष्य त्यास ओंगळ हिडिस स्वरूप देतो. सृष्ट पदार्थांचा शोध चालला असतां त्यांतून सत्य बाहेर येतें. मानवाच्या व्यवहारांत बहुधा सत्यास खालीं पहावें लागतें. सृष्टीचा व्यवहार उघड उघड. मानवाचा व्यवहार झांकून लपून. मुळांत सर्व शुद्ध आहे; सहवासानें बरें वाईट ठरलें आहे. व्यवहार चांगल्याशीं झाला ह्मणजे तो चांगला ठरतो. मूर्खाशीं झाला ह्मणजे कानास खडा लावून घ्यावा लागतो.

'आमच्या दुकानीं लबाडी नाहीं; आणि आपण होऊन आलेल्या गिऱ्हाइकांशीं तर मुळींच लबाडी करावयाची नाहीं. 'एक बोलणें हा आमचा धारा' असें पू-

२५३

वोंच्या गिऱ्हाइकास बजाविलें असलेल्या शेटजीच्या दु-
कानीं एक गिऱ्हाइक येतें. कापडाची किंमत विचारतांच
शेटजी ह्मणतात ' अहो एकच भाव सात आणे गज.'
गिऱ्हाइकास मालाच्या मानानें किंमत अधिक वाटते. तें
नाखुष होऊन दुकानाबाहेर पाच चार पाऊलें जाऊं ला-
गतांच शेटजी ह्मणतात ' अहो तुह्मीं काय द्याल तें तरी
सांगा?' गिऱ्हाइक ह्मणतें ' फार झालें तर तीन आणे दे-
ऊं. एक भाव ह्मणतां तोंडाने मग असें कां? गिऱ्हाइका-
नें किंमत फार उतरविली ह्मणून शेटजीचें माथें फिरून
जातें. शेंवटीं तास अर्धातास वाटाघाट जिकीर झाल्यावर
तें प्रकरण चार आण्यांवर तुटतें. व जातांना मोठ्या सफाईनें
शेटजी गिऱ्हाइकांस बोलतात 'आमचा हा व्यवहार असाच
चालावयाचा. खरें बोलून व्यवहार चालेल कसा? अहो,
खोट्याचें खरें खऱ्याचें खोटें हें आमच्या व्यापाराचें
ब्रीदच.' शाबास! शेटजी शाबास!! काय पण उत्तम
सार काढलें? आणि जगास सत्याची चाड दाखविली!
हरिश्चंद्रा! ही सत्याची धिंड पाहून तुझा आत्मा कसा
तळतळत असेल नाहीं बरें? ' सत्याचा भंग कधीं जा-
हला नसे,' ह्मणणाऱ्या चारुदत्ता ही सत्याची मानखं-
डना पाहून तुझ्या डोळ्यांतून ढळढळ अश्रुबिंदु किरे
पडत असतील! पण येथील मठ्ठ लोकांना त्याचें काय
होय? पूर्वीच्या सत्यप्रिय आर्यांचा असा व्यवहार खा-
स नसला पाहिजे. पूर्वींच्या देवघेवींत इतकी वक्रता अ-
सेल असें वाटत नाहीं. असो; प्रीति घ्यावी लागते प्रीति
द्यावी लागते. झीज सोसावी लागते तेव्हां झीज घेतली
जाते. देवाण झालें तर घेवाण आहे. आर्जव केलें

तर विनंती करतात. मान ठेवला तर मान मिळतो. सत्य बोललें तर सत्याची फेड होते. असा हा व्यवहार-दर्पण आहे. त्यांत ज्या मुद्रेनें पहावें त्या मुद्रेचीं प्रतिबिंबें दिसतात. व्यवहार खोटा नाहीं. वागणूक खोटी आहे. व्यवहार नांवास काळिमा आणित नाहीं. सर्वस्वी कृती उक्ति आणते. व्यवहाराचीं प्रधान अंगें तीन आहेत. पहिलें अंग सरळता, दुसरें स्पष्टता आणि तिसरें सत्यता. ह्यांचा क्रमाक्रमानें विचार करूं.

**सरळता**:—सृष्टींतील कोणती वस्तु सरळ नाहीं? झाडाची वाढ सरळ आहे; घाटे सरळ आहेत; विहिरी सखोल असल्यातरी सरळ आहेत; पर्जन्यधारा सरळ येतात. नदींचे प्रवाहहि सरळ आहेत. आतां शेवटच्या दोन उदाहरणांत जी वक्रता दृष्टीस पडते तीस वायु आणि पृथ्वीचें भ्रमण हीं कारणें आहेत. बाकी त्यांच्या मूळस्वरूपांत वक्रता नाहीं. वेतही सरळच आहे पण जनकृतीनें त्यास वांकडेपणा आणला आहे, त्यास तो काय करणार? तोच प्रकार व्यवहाराचा आहे. वस्तूच्या, पदार्थांच्या ठिकाणीं असलेली वक्रता जीवांच्या उपयोगीं पडते. पण मानवाचा प्रकार तसा नाहीं. वक्रता आकारांत चालेल, वागणुकींत चालावयाची नाहीं. नैसर्गिक वक्रता उपायी आहे. बुद्धीनें आणलेली वक्रता अपायी आहे. व्यवहारपहाणीवरून, असें ठरवितां येतें कीं, जोड—मग तो वस्तुमात्राच्या ठिकाणीं असो अथवा पदार्थमात्राच्या ठिकाणीं असो तो वाईट आहे; अल्पायासी नसून प्रयासी आहे. सरळ लाकडांत जितकीं सहज कामें निघतील तितकीं बरीं. त्यांत जो-

डीचा प्रसंग आला ह्मणजे ठीक नाहीं असें सुताराचें मत असतें. तोच प्रकार भाषणाचा आहे. सरळ भाषण उत्तम असतें. त्यास जोड लावावयाचा ह्मणजे प्रयासाचें काम आहे. त्याला युक्ति जुक्ती बरीच खर्च करावी लागते. नसते कुतर्क, नसत्या कुशंका ध्याव्या लागतात असें बोलणें बरें कीं, तसें बोलणें बरें, असें वचन द्यावें कीं, बोलण्यांत अशी लपेट ठेवावी ह्या शंकाभुतांनीं मन गांगरून जातें; वृत्ति दोषी होते. असा माणूस दुटप्पी वर्तनाचा ठरतो. बोलण्यांत डावपेंच ठेवणें हें कुत्सित मनाचें काम आहे. साहजिक वृत्तीनें मनांतून बोल सुटावा. मग तो ऐकणाऱ्यास कसाहि वाटला तरी हरकत नाहीं. ऐकणारा सुस्वभावी असला तर त्याला सरळ स्वभावाची चांगली परीक्षा कळते. तो मुळींच नांवें ठेवित नाहीं. द्वेषी आणि दुटप्पी वर्तनाचे जे असतात ते मात्र नांवें ठेवतात. विचारी गृहस्थानें ह्यांना काय ह्मणून भीक घालावी? निंद्य तें निंद्यच. तें कालांतरानें अथवा स्थलांतरानें वंद्य कधींतरी होईल काय? स्वभाव सरळ असावा. लोकांनीं तो वांकडा ह्मणून समजावें. धोरण शुद्ध असावें. जनांनीं त्याची गणना तऱ्हेवाईकांत करावी. ह्या मोठ्या दुःखाच्या गोष्टी आहेत. येथें व्यक्तीस सहनशीलतेपरता दुसरा उत्तम मार्ग नाहीं. जनसमूहाचें मत दृष्टीवर असतें, विचारावर नसतें. मग खेद काय ह्मणून करावा? धर्मराजा इतक्या सरळ सुस्वभावी वर्तनाचा प्रत्यक्ष कट्या शत्रूस इतर लोक दुर्योधन ह्मणत असतां आपण त्यास सुयोधन ह्मणून हाक मारीत असे. तरी पण त्याला दुर्योधन शत्रु होताच. मग तुह्मां

आह्मां सामान्य जनाची कथा काय? असो, डोळ डोळाच्या मोलानें जाईल. डाळ डाळीचे किंमतीनें विकेल. येवढें ध्यानांत ठेवलें ह्मणजे पुरे आहे. सरळ स्वभाव माहीत होई तों कायतो जाच द्वेष. पुढें कांहीं नाहीं. सरळ मार्ग लांब आहे,पण सरळ मार्ग सुरक्षित आहे तेव्हां त्यावर येणें जिवाचें कर्तव्य दिसतें.

**स्पष्टता**—शुद्ध स्वरूप सर्वांना प्रिय आहे. स्पष्टतेंत शुद्धपणा आहे ह्मणून ती सर्वांना मान्य आहे. सावकार कुळास म्हणतो दस्तऐवज करून ध्यावयाचा अहे. स्पष्ट सांग शेंकडा रुपया व्याज देशील कीं नाहीं? कुळानें 'होय' म्हटल्यानंतर सावकार कचेरीचा मार्ग सुधारतो. धांदलीनें वाचीत असणाऱ्या विद्यार्थ्यास गुरुजी ह्मणतात ' मुला, अशा वाचनानें तुला काय बोध होईल बरें? वाचिलेस तेंच स्पष्ट वाच पाहूं? ह्मणजे तुझें तूंच त्यांतून अर्थ काढशील." वक्ता सभेंत भाषण करीत असतां आवेशाच्या भरांत भराभर वाक्यें उच्चारूं लागतो. तोंच कोपऱ्यांतून "हळु, आणि स्पष्ट महाराज" असा ध्वनी निघतो. ह्या तिन्ही उदाहरणांवरून हें ध्यानांत येईल कीं, जो तो आपापल्या इच्छेनुरूप स्पष्टतेंतून अर्थ साधून ध्यावयास आतुर झाला आहे. मग आतां स्पष्टता अर्थदायिनी आहे हें सिद्ध झालेंच. स्पष्टवाणी शुद्धस्वरूप आहे, सर्वसम्मत आहे. तर ती सर्व प्रिय कां नसावी? प्रिय असणाऱ्या गोष्टी प्रिय वाटाव्या हें साहजिक आहे, पण प्रिय वाटून घेणारीं मनें कुठें सारखीं आहेत? मतभेद असल्यावर मनें एक असावयाचीं नाहींत हें सर्व सम्मत आहे, पण सा-

मान्यनीतीसंबंधीं मतें अथवा मनें एक व्हावयास पाहिजे आहेत. तसें ज्या मनाच्या ठिकाणीं होत नाहीं तें मन सर्वांस असम्मत आहे. असो, तिन्ही मनांस स्पष्ट उत्तर दिलेलें आवडतें. पण तेथेंच असलेलें चौथें मन तें ऐकून खट्टू होतें; त्यास राग येतो. तिन्ही मनाला कांहीं वाटूं नये आणि चौथ्या मनानें तें विषम कां मानून घ्यावें बरें? ह्यास असें उत्तर देतां येईल कीं, त्या चौथ्या मनास स्पष्ट बोलण्याची संवय नाहीं. तें शिक्षणाच्या किंवा संगतीच्या अभावामुळें तसें पात्र झालें नाहीं. स्पष्टतेचे गुटके प्रथम कडु असतात पण अंतीं गोड असतात. स्पष्ट बोल तो खरा बोल. अस्पष्ट बोल ह्मणजे फसवणूक होय. स्पष्ट भाषणानें खरी ती योग्यता समजून येते. अस्पष्ट भाषणानें वर्तनासंबंधीं नसता संशय मात्र उत्पन्न होतो. आतां स्पष्टतेनें प्रथम स्नेह तुटेल. पण असें पहा कीं, अशा रीतीनें ज्यानें स्नेहभाव सोडला तो मूळचा किती हीन दर्जाचा असला पाहिजे बरें? मग तसा तुटल्याबद्दल खंती ती कशास हवी? त्याग आहे तर स्पष्टता आहे. स्पष्टता आहे तर व्यवहार शेवटीं सुखाचा होणार आहे. एवढें ध्यानांत ठेवलें तरी पुरी आहे.

**सत्यता**—गवताच्या काडीपासून विस्तीर्ण वृक्षापर्यंत, अणुरेणूपासून हिमाचलापर्यंत, बिंदूपासून जलनिधीपर्यंत सत्य भरलें आहे. मानव ह्मणजे साक्षात् ईश्वरी अंश. ज्याच्याकडे चराचराचें चालकत्व येत असतें; व्यवहारमांडणी ज्याकडून होत असते, ज्यावर सरस्वतीचा वरदहस्त असतो, ज्याच्या वाणींत प्रत्यक्ष बृहस्पती

अवतरल्यासारखा भास होतो त्या मानवांत सत्य किती भरलें असेल हें नुसत्या कल्पनेनें जाणलेलें बरें ? सत्याचा दाता भगवान आहे, सत्य ठेव त्या त्रिगुण मूर्तीत आहे. अशा ह्या पुण्यश्लोकांत जी ठेव आहे तिच्याशीं आमच्या विचाराचें पुत्रवत् नातें आहे, अनंत जन्मांतून सत्यमाता फिरत असतां शेवटीं विचारानें मानवाच्या द्वारें तीस येथें गांठलें आहे. असा हा सुयोग इतर प्राण्यांचे नशीबीं नाहीं, हें भाग्य आह्मांसच लाधलें आहे.

नरदेहाची थोरवी कां गायली आहे? तर तो वस्तूंतील सत्य प्रकाशांत आणतो ह्मणून. जीविताचे पोवाडे कां गातात? जीवितास प्रवृत्तींत कां ठेवितात? तर त्यांतून सत्याचा शोध निघतो ह्मणून. स्वार्थाकारितां ह्मणा कीं लोकार्थाकारितां ह्मणा कीं परमार्थाकारितां ह्मणा व्यक्तींचा जो अन्योन्य संबंध जुळून आलेला असतो तो नेहमीं व शेवटीं सत्य दाखविणारा आहे हें आढळून येईल. अशी ही सत्याची मूळपीठिका आहे. त्याचें प्रकाशन करणें मानवाच्या हातांत आहे आणि त्यासाठीं हा व्यवहार आहे. असें पहा, गवताच्या जन्मांत सत्य असावें आणि वाणीच्या जन्मांत सत्य नसावें काय? जलबिंदूनें वरून अवतरावें, आपलें रमणीय स्वरूप प्रगट करावें, जेथें पडेल तेथें वर्णनविषय व्हावें; मग प्रत्यक्षजिव्हेपासून उत्पन्न होणाऱ्या वाणीबिंदूनें मनोहर स्वरूप कां घेऊं नये व चित्तास आणि कर्णांस कां तोषवूं नये? निर्जीवानें कसेंही वागलें तरी चालेल. पण सजीवानें त्यांतले त्यांत ज्यामध्यें विचाराची भर येऊन पडली आहे त्या जीवानें मोठ्या जबाबदारीनें वागलें पा-

हिजे. खरें बोलावें. खरें चालावें, ह्यांत स्वहित आहे व परहित साधतें, ही नीति सर्वांना कळते. ही धर्माज्ञा आहे हें जन जाणतात. पण हें जाणणें वळत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे! कळलें तितकें वळलें असतें तर आज जगाला किती मनोहर स्वरूप आलें असतें? खरें बोलावें असें बुद्धीला वाटतें, पण तशी वागणूक होत नाहीं. सरळ मार्ग दिसतो पण त्यावर जाणें होत नाहीं. अशा लोकांचें मन विचाराभावामुळें निगरगट्ट झालेलें असतें, त्यावर कसलाहि उपदेशवर्षाव केला तरी तो व्यर्थ होतो. जीं मनें इतक्या निकृष्टतेस पोंचत असतात त्यास मुख्य आणि पहिलें कारण वाईट संगती ही होय. दुसरें स्वतःचा अविचार हें होय. व्यवहाराचें आक्राळविक्राळ स्वरूप जे दाखवितात ते मुळींच आपल्या खोट्या कृतीनें व बोलानें पोळलेले असतात. अशांचा अनुभव पाहण्यासारखा आहे. त्यांची री ओढण्यांत मात्र अर्थ नाहीं. अनादि कालापासून सर्वेषाम् जनराहणी पाहिली तर वाइटाची संख्या अधिक आहे आणि व्होल्टेअरनें ह्मटल्याप्रमाणें व श्रीसमर्थांनीं कथन केल्याप्रमाणें ही अधिक संख्या अथवा ‘ समूह ’ ‘ मूर्ख ’ व ‘ अज्ञान ’ असाच राहणार आहे. तथापि, शहाण्यांचें एवढें कर्तव्य दिसतें कीं, त्यांनीं ह्यांना संभाळून घेतलें पाहिजे व शक्य तेवढ्या उपायांनीं चांगल्या मार्गाकडे वळविलें पाहिजे. स्वतःच्या वागणुकींत विचार आपला पाहिजे. जनाचा नको. जन त्रिविध आहे त्यांचा रागरंग पाहून बोललें ह्मणजे त्यांना प्रिय असतें. मग त्यामुळें सत्याची कितीहि धिंड

निघो, शहाणे त्यास कितीहि दूषणें देवोत, त्यांना त्याचें कांहीं नसतें. जो जनांच्याच पाठीं लागला तो सत्याला अंचवला, व स्वतःला मुकला. असो; कांहींहि झालें तरी सत्य तेंच बाहेर येणारें आहे. व्यवहारांत सत्यानें चालत असतां मार्गीं संकटें येतील. पण त्यांत सत्याचा दोष नाहीं. तो स्वतःचा कस पाहिला जात असतो. सृष्टींतील राहणी अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, तींत सात्विकांचा देखील छळ होतो. प्र्ल्हाद, श्रियाळ, बळी ह्यांचीं चरित्रें वाचिलीं ह्मणजे हेंच रहस्य कळून येणार आहे. तेव्हां अशा ठिकाणीं सत्वास जागृत रहावें हेंच उचित होय. मोरोपंत ह्मणतातः—

**'भावें परीक्षेकरितां केला छळ परि कसीं उतरलास॥**
**मीं भक्तांस स्वपदीं करितों सुस्थिर सदा सुतरलास॥'**[1]

तुकोबारायांनीं ' तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटूनीया सार उरलें तें ' असे गाथेंत उद्गार काढले आहेत. इतकें पाठबळ असल्यावर आणखी काय पाहिजे ?

**सन्तदृष्टी आणि व्यवहार**:—आतां संत आणि व्यवहार ह्याकडे वळूं. बहुधा अशी समजूत असते कीं संतांना व्यवहार समजत नाहीं. पण हें ह्मणणें किती अज्ञानाचें आणि चुकीचें आहे बरें ? असें जर असतें तर ज्ञानेश्वर महाराजांनीं " तैसी[2] कर्मीं जया अयोग्यता । तयांप्रति नैष्कर्म्यता । न प्रगटावी खेळतां । आदिकरोनी ॥ तेथें सत्क्रियाचि लावावी । तेचि एकी प्रशंसावी । निष्कर्मींहि दावावी । आचरोनी ॥ ( त्याप्रमाणें कर्माला जे अधिकारी आहेत त्यांना होतां होईतों निरि-

---

१ ( ब्रह्मोत्तर खंड १४. ३७. ) २ ( अ. ३. ७३ वी. )

च्छता सांगत बसूं नये. त्यांना उत्तम कर्माळाच लावावें. त्याचें महत्त्व गावें आणि निष्कामजनांनीं तसेंच आचरावें. ) असें जर हें असतें तर " भिक्षापात्र अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणे " हे उद्गार तुकोबांनीं काढिले नसते. अमृतरायांनींही ' धर्मकार्यार्थीं यावें मरण । हा हेतुप्रमाण असें गायलें नसतें.

आतां, ह्या मंडळीचा किंवा अशा वर्गांतील ज्ञातेलोकांचा निरपेक्षतेनें कालकक्रमणा करण्याचा उच्च व उदात्त हेतु असल्यामुळें त्यांना सामान्य जनासारखें किरकोळ उपाधींत पडावयाचें नसतें. अनादि कालापासून ज्या पुरुषांच्या शिकवणुकीमुळें आपला व्यवहार चालला आहे, ज्यांचा बोल आपणास क्षणोक्षणीं मैंदाच्या कृतीस सावध रहा ह्मणून जागृत करित आहे त्याच्या कपाळीं व्यवहार शून्यतेचा टिळा लावणें किती धाडसाचें आहे बरें ? श्री समर्थांसंबंधी बोलावयास नकोच. ' दासबोध' ही त्यांच्या व्यवहारज्ञतेची प्रतिमा आहे. कैक शतकें झाली तरी त्यांच्या इतका व्यवहारनिपुण निपजेल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. संतांना व्यवहार समजतो त्यांतील क्षुद्रता आवडत नाहीं. संतांना सत्य सदैव आवडतें; पण सत्याची धिंड पाहिली कीं त्यांचा अश्रुपात होतो. संत नीतिप्रवर्त्तक असतात; त्यांना नीतिमान जीव आवडतात. पण अनीतीचे पुतळे व पुतळ्या सावलीस नको असतात. असे हे दुसरे देखावे डोळ्याखालीं येऊं नयेत ह्मणून ते एकांतवास पतकरतात. जननीति सु-

---

१ दामाजीपंताचें च. ८९ वी.

धारणें हा ज्यांचा उद्देश, जनकल्याण हा ज्यांचा जीवितहेतु, त्या संतांना व्यवहारज्ञ कोण ह्मणणार नाहीं?

**लोकाचार आणि कुलाचार** व्यवहाराच्या अनेक बाजूंपैकीं लोकाचार आणि कुलाचार ह्या दोन महत्वाच्या बाजू आहेत. जुन्याचा आदर करणें जितकें महत्त्वाचें आहे तितकें नव्याविषयीं विचार करणें महत्त्वाचें आहे. जुन्यांतील साधेपणा अंगिकारणें जितकें श्रेयस्कर आहे तितकें नव्याचा कस लावणें श्रेयस्कर आहे. जुनें परीक्षेंतून पूर्वीं उतरलेंच असलें पाहिजे, मग नव्यानें परीक्षेस तयार कां असूं नये? जुन्यानव्याची एकी करण्यास धोरण, तारतम्य आणि आदरबुद्धि हीं खर्च केलीं पाहिजेत. जुन्या वृक्षानें अधिक पावसाळे सोसले आहेत, तो अनुभवी आहे, तेव्हां नव्याफांदिनें त्याचे आश्रयास येणें हितावह आहे; पण पहिल्यानें हें ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, पारंब्या फुटून आपणास आधार होणार आहे, तो ह्या नव्या फांदीकडून होणार आहे, तर तीस तुच्छ मानणें अनिष्टकारक आहे. पूर्व ग्रहात्मक द्वेषी छटा मनावर न उठूं देतां नव्यानें कुलाचार वैद्यशास्त्रास धर्मशास्त्रास किती जुळून आहे हें शोधक दृष्टीनें पहावयास नको काय?

वाईट असें कांहीं नाहीं. फक्त द्वेषी आणि दूषी मनें मात्र वाईट आहेत. नातीं तोडूं नयेत, नातीं जोडावींत, हेंच जीवितरहस्य अथवा व्यवहाररहस्य आहे. विचारीमन कुलाचार आणि लोकाचार पाळण्यास नेहेमीं तयार असतें. जाणते ते जाणतेच. कोणत्याही स्थितींत असले तरी ते भूषणानें जगतील व जगवीतील. पहा बरें,

गुळवेलीनें नांवहि गोड धारण केले आहे आणि ज्वर-पीडितास बरें करण्यांत तिची कृतीहि गोडच आहे.

उपसंहारः—खरें व्यवहारिक होऊन कृतीनें अथवा बोलानें निर्दोषी ठरणें हें कठिण आणि कुशलतेचें आहे. व्यवहाराच्या मूशींतून असे निघालेले अळंकार क्वचित्. होता होईतों पूर्ण विचार करून कार्यास आरंभ करावा. इतक्यावरहि जर आकस्मित गोष्टींनीं मध्यें व्यत्यय आला, हेतु साध्य झाला नाहीं, माथीं दोष बसला, विचार कोता ठरला, तर त्यास नाइलाज आहे! पूर्ण निर्णय करण्यास मानव असमर्थ आहे. कोणाकडून भावी काळीं कसें संकट ओढवेल हें जाणणें मानवाच्या शक्तीबाहेर आहे. दैविक बुद्धिरूपी देणगींत कसरत करावयाची आहे. तथापि, कार्यारंभीं खरेंपणानें अंतः-करणाची साक्ष पटविली तरी पुरें आहे. प्रथम आणि शेवटीं सदसद्विवेकबुद्धीनें मनास टोंचणी दिली नाहीं ह्मणजे कार्यभाग आटोपला. मग व्यवहार समजला असें समजावें.

# धन

अजि तुह्मी ऐका । सखि सहोदर ह्मणती पैका ॥ ध्रुवपद ॥ पैक्यापासुन काम काज। पैका मिळवी बहुत व्याज । पैका मायेचें निज बीज । पैका बहुरत्न महाराज । कागद रोखा ॥ सखि० ॥ १ ॥ पैक्यापासुन कारभार । पैका हिंडवी दारोदार । पैका दुःखाचा डोंगर । पैका गर्वाचा सागर । बुडवी कटका ॥ सखि० ॥ पैक्यापासुन पुराणश्रवण । पैका करी वेदपठण । पैका करी नृत्यगायन । ज्याला पैका न मिळे कधीं तो नित्य फिका ॥ सखि० ॥ ३ ॥

( अमृतरायकृत पद ७ वें )

मायेचें स्वयंसिद्ध रोप, आज्ञानाचें तारक व विद्वानांचें साधक असें हें धन ऐहिक व्यापारांत एक अजब चीज होऊन बसलें आहे. गृहांत सौख्याची मांडणी करावयाची आहे तर धन पाहिजे. समाजांत व राष्ट्रांत कार्यें घडवून आणावयाचीं आहेत तर प्रथम लक्ष्मीपूजन झालें पाहिजे. एकंदरींत धन ही एक मोठी शक्ति आहे. चलती

धनाकडे दिसते. मनुष्यबळ धनसमृद्धीकडे धांव घेतें. आतां प्रथम धनाच्या ठेवीकडे वळूं. धनाच्या ठेवीकडे पाहूं जातां त्या दोन आहेत असें दिसून येईल. पहिली निसर्ग, व दुसरी अन्योन्यसंबंधाची अथवा जीस सामान्येंकरून व्यवहार असें ह्मणतात ती. प्रथम पहिलीकडे पाहूं.

ज्या अर्थी प्रत्येक भक्षण करणारा आहे त्या अर्थी प्रत्येक मिळविणारा झाला पाहिजे. पण मिळविणें गुणाविना साध्य नाहीं. तेव्हां प्रथम तो संपादिला पाहिजे. सृष्टिमाता ही गुणांनीं समृद्ध आहे, तिजपासून घेणारास हवें तें घेतां येईल. रुचिवैचित्र्यानें एक तिची पाहणी करून तत्वें काढतो तो तत्वेत्ता होऊन बसतो. दुसरा तिच्या सौंदर्यीं रममाण होतो तो कविभूषण घेऊन बसतो. तिसरा खनिजाकडे वळतो तो प्रतिमाकार होतो. त्यापासून एकाला रसज्ञ होण्याचीच इच्छा होते. दुसऱ्या एकाची लहर वनस्पति धर्माकडे जाते,तो ती स्वारी धन्वंतरी नांवास पात्र होते. असे तिचे एक कां दोन गुण ह्मणून सांगावे? अगणित व असंख्य गुणधर्मांनीं ती परिपूर्ण आहे. ह्या सर्वांची भोक्ति एक रसिक दृष्टि होय. ती जेथें रमेल तेथें खडान् खडा शोध लावून गुणसंपन्न होईल व अंतीं स्वतःच्या उदाहरणानें सृष्टि ही गुणाची व त्यामुळें धनाची कशी गुरुकिल्ली आहे हें दाखवील. आवडीनुसार प्रत्येकाला रसिक दृष्टि आहे. जेथें ही आहे तेथें तिचें कलानैपुण्य निद्रित आहे. स्वतःचेठायीं असलेला गुण प्रत्येक व्यक्तीनें कर्तव्याच्या लाटेनें प्रकाशांत आणिला पाहिजे. व्यक्ती विशेष गुणांसह जन्मास

आलेल्या असतात. व्यक्तींत कोणत्या तरी एका कलेचें अंग असतेंच असतें. आवड ही ह्या गुणाची अथवा धर्माची खरी व्यंजक आहे. तिचे जागृतीबरोबर कर्तव्यास लागावें लागतें, ह्मणजे साहजिकपणें निसर्ग तेथें मदतीस येतो. कालांतरानें वसत असलेला गुण गुणी ह्मणून प्रकाशांत येतो. असें झाल्यावर धन आपोआप गुणीकडे धांवत येतें. निसर्गांतून धर्म काढून घेऊन गुणी जरी बनलें तरी प्रत्यक्ष लक्ष्मीदर्शन परस्परसंबंधांत अथवा व्यवहारांतच आहे. तेव्हां अनेक भाव धरून तिची जोड करून घ्यावी लागते हेंहि येथें विसरतां कामा नये. सृष्टीच्या कोणत्याहि धर्माची अथवा पदार्थाची मांडणी रूपांतरानें केली ह्मणजे तो धर्म अथवा तो पदार्थ दृष्टिविषय होऊन बसतो व नंतर गरजेनुरूप त्याचें लौकिकांत भ्रमण होतें. ह्या त्याच्या गतींत धनाचें सूत्र हातीं मिळतें. हें सूत्र बरेंच हातीं आल्यास कोणी लक्षाधीश होतील, कोणी कोट्याधीश होतील. हे लक्ष्मी संबंधीं उच्चनीचाचे भाव बरेच आहेत. त्यांकडे आपणास पहावयास नको आहे. कारण अमुक एक आंकड्यापर्यंत गेलों ह्मणजे इच्छा तृप्तीची श्रीमंती भोगिली, असें कोणीच धनिकानें ठरविलें नाहीं. तृप्ति अशी कशाचीच व्हावयाची नाहीं. आणि त्यांत श्रीमंतीची तृप्ति जीवाशा असे तों होणार नाहीं. हें धनिकाचें सूत्र आहे. असो, आपणास जेम तेम श्रीमंती पाहिजे आहे; तेव्हां त्या पुढच्या पायरीचा विचार उगीच कशाला करावा? धनोत्पादन मुळीं माफक असावें. धनाशा प्रमाणांत असली पाहिजे ह्मणजे मनोधर्म प्रमाणांत असतात व शो-

वटीं जीवितहेतूहि प्रमाणानेंच साध्य होतात. धनसंचयाची महती प्रमाणांत आहे, अतिरेकांत नाहीं. अतिरेक आधींच दुष्परिणामावह आहे. त्यांत धनप्राप्तीचा तर हृद्रोगजनक आहे. असो, एथपर्यंत धन्याच्या ठेवी, धनाचे प्रमाणांकित सुपरिणाम व त्याचा अतिरेक याविषयीं झालें.

आतां **धनसंगोपनाकडे** व **धनाच्या उपयुक्तते**कडे अल्पकाळ पाहूं. वस्तूची प्राप्ति होईपर्यंत त्याविषयीं बराच विचार केला जातो; पण तिच्या प्राप्तीनंतर तिच्या संगोपनाची काळजी फारशी घेतली जात नाहीं, ही एक शोचनीय गोष्ट आहे! ही स्थिति धनाची आहे.

आद्याच्या वेळची काळजी व्ययांत घेतली जाईल तर धनाचा प्रधान नियम समजला असें ह्मणावे लागेल. धन हा एक अंमल आहे. अमली मनुष्याचा जीव अंमल मिळण्यापूर्वीं माशासारखा तळमळत असतो तसा धनहीनाचा जीव धन मिळण्यापूर्वीं त्याच्या प्राप्तीसाठीं हवा तसा खपत असतो. अंमल मिळाल्यानंतर त्या विषयबाजाची तंद्री काय विचारावी? स्वारीस स्वर्ग दोन बोटेंच उरला असतो असें नाहीं, तर प्रत्यक्ष स्वर्गांत असल्याचा भास होतो. अशीच स्थिति ह्या नूतन धनिकाची होते. मग, खाईन तें थोडें, ऐषआराम भोगीन तो कमी, आहेत हे भोगच मुळीं कमी आहेत, अशा मनोवृत्ती वाहत गेल्यास नवल तें कसचें? अशांत जर तारुण्याची व अविवेकतेची भर पडली तर त्यो देखाव्यास आणि त्या ताठ्यास उपमेचें दुसरें उदाहरणच नाहीं. धना, तुझी कीर्ति एवढी उज्वल! तुझा गुणगंध इतका सुवासिक!

तुझें तेज इतकें मनोहर ! पण तुझी पात्रापात्र विचारणा इतकी हीन कां बरें ? अरे, अविद्वान असो मलीन अंतःकरणाचा असो, त्याच्या देहावर वृथा झीज सोशीत बसावेंस आणि विद्वान् असो, निर्मळ अंतःकरणाचा असो, त्याच्या सावलीस उभा राहूं नयेस, ह्या तुझ्या तारतम्यतेस काय ह्मणावें ? पहिल्याच्या व्यसनाकरितां तुझा उदारपणा आहे ! आणि दुसऱ्याच्या मदतीस तेवढा तुझा क्षुद्रपणा येतो ? ह्यांत ह्मणजे विद्वानास कमीपणा येतो असें मुळींच नाहीं. पण तुझ्यांतून नष्ट झालेला सारासारविचार मात्र व्यक्त होतो. अविद्वानाची जितकी तरफदारी करशील तितकी हास्यास्पद आहे. शहाणे आणि मूर्ख, हळद व केशर यांप्रमाणें निवडले जातात. पहिलींचें कपाळीं द्रोण व दुसऱ्याचें भाग्य चांदीच्या वाटींचें आहे. ह्या परीक्षेनें जग चालत आहे व चालणार आहे. ह्याचें तुला ज्ञान असून मुद्दाम अज्ञानांत शिरतोस ह्याला काय म्हणावें ? झालें तें झालें. आतां तरी गुणग्राहकता धर. असो, कोठें पैसा असून तो जतन करतां येत नाहीं आणि जतन करावयाचें ज्ञान असून तेथें तो येत नाहीं; ह्या प्रकाराला दांत आहेत तेथें चणे नाहींत, चणे आहेत तेथें दांत नाहींत, ह्यास दुर्दैवाच्या सदरांत मोठ्या कष्टानें बसवावें लागतें दुसरें काय? पैसा जोड करतो. पैसा नातीं वाढवितो व नांवलौकिकांस चढवून परोपकारांची कार्यें घडवून आणितो. एकंदरींत जें जें म्हणून आपलें प्रिय असें आहे त्याचें बरें करवितो. नरदेह अनेकदां कां लाभतात ? ‘अनंत जन्मींचें शेवट पाहतां। नरदेह हातां आला तुझ्या। कराल तें जोडी येई-

ल कार्यासी । ' अशी स्थिति आहे. अशी तुकोबारायाची जीवांस जागृती आहे. मनानें जर दुसऱ्याचें हित साधतां येत नसेल तर निदान धनानें तरी साधावें. हा पक्ष गौण कोणीहि समजणार नाहीं. निढळच्या घामानें पैसा मिळवावा व जपून ठेवून त्यांतून स्वार्थ साधावा, मदतीनें व परोपकारानें जगांत खेळता ठेवावा तरच कांहीं द्रव्यार्जन केल्याचें श्रेय व जपून ठेवल्याचें भूषण आहे. नाहींतर तिमाजी नाइकहि होते. पैशाच्या राशीहि होत्या, पण त्यांचा त्यांना काय उपयोग झाला? पश्चात् मुलांनीं त्या धनाची मांडणी व्यसनांत मात्र थाटली ! दुसरें कांहीं झालें नाहीं. असो. **धन मिळवावें उत्सुकतेनें, जतन करावें काळजीनें व द्यावें निरपेक्षतेनें हें धनिक म्हणविणारांनीं ध्यानांत ठेविलें तर त्यांना अर्थशास्त्र समजलें असें म्हणतां येईल.**

**धन आणि सौख्यः**—बहुधा अशी समजूत असते की, जेथें धन विपुल आहे तेथें सौख्य आणि शांतता विपुल नांदत असतील. पण अशीं भाग्याचीं स्थळें विरळा. ' सुख नसे कधीं राजिया मनीं ' असे देखावेच सर्वत्र. धन असून सुख मानूं नये, ऐषआराम भोगतां येऊं नयेत, सोयीचीं साधनें दिसूं नयेत, हीं अशिक्षित मनाचीं लक्षणें होत. सुख आणि शांतता हीं संपत्तीच्या भरभराटीवर अवलंबून नाहींत. ती मनाच्या भरभराटीवर अवलंबून आहेत. इतर शिकवणुकी शिकवितां येतील पण, मनाच्या समाधानाची अथवा शांततेची शिकवणूक शिकवितां यावयाची नाहीं. तिला जात्याच ओघ मिळाला पाहिजे. बांधली शिदोरी, आयतें पीठ, पोहऱ्यांतील

पाणी, हीं किती काळ टिकतील ! त्याची पूर्तता करून घेणें असेल तर स्वतःचीच तेथें मदत पाहिजे. हीच गोष्ट धनाची आहे. धनसुखोत्पात्ति करून घ्यावयाची आहे तर आधीं मन सुधारलें पाहिजे. असें झालें ह्मणजे सुखें आपोआप उत्पन्न होतात; शांतता चिरायु राहते, देहाचे व मनाचे व्यापार सुरळीत चालतात, झोंपडीपासून राजवाड्यापर्यंत आपलें वास्तव्य असावें अशी सुखाची मूळची इच्छा दिसते. पण असमाधानामुळें आपलें मन त्यास मज्जाव करतें. एक **समाधान हस्तगत केलें ह्मणजे सर्व जीवितसूत्रें हातांत आलीं असें खुशाल समजावें.** खरी संपत्ती समाधानांत आहे बाकीच्या संपत्तीचे देखावे मृगजळासारखे आहेत. पहा बरें, भूमाता गुणधर्मांनीं श्रीमंतही आहे आणि अनुपमेय शांतता धरून सौख्यानेंही रहात आहे.

**धन तारक आहे कीं मारक आहे** हा प्रश्न कधीं कधीं उपस्थित होतो, तेव्हां ह्याकडे वळावें हें बरें दिसतें. तारक मारक शब्द मुळीं समजुतीचे आहेत. त्यांत धनाविषयीं तर त्यांचे अर्थ बरेच विपरीत झालेले आहेत. मुळांत गोष्टी तारक आहेत. मारक त्याच्या वक्रतेचें अथवा विरोधी धर्माचें स्वरूप आहे. शस्त्रें स्वसंरक्षणार्थ आहेत ह्मणून तीं तारक आहेत. पण अन्योन्यसंबंधांत विरोधीभाव जेव्हां उत्पन्न होतात तेव्हां तींच मारक होऊन बसतात. तोच प्रकार धनाचा आहे. राहणी सरळ चालली आहे तों तेथें धन तारक ह्मणून समजलें जातें. जेथें राहणींत वक्रतेचा अथवा विरोधी भाव उत्पन्न होतो तेथें तें मारक ह्मणून गणलें जातें. सृष्टीच्या शुद्ध स्वरू-

पाप्रमाणें मानवी स्वभाव शुद्ध असता तर धनास तारक हें एकच विशेषण मिळालें असतें. पण त्यांत शुद्धाशुद्धतेची बरीच भेसळ असल्यामुळें तें तारक आणि मारक ह्या दोन्ही विशेषणांस पात्र झालें आहे. ज्यांची वागणूक शुद्ध आहे, जे सरळ स्वभावाचे आहेत, त्यांना धन हें तारक दिसणार. ज्यांना दुटप्पी वर्तन ठेवावयाचें आहे, ज्यांना चांगल्याचा आणि वाईटाचा विधि निषेध असा मुळींच नाहीं, त्यांना मंडळीहि त्यांच्या जोडीचीच मिळणार. मग अशा अन्योन्यसंबंधांत तें मारक दिसून यावयाचेंच. निर्णय देखाव्यावरून ठरत असतात; तेव्हां मारकतेचें जेथें ते दिसून आले असतील अथवा येत असतील तेथें तसे ठरतील हें साहजिक आहे. कृतीचे विकृतीचे, मंगलाचे अमंगलाचे कर्ते आपण आहों. आपण ठरवूं तीं पूर्व दिशा आहे.ह्या सर्वांवरून हें ध्यानांत येईल कीं, धन तारक किंवा मारक ठरविणें सर्वस्वी आपणांवर अवलंबून आहे. मारकतेचा कोळसा उगाळण्यांत अखेरपर्यंत मलीन स्वरूपच निघणार आहे. तेव्हां त्यापासून दूर असलेलें बरें. ज्या धनानें अनादिकालापासून जिवांस अन्नवस्त्र पुरविलें आहे, ज्या धनानें दैविक हेतु जी व्यवहारमांडणी ती साधिली आहे, ज्या धनानें पंचेंद्रियांकडून अघटित कृत्यें करविण्यास आरंभ केला आहे, ज्यानें आपल्या जादूनें विळा धारणकरणाऱ्यापासून मुकूट धारण करणाऱ्यापर्यंत जनांस झुलविले आहे, त्या धनाची योग्यता काय विचारावी ? त्याला मारक कोणीं ह्मणावें ? त्याला निंद्य विशेषणें कोणीं द्यावीं ? अज्ञानीजन धनास संहारक ह्मणून, तोडणारा ह्मणून, नांवें ठेवोत; पण सम-

जसास त्याचें शुद्ध स्वरूपच दिसेल. तो त्यास तारक, अतएव हितवादी ह्मणून मानील. आह्मास तर धनाचा तारक ह्मणूनगौरव करावासा वाटतो. सरळ मार्ग धरून सरळ दृष्टी फेकावी, सरळ अशीं सूक्त कृत्यें करावीं, हेंच आमचें कर्त्तव्य आहे. आह्मीं होतां होईतों धनाकडून मारक कृत्यें करवून घेऊं नयेत. घेतलीं तर तारकच करवून घ्यावींत. कसें झालें तरी आह्मी विचारी जीव आहों. विचारी जनांनीं विचारानेंच कृत्यें केलीं पाहिजेत.

**उपसंहारः**—धनसंपत्ति आणि मनःसंपत्ति हीं राष्ट्रास जोम आणून चिरायुत्व देतात. दिव्याची ज्योत आणि उष्णता हीं दूर भासतात, पण ज्योत थोर होतांच उष्णता नाहींशी होते. तोच प्रकार वरील संपत्तीद्वयाचा आहे. मनःसंपत्तीस धनसंपत्तीनें उत्र दिली पाहिजे; कारण त्यांत तिचा थोरपणा आहे. असें झालयावर मनःसंपत्ति धनसंपत्तीशींकृतज्ञ राहील. हें उघड आहे. ह्या दोहोंच्या संघशक्तिजलानें उद्यमवृक्ष फोंफावतो, इच्छित फळें लटकतात, अतिथि अभ्यागत व अनाश्रितास ती कृपाच्छाया होते. आणि शेवटीं पहावें तो संपत्ती पारंव्या भूम्यंतर्गत जाऊन त्या प्रच्छायी वृक्षास आधारस्तंभ होतात. अक्रोड वृक्ष लावणारास त्याचीं फळें खातां येतील काय? शक्य नाहीं; पण आपल्या मुलांनीं तीं फळें चाखावीं, अशी त्या लावणाराची इच्छा नसते काय? तेव्हां अक्रोड वृक्षाची लावणी करणें, हें जीवितत्व मानावयाचें व त्याची भावी प्रजेस प्राप्ती ही सदाशा बाळगावयाची दुसरें काय?

---

# दारिद्य.

दारिद्र्य भोस्त्वं परमं विवेकि
गुणाधिके पुंसि सदानुरक्तम् ।
विद्याविहीने गुणवर्जितेच
मुहूर्तमात्रं न रतिं करोषि ॥

विधातुर्द्वे कन्ये सुगतिरपरा दुर्गतिरभूत्
तयोराद्यां धाता गुणकुलविहीनाय स ददौ ।
ततः पश्चात्तापादिव सुगुणसञ्जातमधुना
कुलीनं विद्वांसं वरमिह वरेण्यं मृगयते ॥

सुभाषितरत्नभाण्डागारम्

# दारिद्य.

'गृहस्था आह्मा कुटुंबवंता, । दरिद्रातुल्य दुसरी व्यथा । ये संसारीं असेना ॥ ३५ ॥ दरिद्रें जितचि प्रेत जाण । दरिद्रें योग्यता तृणसमान, । दरिद्रें विद्यासमुद्र द्रोण । द्रुपदें छळूनि दवडिला ॥ ३६ ॥ दरिद्रें उदास पुत्रदारा । दरिद्रें सुहृद पाठीमोरा, । दरिद्रें नैषधयुधिष्ठिरां । रानोरान भवंडिलें ॥ ३७ ॥'

मुक्तेश्वर–आदिपर्व.

संसारसुख रवी ज्या राहूनें ग्रासला जातो, जिज्ञासूचे मनोरथ ज्या शस्त्रानें भंगले जातात, व्यसन वस्त्राचा धागा ज्या चातींतून निघतो, आप्त बांधवांचे पाशतंतू ज्या कातरीनें तटातट तुटतात, ती कातर, ती चाती, तें शास्त्र व तो राहू ह्मणजे दारिद्र्य होय.

प्रापंचिक सुखें विलयास जात असावीं, मानापमानाच्या डागण्यांनीं मनावर चटक्यावर चटके बसत असावे, प्रीतीचा शब्द व मायेचें माणूस हीं दूर होत असावींत, ह्या कमनशिबाच्या गोष्टी होत. हें खरोखर खडतर प्राक्तन होय. तथापि, अंधेर प्रकाश प्रसवतो. संकटें

तत्त्वजनक असतात. दुःखें उपाय सांगतात. ह्या गोष्टी अथवा ही सृष्टीची मांडणी आहे, ह्मणून जीवांस किती आधार आहे बरें ? जीवांस एकच स्थिति लागून आली असती तर हें सृष्टिस्वरूप असें विविध रंगानीं रंगलेलें दिसलें नसतें. एकाचें दारिद्र्य पर्यायानें दुसऱ्याच्या श्रीमंतीस कारणीभूत होत असतें. एकाची श्रीमंती दुसऱ्यांना भिकेस लावित असते. दारिद्र्यानें पोळलेला एक विचारी होऊन पुनः द्रव्यार्जनास आरंभ करतो. एक लक्ष्मीपुत्र व्यसनाच्या जाळ्यांत गुरफटून जातो, अविचाराचा दास होतो, तों त्याच्या जवळ असणाऱ्या कार्यसाधूंची चलती होते. एवंच ' लक्ष्मीः स्थिरा न भवतीति किमत्र चित्रम् ' असा आश्चर्याचा देखावा पुढें उभा राहतो. अशी ही सृष्टीची मांडणी आहे.

असें लक्ष्मीचें चांचल्य आहे. जाणते असतात ते दारिद्र्याच्या वरवंट्याखालीं विचाराची चिप ठेवून आपला हेतु साधून घेतात. जेथें विचाराचें पाठबळ व धैर्याचें अवलंबन नसते तेथें सर्वच विपरीत प्रकार घडून येतो; आहे हें जातें, निराशेनें पुरें घर घेतलें असल्यामुळें कर्तव्याची गति कुंठित होते. आधीं धैर्य सोडणें वाईट. त्यांत हीनावस्थेंत तें सोडणें तर फारच वाईट. जनराहटीकडे पहावें तो अनास्था, डोळेझांक, स्वार्थ, निर्दयता ह्यांचें प्राधान्य मुख्यत्वें दिसून येतें. दीनाची करुणा भाकणारे, बुडत्यास हात देणारे पुण्यात्मे फार विरळा. व्यक्तीची विचारपूस वावटळासारखी आहे. निसर्ग विरक्त आहे. एथें ज्याचा त्यानेंच विचाराचा दम घेतला पाहिजे. श्रमल्यावर शांतता धरली पाहिजे. आयुष्यांत

कसरतीचे दिवस कमी असतात. दारिद्र्य ही जंगी कसरत आहे. असें समजून हा व्यवहारतरंग तरून गेलें पाहिजे.

मानवाच्या **दारिद्र्य मूळपीठिकेकडे** पहावयास नको आहे. तो मूळचाच दिगंबर वृत्तीचा आहे. सृष्टिनियंत्यानें इतर प्राण्यांबरोबर ह्या प्राण्यास भोगांची तरतूद करून ठेविली आहे. पण अन्योन्यसंबंध होऊन व्यवहार साधावा अशा दैविक संकेतानें ह्मणा कीं बुद्धिसामर्थ्यानें ह्मणा कीं रुचिवैचित्र्यानें ह्मणा,-त्याला नैसर्गिक मांडणीचें बरेंच रूपांतर करावें लागतें. आयता शब्द गतिकुंठित आहे आणि मानव हा गतीकरितां असल्यामुळें त्यास तो लावितां येत नाहीं. तेव्हां जीवनार्थ इतर प्राण्यांपेक्षां ह्यास अधिक खपावें लागतें. शिवाय केवळ जगणें हा त्याचा हेतु नाहीं. जगविणें हा एक तो जीवितहेतु मानीत असतो. तेव्हां ह्या हेत्वर्थ त्याला सायासी व्हावें लागतें. खेरीज रुचिवैचित्र्यानें गरजा वाढत असतात. अनुकरण इच्छाज्योत प्रदीप्त करित असतें. इतक्या भारांनीं मानव लादलेला आहे. आहे हें सर्व ठीक आहे. पण ह्यांच्या प्राप्त्यर्थ मानव करावयाचें तितके प्रयत्न करित नाहीं ह्मणून दारिद्र्याचे पेंचांत सांपडतो. ही दारिद्र्याची पहिली आवृत्ती आहे. दुसरी दुसऱ्याच्या चुकीमुळें ह्यावर येते. तिसरी स्वतःच्या व्यसनानें, चुकीमुळें अथवा अज्ञानामुळें ह्यास भोंवते. दारिद्र्य हें वाईटच. मग स्वतःच्या अज्ञानामुळें तें येवो कीं दुसऱ्याच्या कृतीनें ओढवो, ते भेदाभेद निराळे आहेत. पण आलें ह्मणजे संकटार्थी येतें हें निर्विवाद आहे. वस्त्र कां-

ट्यावर घातलें काय नी पडलें काय दोन्ही गोष्टी एकच आहेत. त्या स्थितींत तें फाटणारच. फक्त जपून तें काढणें हा एकच येथें उपाय आहे. असो; आतां कुटुंब आणि दारिद्र्य ह्या सदराकडे वळूं.

**कुटुंब आणि दारिद्र्य**:--कुटुंब ह्मणजे समाजाचा आद्य घटक आहे.तेथें शांतता व सौख्य हीं जर नांदतील तर तीं समाजांत नांदणार आहेत. तेलावीण जसा दीप शून्य आहे तसें धनावीण कुटुंब शून्य आहे. दीपांतील तेल संपतांच त्यांतील वातीस जशा मुंग्या लागतात तशा धनहीन कुटुंबास व्यसनाच्या मुंग्या तेव्हांच लागतात. दीपांतील वात मुंग्या कोणत्या स्थळीं नेतील हें जसें समजून यावयाचें नाहीं तसें ह्या गृहांतील व्यसनरूपीं मुंग्या कोणत्या अपात्र अशा निंद्य स्थळीं तत्स्थांना नेतील हें समजून यावयाचें नाहीं. कुटुंबांत विचारी माणसें थोडीं असतात. इतरांची मदार कर्त्या स्त्रीपुरुषांवर असते. ते जसे ठेवतील तसे ही बाकीची मंडळी राहतात. त्यांचें जसें वागणुकीचें धोरण असते तशावर ह्यांच्या धोरणाचें बीजारोपण होत असतें. तेव्हां ह्या कर्त्यांनीं शारीरिक व मानसिक श्रम घेऊन त्यांच्या संगोपनार्थ झटलें पाहिजे व त्यांचीं धोरणें सन्मार्गीं वळविलीं पाहिजेत. बा सुवर्णा, तूं झीज सोसून दुसऱ्याचे उपयोगीं पडावेंस हेंच तुला योग्य आहे. तुझा मान ठेवून तुला कंठीं धारण करतात हें वेतन कमी आहे काय ?' प्रपंचतरु अक्रोड वृक्षासारखा आहे. तो लावून जतन करणारास त्याचीं फळें चाखावयास मिळणें शक्य नाहीं. पण तीं आपल्या प्रिय माणसांनीं चाखावीं अशी लावणाराची इच्छा

नसते काय ? हेंच रूपक आह्मीं प्रपंचवाइकांनीं ध्यानांत ठेवावयास पाहिजे आहे. रोपास आपल्या भूषणास्तव व जनहितास्तव वाढूं द्यावें. त्यांत स्वार्थ नसावा. असाच लावणाराचा उच्च हेतु पाहिजे. उच्च हेतु उच्च कार्यें प्रसवतात, उदात्तता उदात्ततेचें बीजारोपण करिते, हे निर्विवाद सिद्धांत आहेत. ह्याचा ऊहापोह मागेंच होऊन गेला आहे. तूर्त प्रसंगीं ह्या सिद्धांतानुसार आपण वागावयाचें आहे. जीवितांत 'सर्वस्व वेंचलें परि एक भलेपण जगांत वांचविलें' असें वागलें पाहिजे. वंशांत जन्मास आल्याचें सार्थक्य हेंच आहे कीं, धनानें व मनानें कुटुंबाचें बरें तें केलें पाहिजे. पूर्वीं अबळेंत सांपडलेलीं मुली व मुलें आतां सबळ केल्यास नांवालौकिकास कशावरून नाहीं चढतील ? समाजाचें भूषण व राष्ट्राचे मणी कशावरून नाहीं होतील ? त्याग, झीज हीं सर्वांनाच लागून आलेलीं आहेत; तेव्हां तीं वेळीं पतकरून आश्रितांचें कल्याण केलेलें बरें नव्हे का ?

**विद्वान आणि दारिद्र्य**—लक्ष्मीचें आणि सरस्वतीचें मुळीं जन्मापासून वांकडें दिसतें. थोरांचें जसें सर्वच

---

१ मोरोपंत—आदिपर्व.

२ लक्ष्मीचें सरस्वतीबरोबर वैर आहे ह्या संबंधीं एक मजेदार श्लोक आह्मास 'सुभाषित रत्नभाण्डागारांत दिसून आला. तो वाचनीय वाटेल ह्मणून देत आहों. "पीतोऽगस्त्येन तातश्चरणतलहतो वल्लभोऽन्येन रोषादाबाल्याद्विप्रवर्यैः स्ववदनविवरे धारिता वैरिणी मे । गेहं मे छेदयन्ति प्रतिदिवस मुमाकांतपूजानिमित्तं तस्मात्खिन्नासदाहं द्विजकुलसदनं नाथ नित्यं त्यजामि" ॥

थोर असते तसें थोरांचा दावाही थोर असतो. विद्वत्ते-च्या ठायीं दारिद्र्यानें वास करावा हें सकृत्दर्शनीं चमत्कारिक भासतें, पण असें भासूं देण्याचें कांहीं कारण नाहीं. असें पहा, ज्या जीवितमंदिरांत मनःसंपत्तीस श्रेष्ठ स्थान मिळालें आहे, जेथील कारभार निरपेक्षतेनें आपल्या ताब्यांत घेतला आहे, जेथें ' जग हेंच आपलें कुटुंब ' ह्या तत्त्वानें वागणूक चालली आहे, शांततेखेरीज जेथें दुसरा प्रकाश नाहीं, तेथें ह्या धनसंपत्तीचा कितीसा मान राहील अथवा लक्ष्मीस यावयास काय सुख वाटेल हें दिसतच आहे. विद्वान सदा ब्रह्मानंदीं निमग्न राहवयाचा, पण काय करील बिचारा! धर्माज्ञेनें बांधला गेला आहे म्हणून व्यवहारांत पडतो. अशा आनंदीं रमलेल्या पुरुषांस धन असलें काय नसलें काय, सारखेंच आहे. व्यवहार केल्याखेरीज परमार्थ साधत नाहीं ही खूण त्याचें मनांत बाणलेली असते, व आपण ह्या कर्तव्यास विसंबलों तर अज्ञानजन कर्ममार्गीं वळले जाणार नाहींत हें त्यांस कळून आलेलें असतें; ह्मणून ह्या कर्माच्या उठाठेवींत त्यास पडावें लागतें. बाकी आपण लक्षाधीश व्हावें, संपत्तीचा धूर निघावा, दुसऱ्याचें कांहीं होवो आपलें साधलें ह्मणजे झालें, असें सामान्य जनाचे विचार त्याच्या स्वप्नींहि येत नाहींत. उघडच आहे कीं, ज्याची उपास्य देवता मुळीं सरस्वती तो सामान्य जनांच्या लक्ष्मीदेवतेस भजेल काय ह्मणून? बाई निर्धनते, तूं माझ्या बंधु विद्वानाचा किती जरी छळ केलास तरी तो तुला हार जाईल अशी कालत्रयीं गोष्ट घडणार नाहीं. हें मनांत देखील आणूं नकोस. तूं

डांव साधावयास जातेस पण उलट तोच साधून घेतो. त्याचें हवें तें अनिष्ट इच्छित रहा. तो त्यांतून इष्ट तेव्हांच काढून घेतो. तूं त्यास जितक्या संकटांत पाडशी-

१ निर्धनतेचा द्वेष मानवास कर्तव्यीं प्रवर्तक करतो, व बुद्धीस तीव्रता देऊन जीवित मार्ग सुधारावयास लावतो अशा व्यापक अर्थाचा खालील उतारा आहे.

Want is a bitter and a hateful good
Because its virtues are not understood
Yet many things impossible to thought
Have been by need to full perfection brought;
The daring of the soul proceeds from thence,
Sharpness of wit, and active diligence.
Prudence at once and fortitude it gives,
And if in patience taken, mends our lives:
Fore'en that indigence that brings me low,
Makes me myself, and God above to know.
A good which none would challange, few would choose,
A fair profession which mankind refuse.
If we from welth to poverty descend,
Want gives to know the flatterer from the friend.

Dryden.

ल तितक्यांतून तो निसटून सुधारणेचा मार्ग शोधून काढिल्याविना कधींही राहणार नाहीं. तुझ्या प्रवेशानें अविद्वान हताश होईल, डोळ्यांतून टिपें गाळील, कांहीं सुचत नाहीं ह्मणून गांगरून जाऊन स्वस्थ बसेल. पण विद्वान पुरी सहनशीलता धरून तसा निराश कधींहि होणार नाहीं. शांतपणें सर्व गोष्टी पार पाडील व शेवटीं सौजन्यानें 'शाबास! निर्धनते शाबास! विरोध भक्तीनें कां होईना पण मजवर प्रसाद केलास खरा! तूंच मला कृतीबाहुल्यांत प्रवर्तक केलेंस, मला निर्द्रव्य पुरुषाला सद्रव्य केलेंस,' असें ह्मणून उपकार मानील. विद्वानाशीं लढावयाचेंच असलें तर त्यास तारुण्यानें सबळ

---

आपले पूर्वज किती सत्यप्रिय होते हें जगमहशूर आहेच. त्यांपैकीं एका बाणेदार वीराचें प्रत्यक्ष वचन वाचकांपुढें मांडावेंसें वाटतें, ह्मणून तें देत आहों.

भीष्म विचित्रवीर्यास ह्मणतातः—

उष्णता सांडील वैश्वानर, । प्रभा त्यागील पद्मिनीवर, ।
हिमांशु दवडील हिमकर, । परी मी सत्य सोडीना ॥ १ ॥
शब्दविषय सांडील गगन, । रुप तेज स्पर्श पवन, ।
रस विषय सांडील जीवन । सत्य माझें चळेना ॥ २ ॥
पृथ्वी सोडील अंगींचा गंधू । परि मी नातळें असत्य शब्दू, ।
अनाचारीं संचरे साधू । हें कैसेनी घडेल ? ॥ ३ ॥

मुक्ते. आदि. अ. २४.

( २ ) सत्याची महती अवर्णनीय आहे. खालील वचनावरून त्याचें स्वरूप ध्यानांत येईल. मुक्तेश्वर आदिपर्वांत ह्मणतातः—सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म । सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्वकाळ तिष्ठत ॥ २११ ॥

असतां गांठ. वृद्धावस्था ही जीवाची निःशस्त्रस्थिति आहे. अशावर हत्यार झाडणें हें धर्मन्यायोचित नाहीं, एवढेंच तुला सुचवावयाचें आहे. असो, आतां **दारिद्र्य आणि सद्गुण** ह्यांकडे वळूं. दारिद्र्यांत सद्गुणास फार जपावें लागतें. नीतिच्युत होण्याची व सत्यापासून चळण्याची भीति ह्याच समयीं असते. दारिद्र्य जीवितास कसास लावूं इच्छितें. ह्यांतून जो अळंकार तावून सुलाखून निघाला तो कायमचा निघाला असें समजावें. परीक्षेचे दिवस नेहमींच असतात असें थोडेंच आहे. अशावेळीं नीतीस फार संभाळावें लागतें. सत्यास उराशीं बाळगावें लागतें. दारिद्र्य यावयाचें तें येईल, प्रयत्नानें व नशिबाच्या लाटेनें जावयाचे तेव्हां जाईल, पण बोललेला असत्य शब्द व कुमार्गांत पडलेलें पाऊल मात्र परत यावयाचें नाहीं. धर्म सोडला. नांवास काळिमा लागली. देह नीतिभ्रष्ट झाला. मग जिवितांत काय राहिलें ? नुसतें जगलेलें कसें व भूषणानें जगलेलें कसें ? दारिद्र्यांतून डोकें वर काढावें ह्मणून हाडाचीं काडें व रक्ताचें पाणी करीन, पण सत्यास सोडणार नाहीं, असा करारी स्वभाव आह्मी बाणू दिला तरच आमचें खरें जीवित आहे, तरच आह्मास सत्याची चाड आहे, असें मानतां येईल. नुसत्या उकीरड्यावर उघड्या वाघड्या पडलेल्या चिंध्या कशा आणि आंच सहन करून सत्वास राहिलेल्या व कागदांत मंगल स्वरूप पावलेल्या चिंध्या कशा ? ही सत्वास सोडून व धरून राहिलेल्याचीं उदाहरणें आपणासमोर कशीं ढळढळीत आहेत नाहीं बरें ? ह्या दारिद्र्यानें अजातशत्रु धर्मराजासहि छळिलें ! नळ राजा-

सारख्या पुण्यश्लोकास वनोवनीं हिंडविलें व चारुदत्तासारख्याची पुरी पुरी विडंबना केली! ह्मणून ह्या पुण्यात्म्यांनीं सत्वास सोडलें काय? किंवा सत्यास सांडिलें काय? त्यांचें दारिद्य लयास गेलें, पुनः वैभवशाली झाले, पण पहिली जी शुद्धवृत्ति होती तीच त्यांनीं कायम ठेविली होतीना? अशा श्रेष्ठ पुरुषांचीं चरित्रें मननीय असतात. तीं सदैव स्मृतींत ठेवणें हें आमचें प्रधान कर्तव्य आहे.

उपसंहार—दारिद्याच्या इतिहासाकडे पाहूं जातां शहाण्यांनीं त्याच्या झटक्यांतून अनेक कार्यें पार पाडून नेलीं आहेत असेंच आढळून येतें. शहाण्याची री ओढिली ह्मणजे व्यवहारदक्षता बाणते असें जनराहटींतून तत्व निघालें आहे. तेव्हां ह्याचे अनुयायी होऊन त्यांच्या वळणावरहुकूम जीवितानें मार्ग क्रमावा हेंच श्रेयस्कर दिसतें. ज्याची छाती निश्चयाचें बळकट सिंहासन होऊन बसली आहे, उद्यमशीलता हा ज्याचा मनोधर्म ठरून गेला आहे, त्याच्यापुढें दारिद्यच काय पण त्याहीपेक्षां मोठें संकट ओढवलें तरी तें तुच्छ होय.

# काळ.

तो काळ लोक ज्याला वश जैसे घन समस्त वाताला । देतां योग वियोग श्रमलव ज्याच्या नसेचि हाताला ॥ लीलेनेचि सुदुर्घट घडवी तो प्रभु न होय काळ कसा । विघर्डा घडींत घडले अव-घडही निरभिमान बाळकसा ॥ जेथें नृपधर्म गदा-धर भीम, महास्त्र शस्त्र पटु जिष्णु । गांडीव चाप अद्भुत, शक्ति सखा कृष्ण हा स्वयें विष्णु ॥ ऐसे अंत्यताद्भुत पुण्यशरीरास्त्र शस्त्र दैव बळें । तेथेंहि विपत्ति असी दावी ! हा काळ सर्वथा प्र-बळ ॥ या प्रभुच्या चित्तींचें करणें कोणी कधीं-हि जाणेना । जाणों जातां कविहि श्रमले निश्चय तयांसि बाणेना ॥

मोरोपंत.

काल ह्मणजे त्या चिच्छक्तीचें तेज, काल ह्मणजे त्या निसर्गदेवतेचें वस्त्र, काल म्हणजे अखिल जीवांच्या इतिहासाचा मुख्य घटक असा हा कालपट अमर्याद वि-स्तृत आहे. त्यास स्थिति आहे. पण स्थितिस्थापकत्व देतां येत नाहीं. काळानें आजपर्यंत किती असंख्य प्रा-

ण्यांस स्वर्ग दाखविला असेल, किती असंख्य प्राण्यांस इहलोकीं निर्माण केलें असेल, वर्तमानकाळीं निर्माण करीत आहे, भविष्यकाळीं निर्माण करीत राहील ह्याची गणना कोण करील ? किती राष्ट्रें अस्तित्वांत होतीं, सध्यां आहेत, व ह्यांच्या लयानंतर पुढेंही होणार आहेत. हा विचार मनांत आणिला ह्मणजे मन कसें सुखदुःखमिश्र लाटांनीं भरून जातें, जीव थक्क होतो व अंतीं सर्व आश्चर्योत्पादक आहे असें वाटतें. अनंतकोटी जीवांचें ज्या काळानें कोटिकल्याण केलें असेल, अनंतकोटि जीवांना दुःखसागरांत लोटून दिलें असेल व पुढेंहि आपल्या घटजलयंत्राच्या नियमानें चालणार, त्या कालास कोणतें विशेषण द्यावें ह्या विचारांत विचारी मनुष्य चूर होऊन जातो. काल सत्पुरुषहि नव्हे, काल असत्पुरुषहि नव्हे; तर काल समदर्शी आहे. आपलें नुकसान झालें म्हणून त्यास असत्पुरुष असें गणावें, छीं नव्हे. आह्मास तर तो समदृष्टी भासतो. काळ हा अखील जीवांच्या सृष्टिरंगभूमीवरील पडदा आहे. तो पडदा कसा उघडला जातो, कसा खालीं पडतो, तो उघडला गेला असतां त्यांत जीवनटाच्या सृष्टिरंगभूमीवर कशा भूमिका वठतात, कशा वठल्या आहेत, व वठावयास पाहिजे आहेत ह्यासंबंधीं थोडा विचार करूं.

कालाची स्वतःस ओळख केव्हां होते हें पाहूं. कारण, ओळख करून घेतल्याखेरीज त्या समदर्शीशीं कसें बोलावें.

गेलें वर्ष बरें होतें. मागील अठवडा वाईट होता. कालची रात्र खडतर गेली. ह्या तिन्ही वाक्यांतील बरें, वाईट,

खडतर, ह्यांत एक एक प्रकारचा अर्थ ध्वनित होतो; हें तेव्हांच कळून येण्यासारखें आहे. क्रियेला कारण असतें. हें आपण पहात असतों. कांहीं विशेष क्रियेवांचून विशेषण लावतां येत नाहीं; हेंहि आपण जाणतों. मग बरें, वाईट, खडतर, ह्या गोष्टी ज्या घडून आल्या त्यांस पूर्वकालीं तशींच कारणें होतीं; तेव्हां अशीं विशेषणें प्राप्त झालीं असलीं पाहिजेत. हें ठरवावयास आतां काय हरकत आहे. हें असें ठरवितांच असा बोध होतो कीं, वर्षांत त्या व्यक्तीची जी पाहणी झाली, त्या पाहणींत त्यास स्वतःसंबंधीं घडलेल्या गोष्टींत बरें असें दिसलें, किंवा एकंदरींत वर्षाचा ताळा काढूं जातां सर्वेषां जनस्थिति बरी दिसून आली. ज्या व्यक्तीच्या तोंडून वाईट हे शब्द निघाले त्या व्यक्तीस त्या आठवड्यांतील काल दुःखाचा झाला. खडतर रात्र हे शब्द ज्या व्यक्तीनें उच्चारले असतील त्यास त्या रात्रींत घडून आलेल्या गोष्टीनें पुरी जन्माची आठवण दिली असेल. तेव्हां या सर्वांवरून असें ठरवितां येईल कीं, काल ह्मणजे स्थितीची स्मृती. मग ती स्मृति बऱ्याकरितां असो किंवा वाइटाकरितां असो, हा प्रश्न वेगळा आहे. पण ह्या बऱ्यावाइटाची स्मृति झाली तेव्हां त्या कालाची ओळख झाली. आतां काळासंबंधीं बोलावयास कांहीं हरकत नाहीं.

स्मृतीखेरीज काल असूं शकेल कीं काय ? आणि असलाच तर त्याची जीवितांत गणना कशी करतां येईल ? आणि स्मृतीसह असलेल्या काळाची महती कशी असते ? ह्याकडे वळूं. काळ हा अनंत, अमर्याद,

असा पट आहे; त्यावर स्मृति हा कशिदा आहे. आणि त्यांतून इतिहासाचीं चित्रें निर्माण होत असतात. आतां तो कशिदा नसेल तर इतिहासाचीं चित्रें निर्माण होणार नाहींत ही गोष्ट निराळी आहे. पण ह्या दोन्हींच्या अभावीं त्या कालपटाचें अस्तित्व नव्हतें असें नाहीं. दृष्टी अर्थवेधित असल्यामुळें तिचें धोरण त्याच्या शोधार्थ असतें. एरंडाकडे आणि इक्षुदंडाकडे दृष्टि सारखेंच पाहील काय? दुसऱ्याच्याविषयीं तिचें जितकें प्रेम असतें तितकेंच पहिल्याविषयीं असतें असें ह्मणतां येईल काय? तीच गोष्ट काळाविषयीं आहे. काळ सृष्टीच्या उत्पत्तीपासून आहे. कबूल; पण काळ स्मृति कशिद्यांत बसला नाहीं तर तो इतिहासांत नमूद नाहीं. नमुद आहे; तो ईश्वराच्या घरीं आहे. अर्थाकारितां हपापलेल्या मृत्यु लोकांत तो नाहीं. तो नमूद होत नसल्यामुळें दृष्टीस निरर्थक वाटतो. नमूद शब्दाची किंमत फार जबर आहे. एका पृथ्वीचें मोल तें त्याचें मोल आहे, असें ह्मणणें कदाचित् कोणास अतिशयोक्तीचें वाटेल; पण त्यास आमचा नाइलाज आहे. कारण भूतकाळची एक एक विभूति, एक एक सद्गुणाची खाण, एक एक नीतिमालेंतील पुष्प पुढें येऊं लागलें ह्मणजे आनंदाश्रूंनीं डोळे कसे भरून जातात. कंठ सद्गदित होतो! काय बोलावें हें सुचत नाहीं! ह्यांना कोणती उपमा देऊं? ह्यांना हृदयमंदिरांत कोठें स्थळ देऊं असें होतें! मग वाचकहो, असें वाटल्यावर त्याच्या मोलास आह्मीं पृथ्वी घातली तर त्याबद्दल दूषण द्याल काय? आधीं मनुष्याची किंमत करतां येत नाहीं. त्यांत

लाखांतून वर डोकें काढिलें असलेल्या, नमूद पटांत अथवा कीर्तिपटांत सुशोभित झालेल्या पुण्यात्म्याच्या मोलासंबंधीं एक शब्द देखील काढितां येत नाहीं. तो अमोलिक होय ह्यापेक्षां अधिक ह्मणतां येत नाहीं. असो. स्मृतीच्या काळाची इतकी ही महती आहे. स्मृति ही नमूदाची माता आहे तेव्हां त्या स्मृतीस्तव सर्वांनीं झटलें पाहिजे. काळाची स्मृति ठेवावी, काळाची स्मृति ठेवावयास लावावी अशी जर कृति घडून येईल तर काळांत जन्मल्याचें भूषण आहे. स्मृतिव्यतिरिक्त काळाची गणना कवडीमोल आहे. सर्व असावयास पाहिजे आहे, सर्व करावयास पाहिजे आहे तें स्मृतीकरितां करावयाचें आहे.

**काळ विनाशी नाहीं:**—नाशाप्रत कांहींच पावत नाहीं असें शास्त्र सांगतें. वस्तूचा विनाश जो दिसतो तो विनाश नव्हे. तें रूपांतर आहे. निर्माण केलेल्या वस्तू लयास जाव्या असा ईश्वरी संकेत दिसत नाहीं. लयाकरितां वस्तु उत्पन्न केल्या असतील असें मानणें ह्मणजे त्या नियंत्याच्या हेतूंत, नियमांत व्यंग आहे असें स्थापणें होय. व्यंग चूक हीं मानवांत आहेत. ईश्वरांत नाहींत. तो पूर्ण आहे. त्यानें जें जें उत्पन्न केलें आहे तें तें सहेतुक आहे. त्याच्या कृतींत उच्च हेतु आहे. त्यानें निर्माण केलेल्या वस्तूंत उपयुक्ततेपेक्षां उदात्तता अधिक भरलेली दिसते. ती सहेतुकता, ते उच्च हेतु, तीं उदात्त तत्त्वें आह्मी जाणवून घेत नाहीं ह्मणून त्याच्या कृतीबद्दल कधीं कधीं गैर समज होतो. तीच गोष्ट काळाविषयीं आहे. काळ वस्तूंचा संहारक नसून तो त्यां-

ना पूर्णत्वाप्रत नेणारा आहे. आणि प्रथम दर्शनीं तो विनाशी भासत असला तरी त्यांचा तो विनाश करीत नसून त्या वस्तूंची अधिक उपयुक्तता आहे असें आपल्या लीलेनें दाखवीत असतो. ती उपयुक्तता तो दाखवीत असतां, अथवा कैक प्रसंगीं त्या वस्तूंचें रूपांतर करीत असतां आपण त्यास किंनी दोष देतों बरें? तसें करण्यांत त्याचा हेतु काय असावा हें मानव जाणून घेत नाहीं ही केवढी चूक आहे? आम्रवृक्षाचा मोहर काळानें नाहींसा केला नाहीं तर आम्रफळ लटकेल काय! तीं तशीं लटकावीं? पक्क होऊन जनांनीं चाखावीं, जीव संतुष्ट व्हावेत, असा जेथें काळाचा उद्देश असतो तेथें मोहोर नाहींसा केल्याबद्दल त्यास दोषी कसें ठरवितां येईल? मोहराचा गंध देऊन नाकास आनंदी करावयाचें होतें तें त्यानें प्रथम केलें. आतां आम्रफळानें जिव्हेस तृप्त करावयाचें दुसरें कर्तव्य त्यानें करूं नये काय? तें कर्तव्यतो हेतु जर काळास साध्य करून घ्यावयाचा आहे, तर मोहराचें रूपांतर कां करणार नाहीं? येथें हें एक ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, हें रूपांतर ज्यसा इतर लोक विनाश असें समजतात, तो जीवांच्या सुखार्थ होता. कालगतीनें वेल वाढला पाहिजे, फुलें आलीं पाहिजेत, दृष्टीनें तें सौंदर्य लुटिलें पाहिजे व पुढें स्वतःस कृश करून घेऊन फळास स्थळ दिलें पाहिजे. पहा काळाचे नियम कसे मजेदार आहेत. सौंदर्य, फूल, विनाशास पावतें तो फळाची तरतूद करून ठेवलेली दिसते. ह्या नियमांची बजावणी करीत असतां काळ दिनावधी घेईल, पण ती घेत असतां त्यांत देखील जीवाचें

हित आहे. कोणी असें ह्मणूं लागला कीं, उष्ण काळ संपतांच पावसाळा कां लागूं नये? हे मध्यंतरीं धूळ उडविणारे वारे कशास हवेत? झाडांच्या फांद्या मात्र ह्यामुळें मोडतात. असें ह्मणणाऱ्याची दृष्टि वर वर असते हें उघड आहे. पण ह्या तीव्र गतीनें वृक्षांवरील झुडुपावरील बीं मोकळ्या मैदानांत पसरलें जावें व तेथें हंगामांत जनावरास चारा व्हावा व तीं पोसलीं जावींत हा जो काळाचा उद्देश होता तो ह्या वरवर पाहणारानें जाणला होता काय? फक्त फांद्यांचा लय मात्र त्यास दिसला. आणि काळाचें स्वरूप, काळाचा दूरदर्शीपणा त्यास दिसला नाहीं. व्हावयाचें तें सर्व हेत्वनुसार वेळेनुसार होतें. क्षणापासून तें वर्षापर्यंत काळ कसा नियमानें बद्ध झाला आहे. त्यास दिवस आहे, रात्र आहे, ऋतु आहेत, अयनें आहेत. इतक्या नियमांनीं जखडून टाकलेलें तेज त्या जगन्नियंत्यानें विनाशास्तव निर्माण केलें असेल अशी कल्पना देखील करणें बरोबर नाहीं. मरण, रूपांतर हीं पुनर्जन्माचीं द्वारें आहेत. सज्ञान दृष्टि हें जाणते. अज्ञान दृष्टीस हा भास आहे असें वाटतें. पहिलीस काळ हा उद्धारक आहे असें वाटतें. दुसरीस तो संहारक दिसतो.

**काळाची शिकवणी**—स्वराच्या साहाय्यावांचून व्यंजनाचा पूर्ण उच्चार होत नाहीं. व्यंजनाखेरीज स्वरास गति नाहीं. हे जसे व्याकरणाचे नियम आहेत, तसे काळावांचून सृष्टीस तेजस्विता नाहीं. सृष्टीवांचून काळ पंगू आहे. हे निसर्गाचे नियम आहेत. पहिल्या दोघांच्या मिलाफानें जसें वाङ्मय अबाधित चाललें आहे; तसें दु-

सऱ्या दोघांच्या संघशक्तीनें सृष्टिधर्म सुयंत्रित चालले आहेत. तेव्हां काळाविषयीं विचार केला ह्मणजे त्यांत निसर्ग येईल हें उघड आहे. काळाच्या अगदीं प्रथम शिकवणीकडे वळूं व त्यांत काय शिकतां येण्यासारखें आहे हें पाहूं.

अरुणोदय झाला आहे. तांबूस वर्णाची छटा पूर्वकक्षेवर चढली आहे. श्रमपरिहारक वायु आपल्या मंद मंद गतीनें मनास उल्लसित करीत आहे. मनप्रसन्नेस भरतें येत चाललें आहे. मानव रामनामाच्या ठिकाणीं रममाण झाला आहे. दुष्टविकारांस थारा नाहीं. सुविचाराचें साम्राज्य चाललें आहे. पहा बरें. एक प्रभात समय तो काय आणि शरीरावर, मनावर व अंतीं विचारावर हितकर परिणाम घडवून आणतो तो काय? हा लाभ एका दिवसाचा नाहीं. सृष्टि उत्पत्तीपासून अनादिकालापासून अव्याहत चालला आहे. ह्या अल्पकाळाचीं चित्रें कादंबरीकारांनीं किती रेखाटलीं असतील, ह्यांतून तत्ववेत्त्यांनीं कितीं तत्वें काढिलीं असतील, हें एक जिज्ञासु वाचकच जाणूं जाणे. अद्यापिहि ही मंडळी तीं काढीत आहेत आणि तत्वांच्या शोधार्थ आहेत. काळ पाहिला तर एकना दोन घटकेचा, पण प्रसन्न चित्त करून कर्तव्यास सानंदी मुद्रेनें लागा हा केवढा अमोलिक धडा शिकवीत आहे! असो, असे

१ आतां 'सुभाषित रत्न भाण्डागारांतील' एका मजेदार छटेकडे पहा. "विरल विरली भूतस्तारा: कलौ सुजना इव व्यपमगतिच ध्वान्तं चित्तान्सतामिव दुर्जना: । मन इव मुने: सर्व चापि प्रसन्नमभून्नभो विगलति निशा क्षिप्रं लक्ष्मीरनुद्यमिनामिव" ॥

स्वभावजन्य धडे काळांत प्रभातपासून दुसरी प्रभात येईतोंपर्यंत हवे तितके आहेत. रसिक आणि जिज्ञासु दृष्टि प्रत्येक अवलोकनावरून धडा काढिते. ती विशिष्ट स्थळाची अथवा विशिष्ट काळाची वाट पहात नाहीं. आतां थोडी उंचावरून पाहणी करूं.

वैचित्र्य मग तें विचारांत असो वा कृतींत असो, तें जसें मनुष्यांत आहे तसें काळांतहि आहे. अर्थात त्याची कृति अथवा गति त्या वैचित्र्यानुरूप असणार हें उघड आहे. पूर्वींचें युग विचाराचें होतें. सध्यांचें युग थोड्या विचाराचें आणि अधिक कृतीचें आहे. पूर्वी अद्भुत आणि कवित्व जन्मास आलें आतां त्या अद्भुताचा आणि कवित्वाचा तात्विक दृष्ट्या विचार झाला पाहिजे. मानव संहारक कीं उद्धारक ह्याचा खल सारखा चालला आहे. आतां तो उद्धारक आहे, ह्याची प्रचीति कृतीनुसार व्यक्तीनें आणून द्यावयाची आहे.

शुद्धतेचीं,कुलीनतेचीं व सौजन्यतेचीं वळणें काळानें पूर्वींच घालून दिलीं आहेत. डोळसपणाच्या अभावामुळें त्यावर मलीनता चढली आहे. ती काढिली ह्मणजे सुरेख बाळसेदार दिसून आपोआप मार्गदर्शक होतील व गिरवावयास सुलभ जातील. काळ ह्मणतो 'अरे, पुढें पाठ आणि मागें सपाट असे कसे तुह्मी ? नवीन सावकाश शिकलें तरी चालेल. पण मागील धडे विसरूं नका.' बरोबर आहे. सोन्यासारखें जुनें टाकून तारतम्यतेच्या अभावीं कदाचित् हिणकट पदरांत घ्याल आणि त्या योगें हीनदीन व्हाल ही काल गुरुजींना काळजी पडली आहे.

काल हा सर्वांचा शास्ता आहे. त्याच्या आज्ञेनुरूप सर्वांनीं चाललें पाहिजे. काळाला शास्ता अशाच करितां ह्मणावयाचा कीं, त्यांत एक असमान शक्ति भरली आहे. आज एक प्रश्न उपस्थित होत आहे कीं, शक्ति कशी मिळेल ? भाविकास भावेच्छा तृप्त करण्याकरितां शक्ति पाहिजे. गृहस्थास संसारबंधनांतून लवकर सुटण्यासाठीं शक्ति पाहिजे. जनऋणांतून अल्पांशानें तरी मुक्त व्हावें ह्मणून एक विभूति तिची इच्छा करितो आहे. एवंच काय कीं, जो तो शक्तिशोधार्थ आहे. आतां ही शक्ति मिळावी कशी ? थोडी दूरदृष्टी फेंकली म्हणजे तिचें स्थान दिसून येणार आहे. तें स्थान निसर्ग खाणी हें होय. जेथें काढून घ्यावयाचें असतें तेथें थोडा नम्रभाव धरावा लागतो. एकादी चीज, फार तर काय झाडावरून पडलेलीं फळें वेंचावयाचीं असलीं तर, देखील नम्र व्हावें लागतें. मग इतरांसंबंधीं विचारावयासच नको.

तीच गोष्ट निसर्गाविषयीं आहे. निसर्ग सामर्थ्याची खाणी आहे पण कोणास ? जो त्याचें आज्ञाधारकत्व पतकरतो त्यास. निसर्गास ताब्यांत आणावयाचें असेल तर प्रथम त्याचे आज्ञेनुरूप चाललें पाहिजे. इतराची अवज्ञा केल्यास थोडें बहुत शासन मिळेल, पण सृष्टीची अवज्ञा केल्यास पुरी जन्माची आठवण राहण्याजोगें शासन मिळेल. सृष्टीचा नियम असा आहे कीं, मानवानें आपल्याप्रमाणें शुद्ध राहणी पतकरावी. जेथें हा नियम पाळला जातो तेथें व्याधि सहसा येत नाहीं. जेथें ह्याचें उल्लंघन होतें तेथें व्याधि व्याघ्रासारखी धांवून येते. हा नेहमींचाच देखावा आहे. खेडे गांवांतील आणि शहरांतील

सारख्याच शिक्षणाचे दोन विद्यार्थी घेतले तर पहिल्या ठिकाणचा विद्यार्थी शारीरिक आणि मानसिक श्रमांत अधिक मेहनती व सरस निघालाच पाहिजे. अपवादादाखल कोणी असेल, नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं. शुद्ध तत्वानुसार जेथें राहणी आहे तेथें सामर्थ्य आहे हेंच आह्मी मुळांत धरून आहों. ह्यावरून हें दिसून येईल कीं, सामर्थ्य—शारीरिक कामाकरितां पाहिजे असो कीं मानसिक श्रमाकरितां पाहिजे असो, तें निसर्गांत ठेविलें आहे हें निःसंशय होय. 'निसर्गांत शक्ति ठेविली आहे तर मग काळांत काय ठेविलें आहे? थोडा वेळ झाला तुह्मी 'काळ अस्मान शक्ति आहे' असें मत ठोकून दिलें हें कसें?' अशी शंका येणें साहजिक आहे, आतां या शंकेच्या निरसनाकडे वळणें बरें दिसतें. प्रेरणा ह्मणून जी कांहीं आहे ती काळांत आहे. सृष्टींत उत्तेजकता आहे. सृष्टि सात्त्विक असल्यामुळें तिच्या उत्तेजनानें होणाऱ्या कार्यांचा लय बहुधा सात्विकांत होतो. काळांत सात्विकतेपेक्षां राजसपणा अधिक असल्यामुळें त्याच्या प्रेरणेनें झालेल्या कार्यांचा लय धृतींत, शौर्यांत होतो. वर्तमान काळाची उपजीविका भूत काळावर असते. भूत काळाचें तेज पाहिलें ह्मणजे बाहु स्फुरण पावतात. हें भूत काळाचें तेज ह्मणजे इतिहास होय.

इतिहास मनावर हुबेहुब चित्रें उठवित असल्यामुळें त्यास शक्तींत गणावें लागतें. इतिहास हा एक कालाचा अंश आहे. अंश जर शक्तींत गणला जातो तर स्वयंसिद्ध काल अस्मान शक्ति ठरूं पहात नाहीं

काय? असो; पाहणाऱ्याकडेस काळ आपल्या शक्तीचा प्रभाव दाखवितो व त्या बरोबर निसर्गाच्या सामर्थ्याची साक्ष पटवितो. थोरांच्या उपकाराबद्दल उतराई व्हावें, हें जें मन कर्तव्य ह्मणून समजतें तें काळाची शिकवणी स्मृतींत सदैव ठेविल हें उघड आहे. काळ असें ह्मणतो ' सुजनहो, तुकारामबोवा होणें शक्य नसेल तरी मोरोपंत होणें तुह्मांस शक्य आहे ना? तितकें झालें तरी मीं मिळविली!' काळ ह्मणतो ' भगिनींनो, प्रति अनसूया होणें शक्य नसेल तरी अहल्याबाई होणें शक्य आहे ना? तसें झालें तरी मीं येथें येऊन साधिली.' काळ ह्मणतो ' बाळांनो, बालध्रुव होणें शक्य नसेल तरी विश्वास होणें शक्य आहे ना? तितकी ह्या वयांत मजल मारिली तरी मीं लीला केली असें समजेन? तेजानें तेजस्विता इच्छावी हें साहजिक आहे. उदारधी उदारतेचेच धडे देतात. माळी आपल्या मुलीस ह्मणतो. बाळे, काळ्याचे पांढरे झाले पण फुलाचाच धंदा केला. ह्या ह्मातान्याची हीच तुला शिकवणूक आहे-कीं, दुष्ट काळ जरी आला तरी गोवऱ्या वेंचूं नकोस, र फुलेंच वेंच. तीं पाटींत कमी आलीं तरी हरकत नाहीं. ग मात्र गोवऱ्या घालूं नकोस. श्रमानें कोठेंही एखादें दुसरें फूल मिळेल. मी सात्विक ब्रिदाचा आहें ह्यांत सारें समजून घे. सध्यां हेंच रूपक ध्यानांत ठेवावयाचें, आहे दुसरें काय? आतां काळाच्या प्रधान अंगाकडे वळूं.

आजः—रजनी तारांगणानीं विराजमान झालेली असली तरी जनदृष्टि तिच्या सौभाग्यतिलकाच्या ठिकाणीं रममाण झालेली असते. तद्वत् कालमंडळ नि-

मिषताऱ्यापासून सनातनत्वाच्या ताऱ्यापर्यंत अगणित रत्नांनीं जरी खचित झालें आहे तरी आज तारा सर्वांची दृष्टि वेधून घेत आहे. जेथें कृति आहे तेथें लक्ष आहे. जेथें निश्चय आहे तेथें उपाय आहे. आज शब्दांत कृति आहे. ह्मणून आज इकडे लक्ष वेधलेलें असतें. आज हा निश्चयी आहे ह्मणून तो जीवाचा उपाई समजला आहे. आजची कृति खरी आहे तेव्हां आज हा कर्तृत्ववान आहे. आजचा निश्चय उद्याच्या कृतीचा जनक आहे. तेव्हां त्याजकडे एक प्रकारचें प्रभुत्व येतें. ह्यावरून ध्यानांत येईल कीं, काल मंडलाचा आज हा आदिग्रह आहे. निमिष, क्षण, घटिका, प्रहर, ह्या उपग्रहांनीं आपल्या अधिपतीभोंवतीं फिरून त्याच्या धोरणानुसारें चाललें पाहिजे, त्यांनीं सकारणीं लागले पाहिजे. दैविक इच्छेनें आपल्यास दिवसाचें सेवकत्व पतकरावें लागत आहे तर तें विश्वासुकपणानें पतकरलेलें बरें नव्हे कां? असो;

आज ह्या शब्दाची तुलना कमलपत्रावरील जलबिंदुशीं केली असतां ठीक पडेल असें वाटतें. जलबिंदु प्रकाशीत आहे. आज हाही प्रकाशीत आहे. जलबिंदु चल आहे. आजही चल आहे. दोघांचा जन्म आदितत्वापासून आहे, झालें. येथपर्यंत सारखेपणा आहे. आतां त्यांमधील भेदाभेदाकडे पाहूं. सकृतदर्शनीं हा भेद तेव्हांच दिसून येतो कीं, जलबिंदु दिसतो. आजला पहावें लागतें. दिसणाऱ्या गोष्टी नैसर्गिकधर्मानें कशाही दिसतील. त्यांत त्यांना बऱ्यावाइटाबद्दल दोष देतां येत नाहीं. पण 'आज' ला पहावें लागतें तेव्हां त्याच्या चांगल्या वाइटाबद्दल

मानव जबाबदार आहे जलबिंदु काय वायुगतीनें थोडा नाचेल, बागडेल, चटदिशी ढळून जाईल. एकादा कादंबरीकार त्याच्या सान्निध्य असला तर त्याच्या अस्तित्वाचें, चंचलतत्वाचें चटकदार वर्णन करील. तसें कांहीं 'आज' चें नाहीं. 'आज' ची कादंबरी लिहीत असतात. 'आज' चा इतिहास एक इतिहासवेत्ता लिहून ठेवीत आहे. ह्या गोष्टी मनांत आल्या ह्मणजे 'आज' च्या कृत्याबद्दल व्यक्तींनीं स्वतःला किती जबाबदार धरावयास पाहिजे आहे बरें? 'आज' चा आळस नमूद होतो. 'आज' ची कृति नमूद होणार आहे. ह्या सर्व गोष्टी उघड उघड आहेत, असें जर हें आहे तर आजची घडी वाया कां जाऊं द्यावी बरें? आजची तरतरी, आजची उल्लसित मनोवृत्ती, आजचे विचार तरंग उद्याला नाहींत. ह्या गोष्टी हातच्या कांकणाप्रमाणें जर ढळढळीत पुढें आहेत तर त्याचा उपयोग कां करून घेऊं नये? फार तर काय आजचा देह उद्याचा ह्मणून मानलेला आहे. खात्रीचा नाहीं. मानलेल्या देहाची कृति मानावी लागेल पण आहे त्याची खास आहेना?

आतां उपसंहारादाखल दोन शब्द लिहावेसें वाटतात तेव्हां त्याच्याकडे वळतों. इतर विषयासंबंधीं शेवटचें ह्मणून लिहिण्यास मन फारसें कचरत नाहीं, लेखणी तितकी कंपायमान पावत नाहीं पण काळ हा शब्द कानीं घुमघुमतांच चित्तवृत्ती तटस्थ होते, मन गांगरून जातें, लेखणी कंपायमान होऊन गति कुंठीत होते. बरोबरच आहे. काळाचा महिमाच तसा अगाध आहे. जीव ह्या नात्यानें जाणतेपणाची फुशारकी मारून बुद्धी धरावयाची व अ-

ल्पशी कृती करावयाची एवढेंच आपणा मानवाकडे आहे. असो; सृष्टीच्या अंतःस्थितीविषयीं व बाह्य स्थितीविषयीं विचार केला, तर सर्व व्यापार कसे सुयंत्रित क्रमाक्रमानें चालले आहेत असें दिसून येतें. कोठें ह्मणून अंदाधुंदीचा गंध नाहीं. दृश्यांत सहेतुकता ओतप्रोत भरून राहिलेली आहे. वस्तून् वस्तूंत, पदार्थान् पदार्थांत सत्यतेची मूस ओतलेली दिसते. दृश्य कसें सहेतुक आहेत, वस्तून् वस्तूंत पदार्थान् पदार्थांत सत्यता शोधून काढण्यासाठीं हें जीवित चित्र आहे व त्याच्या हातांत कालदीपिका दिलेली दिसते. तेव्हां ह्या जिवाचें एवढेंच कर्तव्य दिसतें कीं, यानें ती सहेतुकता शोधून काढावयाची आहे, सत्यतेस प्रकाशांत आणावयाचें आहे. सत्याकरितांच जिवीताचा अवतार आहे, सत्याकरितांच सृष्टीरूपी बाजारीं स्त्रीपुरुष आहेत. सत्याकरितांच भेदाभेद विसरावयाचा आहे. फार तर काय सत्याकरितां त्या आदिशक्तीतून काल तेज ह्या विश्वगोलावर निर्माण झालें आहे. सत्याचा पाठीराखी ह्मणून हा काल येथें धांवून आला आहे. आतां मानवाचें काम फक्त डोळसपणाचें आहे. सत्याचा पाठीराखा ह्मणून काला तूं धांवत आलास. धन्य आहे तुझी ! तुझी आस पुरवावी हेंच आह्मी ध्यानांत ठेवणें योग्य आहे. तुझ्या पायीं सदा लीन व्हावें. ह्यांतच आह्मास भूषण आहे.

---

# वृद्धापकाळ अथवा अखेर साधणें.

The wheels of time have brought us to the goal; we are about to rest while others wander. We touch at last the mysterious loor-are we to be pitied or to be envied ?

" The Gentle Life "
By J. Hain Friswell.

# वृद्धापकाळ अथवा अखेर साधणें.

मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुझे पाय ।
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय ? ॥

मोरोपंत–आर्या केका २१.

उदयाचलावर बालार्क आलेला आहे. तरूचीं पल्लवाग्रें सुवर्णमय दिसत आहेत. शैलशृंगावर आरक्ततेची छटा चढली आहे. क्रमानें तोच वर यावा तों तें सुवर्णतेज अस्तंगत झालेलें आहे. जिकडे तिकडे शुभ्र कांति फांकत चालली आहे: ऐन मध्यान्हीचे वेळीं त्याचा पराक्रम काय विचारावा ? सकल चराचरास कर्तव्यीं गुंतविलें आहे. वस्तून् वस्तु प्रकाशिली आहे. आतां येथून एक सत्ता तर भानूचीच असा भास होत आहे तों अपराह्न व्हावा, सर्वत्र शांतता होत आहेसें दिसावें इतक्यांत पाहतां पाहतां तो दिनमणी पार नाहींसा व्हावा ! जेथें सर्वच चल तेथें कालतेजानें तरी कां चंचल नसावें ? असो, हा जो दिन ताऱ्याचा देखावा तोच मानवताऱ्याचा आहे. नाहीं असें कोण ह्मणेल? मोह उत्पन्न करणारें बाळपण, विनोदी तरुणपण,

नतर मध्यमावस्थेंतील कर्तृत्व व त्याच्या पुढें शांतक्रान्त झालेली वृद्धावस्था हीं पाहून अल्पप्रमाणानें दिनमणीशीं मानव साम्य आहे असें कां वाटणार नाहीं? सूर्यनारायण ह्या जगांतून गेला तरी दुसऱ्या स्थळीं तो आहे. तसेंच आत्मा देहमंदिर सोडून गेला तरी दुसरीकडे अन्यरूपानें तो झळकत आहे. आतां आत्म्याचें देहविसर्जन अथवा अंत्यावस्थेविषयीं विचार करूं. जी स्थिति सहेतुक आहे, जी जीवांना अवश्य ह्मणून लागून आलेली आहे. जी टाळणें कोणासहि आणि केव्हांहि शक्य नाहीं, ती दुर्गतीची आहे, ती वाईट आहे असें कसें मानावें? फळ पिकलें ह्मणजे खालीं यावयाचेंच. पानें गळावयाचींच. कालांतरानें पल्लवी फुटून पुनः फूल, पुनः फळ, हें चक्र चालावयाचेंच. मग माळ्यानें पहिलें फळ पडून पानें गळतांच अश्रु कां ढाळावे बरें? समजा कीं मरण हें जीवाच्या पसंतीवर ठेविलें असतें तर ती पसंती केव्हां तरी केली असती काय? मरणाचे वेळेअवेळेबद्दल दोषारोप वृथा आहेत. ज्याच्या कृपाछत्रांत गायक आणि निंदक दोघेहि येतात, ज्याची वृष्टि सुष्टाच्या आणि दुष्टाच्या बागेवर सारखीच आहे, ज्याच्या प्रकाशानें संहारकांस आणि उद्धारकांस सारखेंच सुख होतें, त्या प्रभूच्या आज्ञेंत अन्याय असेल, हें संभवत सुद्धां नाहीं. आपणास जीवितपटावरची एक आशानरद जिंकावयाची आहे. पण त्याला कोट्यावधि नव्हे, अगणित आशानर्दा जिंकून घ्यावयाच्या आहेत. आपण एकधोरणी आहों, तो सर्वधोरणी आहे. तेव्हां त्याचें करणें यथाकालीं आहे असें मानणें भाग पडतें.

च्या लाटेसरसें कर्तव्यास लागलेलें बरें. ज्ञानरेणु लाभला तर उत्तमच आहे. नाहींतर हरी सर्व क्लेश हरण करून अखेर साधून घेणारच आहे.

सृष्टींतील अणुरेणु धर्मानें चालला आहे. प्रत्येक सूक्ष्म जीव कर्तव्यासह आलेला आहे. प्रत्येक अणुरेणूस व प्रत्येक सूक्ष्म जीवास परिपक्कतेस नेण्यांत सृष्टीचा विशेष हेतु असतो. मग आपल्या बोलक्या चालक्या व विचारानें भरलेल्या वृद्धावस्थेंत तो प्राधान्येंकरून असला पाहिजे हें उघड आहे. वृद्धावस्था ही अनुभवाची खाण, ज्ञानाची ठेव व व्यवहारज्ञतेची मूस आहे. इतक्या विशेषणांनीं जी भूषित आहे तिजकडून निसर्ग कांहीं तरी चांगलें घडवून आणित असलाच पाहिजे. ठसठशीत अशा कच्च्या आंब्याचे गुणहि चांगले आहेत, त्याचे उपयोगहि बरेच आहेत; पण स्वादाला, रसाला व मनसोक्त चाखावयाला त्याची परिपक्कताच पाहिजे. त्याविना तृप्ति नाहीं. ह्यावरून असें दिसतें कीं, गुणाची व कर्तबगारीची चहा परिपक्कतेंत आहे. वृद्धावस्था अनेक पावसाळ्यांतून गेली आहे. विचार, विकार आणि राहणी ह्यांचे भिन्न देखावे तिनें पाहिले आहेत. तेव्हां तिची आराधना केल्यास—आणि करणें हें योग्य आहे—ती आपल्या अनुभवाचें चित्र तरुणासमोर ठेवील. कर्तव्याचा बाण कसा मारावा, प्रसंगीं हार कशी ध्यावी, जन कसा तुटतो आणि जन कसा जोडावा लागतो हें ती शिकवील. नुसते देखावे मृगजळासारखे आहेत. त्यांत अर्थ नसून अनर्थ आहे. शुद्धस्वरूप बोधप्रद असून अर्थप्रद आहे. विषयाची हाव शरीरास ग्लानि व मनास

क्रान्ति आणणारी आहे हें सांगील. व शेवटीं संतांच्या आणि सतींच्या चटकदार गोष्टी सांगून मनास सन्मार्गी प्रवृत्तक करील. एकंदरींत ही तरुणास तरुणपणांत ज्ञानवृद्ध व अनुभववृद्ध करण्याचें श्रेय घेईल. मात्र येथें तरुणानें वृद्धाच्या संशयसहाणेवरून कसास उतरावयास पाहिजे. कारण वृद्ध हे संशयाचे पुतळे असतात. तो त्यांचा दुर्गुण नव्हे तर व्यवहाराच्या पाहणीवरून झालेला निर्णय होय. आतां मानव चुकीस पात्र आहे. त्याचा निर्णय मतभेदी असेल. नाहीं असें ह्मणवत नाहीं. तेव्हां येथें परिस्थित्यनुरूप ग्राह्याग्राह्याचा विचार करणेंहि जरूर आहे. तारतम्याच्या वांटणीचा उपयोग तो काय ? असो, अशी वृद्धावस्था ज्ञानामृत पाजते ह्मणून तिला राजदरबारीं मान आहे; समाजांत श्रेष्ठ स्थान आहे व गृहांत अग्रस्थान आहे.

जीवितांत तारुण्य ही एक निशा आहे. हिच्या तारेंत जीव असें बहकूं लागतो कीं, मला उपदेशाचें नांव नको. मीं ठरविलेल्या कल्पना ह्याच खऱ्या. जीवितहेतु असाच साधला पाहिजे. ही एक गोष्ट पसार झाली कीं जनसुधारणा व जनकल्याण झालेंच पाहिजे. ह्या व्यतिरिक्त मार्ग खास नसतील. अहो, बसल्या बैठकीला ठाम मतें ठरत नाहींत ह्मणजे काय ! अरेरे ! असल्या चांचल्यवृत्तीनें व हेकेखोरपणानें तरुणांना कितीवेळां जीवितहेतूस मुकविलें असेल बरें? हे दुराग्रहा, हे चांचल्यवृत्ते, तुह्मीं आजपर्यंत किती तरुणांच्या डोक्यांत आणि मनांत शिरून अभास असलेल्या गोष्टी भास ह्मणून दाखविल्या असतील ! अनिष्ट इष्ट ह्मणून कितीदां भूल पाडली अ-

सेल! उपदेशामृतास जहर विष ह्मणून कितीदां भासविलें असेल हें तुमचें तुह्मांसच माहीत. ह्या तुमच्या कृतीनें आमचे अमोलिक तरुण मात्र कर्तव्यास आंचवले. समाजमालिकेंतून गळाले व राष्ट्रभूषणांतून हरपले. असो. पूर्णत्वाच्या विचाराप्रत कोणीहि पोंचला नाहीं. तथापि सूक्ष्म विचारांतून व तीक्ष्ण अनुभवांतून एकदां वृद्ध गेलेला आहे. तर त्याचा विचार घेतल्यावांचून समंजस तरुणानें पुढें जाऊं नये. मागच्यास ठेंच व पुढचा शहाणा ह्या न्यायानें जग चालत आलें आहे. मग उगीच अज्ञानांत कां शिरावें? व नसता दुराग्रह व चांचल्यवृत्ति कां पतकरावी? तारुण्यांतील मनःसौंदर्याच्या लाटेबरोबर अनुभवाची सागवानी लाट आलेली अंतीं हितकारक नाहीं काय? कधीं कालीं त्यांतून तुम्हांस ऐषआरामाच्या जिनसा करावयास सांपडतील. हें कसें विसरतां? प्रवाहांतील लाटेचा आणि पाण्याचा जसा सलोखा आहे तसा अनुभविकाचा आणि तरुणाचा असला पाहिजे. पहिल्याच्या साहाय्यानें जसा तिऱ्हाईत स्नानानें हित साधून घेतो तसें दुसऱ्याच्या मैत्रीनें राष्ट्रहितपट विणला पाहिजे. हें ज्यांना कळलें त्यांना जीविततत्व समजलें असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. तरुणांना वृद्ध डोकें आणि वृद्धांना तरुण पाय मिळतील तर हवी तशी सुधारणा होईल नाहीं बरें? आज आह्मांस शिवाजी महाराजांसारखा तरुण आणि दादोजी कोंडदेवांसारखा वृद्ध पाहिजे. असा हुरुपाचा कंद आणि त्यास असें शिक्षणजलाचें संगोपन मिळाल्यावर काय एक साधावयाचें नाहीं? आतां मानाकडे वळूं.

**मान**—प्रकाशाच्या ठिकाणीं अंधेर, गतीच्या ठिकाणीं रोध व तेजाच्या ठिकाणीं शितळाई, ह्या गोष्टी जर सृष्टिधर्मानुसारें चाललेल्या आहेत आणि ह्यांस जर कोणी निंदित नाहीं तर तारुण्यानंतर आलेल्या ह्या वृद्धावस्थेसंबंधानें निंद्य शब्द, अवास्तव केविलवाणे उद्गार कां निघावे, हें समजत नाहीं ? निंदा चुकीची केल्यास फारसा दोष नाहीं. पण निंदा निसर्गाच्या मांडणीची असूं नये. निसर्गाचा मान राखणें ही गोष्ट जर सुजनसंमत आहे तर त्याच्याच आज्ञेनें आलेल्या वृद्धावस्थेविषयीं सदाशेचे आदराचे उद्गार काढणें, एवंच मान ठेवणें कोण सर्वसंमत लेखणार नाहीं ? ओंगळ, हिडीस व अर्थशून्य स्वरूप असें कोठेंच नाहीं. आणि असेलच तर तें एका दोषैकदृष्टींत आहे. आतां कित्येकदां अशी गोष्ट होते कीं, मानव आपल्या कृतीपेक्षां कमी ठरतो. असें पहा. जुना बाग उत्तम दिसावा, जुनें देवालय भक्तिरसाचें पोषक व्हावें, जुन्या वाड्यानें अभिमान जागृत करावा, आणि जुन्या मनुष्यानें निर्माल्यवत् दिसावें हा किती केविलवाणा देखावा बरें ? मानव आपल्यापेक्षां कमी दर्जाचा ठरावा ही खरोखर शोचनीय गोष्ट होय ! तथापि, असाहि देह कार्यीं येतो तेव्हां त्याविषयीं अनादर नसणें हें सुशील लक्षण होय. कांच फुटली ह्मणून काय झालें ? निरर्थक थोडीच ठरते आहे ? भिंती लहान असतां ह्या छिन्नविछिन्न तुकड्यांनींच त्यांना सबळ केलें आहे ना ? झालें तर. मग ते संग्रहास आणि मानास योग्य आहेत ह्याची द्विरुक्ति कशास हवी ?

वृद्धावस्थेंत कसें धोरण ठेवलें असतां ह्या जगांत आ-

ल्याचें सार्थक मानतां येईल ह्याविषयीं आतां पाहूं. इंद्रियाच्या दुर्बळतेमुळें उत्साह, धैर्य, कर्तृत्व व महत्वाकांक्षा हीं साहजिकपणें गळालेलीं असतात. तथापि, पूर्व वयांत ह्यांचा उपयोग करून घेतला असल्यामुळें त्यांना प्रकाशांत आणतां येतें. ह्यावेळीं आशा धरावयाची नसून आशा धरवावयाची असते. कृति करावयाची नसून कृति करवावयाची असते. असलेला सद्गुण पुढें मांडावयाचा असतो. पाहिलेले देखावे, ऐकिलेल्या कथा, अनुभवलेले प्रसंग, तरुणांपुढें प्रेरकतेकरितां ठेवावयाचे असतात. आपली झालेली जगाबद्दलची समजूत ही त्याचें पूर्ण स्वरूप नसून एक तें ओळखण्याचें साधन आहे हें शेवटीं सांगावयाचें असतें. अनंत जन्मांतून फिरत असतां ' आत्म्या, तुला ही नरदेहाची अमोलिक जोड झाली आहे, असलें कल्पनेचें मंदिर, असली विचाराची ज्योत, असली साधनांची खाण, जगतीत्रयांत रे मिळणार नाहीं ! ह्या मंदिराच्या आधारानें ह्या ज्योतीच्या प्रकाशानें व ह्या साधनाच्या खाणीनें प्रीतिहार आपलासा कर. प्रीतीनें स्वार्थ साध. प्रीतीनें जनार्थ व परमार्थ साध. जातांना अखेर ही धनानें साधतां येत नाहीं, मनानें साधतां येते असें सांग व निरिच्छेनें खुशाल आमचा देह येथें ठेव. आमची त्वचा डागली तरी हरकत नाहीं. तूं मात्र धारण केलेल्या नांवास डाग लावून घेऊं नकोस, हीच तुला प्रार्थना आहे. एवढी भीक घाल ह्मणजे झालें.

## Adieu to World

Good-Bye, proud world ? I am going home
Thou art not my friend ; I am not thine ;
Too long through weary crowds I roam:-
A river ark on the ocean brine,
Too long I am toss'd like the driven foam ;
But now, proud world, I am going home.
Good-bye to Flattery's fawning face ;
To Grandeur with his wise grimace ;
To upstart Wealth's averted eye ;
To supple office, low and high ;
To crowded halls, to court and street,
To frozen hearts, and hasting feet,
To those who go, and those who come,
Good-bye, proud world, I'm going home.

R. W. Emerson.

२५३ ग्रा. क्र.

**शुद्धिपत्र.**

पृष्ठ १३५, ओळ ९ ' वळ ' वळें

पृष्ठ १४४, ओळ १३ ' एकादी चीज ऐकावयाची असेल तर गायकास विनयानें सुचवावें लागतें.